दुर्बल व अत्याचारित
इस्लामच्या शीतल छायेत

लेखक

सय्यद जलालुद्दीन उमरी

अनुवाद

झाहिद इब्ने आबिद खान

अनुक्रमणिका

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

प्रस्तावना

मानव अल्लाहची श्रेष्ठतम रचना आहे, परंतु ही मोठी खेदाची बाब आहे की तो स्वत:च स्वत:ची श्रेष्ठता व महानता नष्ट करीत आहे. तो अल्लाहचा गुलाम आहे. परंतु त्याने शिरजोरी व मोकाटपणाचा मार्ग अवलंबिला आहे. त्याचा जन्म एका जोडप्यापासूनच झाला आहे अर्थात तो एकाच आईवडिलांचे अपत्य आहे. म्हणून त्याने संपूर्ण मानवजातीला एकच वंश मानून जगात गुण्यागोविंदाने वागायला हवे, परंतु काळाच्या प्रवाहाबरोबर वाहता वाहता तो अनेक जाती-जमातीत व विविध वर्गात विखुरला गेला आहे. लोक उच्च-नीच गटांत विभागले गेले आहेत व प्रत्येक गट दुसऱ्यावर कुरघोडी करण्यात गुंतला गेला आहे. इस्लामने मानवजातीवर उपकार केले आहेत. संपूर्ण मानवजातीतील भेदभाव नष्ट करून मानवाची महानता व श्रेष्ठता स्थापित केली आहे. मानवाला ईशपरायणता व ईशभयाची जाणीव करून दिली. सर्वांना समानतेची शिकवण दिली. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या अधिकाराची जाणीव करून दिली. एका अशा व्यवस्थेची स्थापना केली की ज्याने सर्वांच्या अधिकारांची सुरक्षा होईल व कोणीही अत्याचारास बळी पडणार नाही.

मला ज्या विषयांमध्ये रूचि आहे त्यापैकी मी मानवाधिकाराला विशेष महत्त्व दिले आहे. मी याविषयी लेखांत दुर्बल व्यक्ती व दुर्बल मानवसमूहावर संक्षिप्त चर्चा केली आहे. तसेच महिलांच्या अधिकारांबाबत अपेक्षेनुसार चर्चा केली आहे. परंतु या विषयाचे काही महत्त्वाचे मुद्दे सामील करणे राहून गेले आहे. त्यांच्याबाबत सविस्तर मांडणी करणे गरजेचे आहे असे वाटत असल्यामुळे या पुस्तकात त्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकात इस्लाम दुर्बलांच्या समस्यांबाबत व्यापक दृष्टिकोन बाळगतो व त्यांचे निरसन करण्याबाबत योग्य मार्गदर्शन करतो. या सत्याबाबत चर्चा करण्यात आली आहे. दुर्बल घटक सत्यमार्गाचे प्राथमिक वाटसरू राहिलेत. इस्लामने समाजातील बहकलेल्या वर्गापेक्षा दुर्बलवर्गाकडे अधिक लक्ष दिले आहे, त्यांचा धर्म व नैतिकतेच्या आधारावर अधिक आदर केला असून त्यांना सन्मानजनक स्थान दिले आहे. त्यांच्या वास्तविक उणिवांचा सहानुभूतिपूर्वक शरियतमध्ये उल्लेख केला आहे. त्यांच्या आंतरिक मन:स्थितीचा काळजीपूर्वक विचार करून त्यांना बळ देण्याची इच्छा व धैर्य

प्रदान केले आहे. समाजात पसरलेल्या अन्याय व अत्याचाराबाबत घृणा व तिरस्कार करण्याचे बळ देऊन त्या प्रवृत्तीना नष्ट करण्यासाठी प्रयत्नाची दिशा दाखवून दिली आहे. दुर्बलांना त्यांचे अधिकार मिळवून दिलेत व या बाबतीत विशेष काळजी बाळगली गेली आहे, जेणेकरून दुर्बल आहेत म्हणून त्यांना त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवता कामा नव्हे.

दुर्बलांमध्ये अन्यायाविरुद्ध आवाज उठवून त्याविरुद्ध बदला घेण्याची हिंमत त्यांच्यात निर्माण केली आहे. मात्र हे सत्यही त्यांच्या निदर्षणास आणून दिलेत की क्षमा केल्याने मानवाचा नैतिक स्तर उंचावला जातो व मरणोत्तर त्याला त्याचे श्रेय प्राप्त होते.

पुस्तकाच्या सुरवातीस मानवाधिकारांची संक्षिप्त चर्चा आहे. त्यात पाश्चात्य दृष्टिकोनातील उणिवा व इस्लामिक विशेषताची चर्चा करण्यात आली आहे. या प्रकारे या पुस्तकातील मुद्दे योग्यरित्या समजाऊन सांगता येतील.

या पुस्तकांतील मुद्दे कुरआन व पैगंबर उपदेशांच्या आधारावर मांडण्यात आले आहेत. भावार्थ व व्याख्या समजून देण्यासाठी कुरआनाचे विवेचन, पैगंबरांचे उपदेश, त्यांचे आचरण व इस्लामिक विद्वानांच्या निर्णयाबाबत ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहे. यावरून लक्षात येईल की आपल्या पूर्वजांनी कुरआन व पैगंबरांच्या शब्द व कृतीचे किती बारकाईने अभ्यास केला आहे. आजही त्यांच्या ग्रंथाचा उपयोग घेता येतो.

या संक्षिप्त पुस्तकाद्वारे दुर्बल व अत्याचारित लोकांबाबत इस्लामचा दृष्टिकोन समजून घेण्यास उपयुक्त ठरेल अशी आशा आहे व या प्रयत्नांना ईश्वराची मान्यता प्राप्त व्हावी अशी प्रार्थना आहे.

जलालुद्दीन उमरी

१५ मार्च २००७

इस्लाम व मानवाधिकार

मानवाधिकाराची संकल्पना व इतिहास

मानवाधिकाराबाबत पूर्वीपेक्षा हल्ली अधिक जागृती निर्माण झाली आहे असे मानले जाते. अधिकांश मानवसमाज मौलिक अधिकारांपासून वंचित होता व त्यांच्यावर जुलूम व अत्याचार होत होता. एखाद्या सामाजिक गटाने अत्याचारांविरुद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न केल्यास समाजाचा सशक्त व बलशाली वर्ग त्यास चिरडून टाकत असत. अत्याचारित सामाजिक गटाच्या मुक्तीची कल्पना सर्वप्रथम पाश्चात्य देशांना झाली व ती त्यांनी लोकांपुढे मांडली. असे म्हटले जाते की फ्रान्सच्या सम्राट अल्फान्सो नववे यांनी कायदा केला किंवा त्यांच्याकडून करवून घेण्यात आला की कोणासही विनाकारण कैद करता येत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास कायद्यानुसार अवैध कारावासावर बंदी आणण्यात आली. या कायद्यास मानवाधिकाराच्या इतिहासात महत्त्वाचे पाऊल मानले जाते. याच्यानंतर फ्रान्समध्ये रूसोचा जन्म झाला. त्याने लिहिलेले पुस्तक व त्यात मानवी स्वातंत्र्याबाबत मांडलेल्या कल्पनेची दूरवर चर्चा झाली. त्याने म्हटले की मनुष्य निसर्गत: स्वतंत्र आहे व त्याला स्वातंत्र्य द्यायला हवे. त्याच्या पुस्तकाचे वेगवेगळ्या भाषांमध्ये अनुवाद करण्यात आले व त्या पुस्तकास क्रांतिकारी पुस्तक मानले गेले. उर्दू भाषेतही त्याचे "मुआहिद-ए-इस्लामी" या नावाने भाषांतर झाले. या पुस्तकाने फ्रा समध्ये एक प्रकारची चळवळ निर्माण केली व "मानवाधिकारांचे घोषणापत्र" या मथळ्याखाली एक घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात आले. त्यात मानवाधिकाराचा उल्लेख होता.

मानवाधिकाराचे आंतरराष्ट्रीय घोषणापत्र

याच प्रकारच्या इतर प्रयत्नांचा आरंभ झाला. याच प्रयत्नाचा बिंदू शिखर म्हणजे १०-१२-१९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने मानवाधिकाराचे आंतरराष्ट्रीय घोषणापत्र मंजूर केले व त्यास जगासमोर मांडले. मानवाधिकारांच्या बाबतीत यास अत्यंत महत्त्वाचे पाऊल समजले गेले. असे मानले जाते की या घोषणापत्रात मानवाधिकारांचे स्पष्ट चित्र अस्तित्वात आहे व मानवांना जुलूम व अत्याचारापासून मुक्त करण्याचा हा यशस्वी प्रयत्न आहे. या घोषणापत्रात तीन महत्त्वाचे मुद्दे आहेत.

(१) व्यक्तीस्वातंत्र्य (२) न्याय (३) समानता

कायद्यातज्ञानुसार या घोषणापत्राचे महत्त्वाचे मुद्दे आहेत. जर माणसाला या तीनही गोष्टी प्राप्त झाल्या तर त्याचे सर्व अधिकार सुरक्षित होऊ शकतात.

या घोषणापत्रातील उणिवा

या घोषणापत्रात काही उणिवा व काही व्यावहारिक अडचणीही आहेत. हे घोषणापत्र जाहीर झाले, मात्र यातील नियम लागू करण्याचे अधिकार कोणास प्राप्त आहेत याचा उल्लेख नाही. जर एखाद्या देशाने विशेषत: शक्तीशाली देशाने याचे उल्लंघन केल्यास, त्याला या घोषणापत्राच्या अधीन आणण्याच्या कोणत्याच सशक्त व प्रभावशाली उपायांचा यात उल्लेख नाही. याचे दुष्परिणाम घडताना आम्ही आजही पाहत आहोत. एखादा शक्तीशाली देश उद्दामपणे मानवाधिकारांचे उल्लंघन करीत असताना सारे जग केवळ तमाशा बघत असते. त्या उद्दाम देशाला आडकाठी घेण्यास कोणीच पुढाकार घेत नाही.

दुसरी बाब म्हणजे घोषणापत्रात धार्मिक स्वातंत्र्याचा उल्लेख आहे, परंतु या स्वातंत्र्याची निश्चित सीमा निर्धारित करण्यात आली नाही. धार्मिक स्वातंत्र्य म्हणजे मुस्लिम मशीदीत जाऊन नमाज पढू शकतो. ख्रिस्ती समाज चर्चमध्ये प्रार्थना करू शकतो, शीख धर्मीय गुरुद्वारामध्ये जाऊ शकतो व इतर धर्मीय आपल्या धर्मानुसार पूजापाठ करू शकतात, हेही एक प्रकारे धर्मस्वातंत्र्य आहे. यापुढे जाऊन हेही सांगता येईल की विशिष्ट प्रकारच्या वैयक्तीक वा कौटुंबिक धार्मिक विधी करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. आज धार्मिक स्वातंत्र्याचा या पलीकडे दुसरा काही अर्थ नाही. परंतु इस्लामच्या बाबतीत धर्म म्हणजे केवळ कर्मकांड इतकेच नसून तो संपूर्ण जीवनाबाबत मार्गदर्शन करतो व त्याने प्रत्यक्ष पालन करण्याचे आदेश दिले आहेत.

तीसरी बाब अशी की पाश्चत्य समाजाचे चर्च व त्याच्या प्रभावात असलेल्या शासकवर्गाने मानवी विचार व व्यवहाराचे स्वातंत्र्य व त्याचे महत्त्वपूर्ण अधिकार याबाबत अगदी चुकीचा दृष्टिकोन स्वीकारला आहे, ज्यांचा मूळ धर्माशी काहीएक संबंध नाही. याचीच प्रतिक्रिया मानवाधिकाराची व्याख्या वर्तमानकाळात निर्धारित करण्यात येत आहे. त्यामुळे धर्माची वास्तविक भूमिका पूर्णपणे दुर्लक्षित झाली आहे. अल्लाहचे पैगंबर जे वेगवेगळ्या देशांत व वेगवेगळ्या काळांत जन्माला आले, त्यांची शिकवणूक काय होती, त्यांना सत्ता प्राप्त झाल्यानंतर त्यांचे राहणीमान कसे होते व मानवता कशा प्रकारे कल्याणकारी व यशस्वी होत होती; या गोष्टीकडे जरासुद्धा विचार केला जात नाही. असे वाटते की जणू धर्माला गौण मानूनच सर्व गोष्टींची चर्चा केली जाते. म्हणून कोणी असे म्हणू शकत नाही की हे घोषणापत्र कोणत्यातरी वास्तविकतेच्या व स्वतंत्र विचारधारे

अनुसार अस्तित्त्वात आले आहे. खर सांगायचे म्हणजे हे भेदभावपूर्ण अध्यायनाच्या आधारित आहे व हे अगोदरच निश्चित करण्यात आले आहे की धर्माच्या वास्तविक भूमिकेला महत्त्व न देता अर्थात दुर्लक्षित करून निर्णय घ्यायचा आहे.

इस्लामचा दृष्टिकोन

हे एक सत्य आहे की मानवावर जुलूम व अत्याचार होत राहिलेत इस्लाम हे सत्य स्वीकारतो. प्रथम मानव माननीय आदम (अ.) यांच्या एका पुत्राने दुसऱ्या पुत्राचा वध केला होता. कारण दुसऱ्याची कुर्बानी अल्लाहच्या दरबारात मान्य झाली नव्हती व पहिल्याची मान्य झाली होती. मात्र भावाचा अंतरात्मा जागृत होता, त्याला नंतर पश्चाताप झाला. (या प्रकरणाचे विस्तृत वर्णन कुरआनात ५:२७ मध्ये दिला गेला आहे.)

याचा अर्थ असा की जुलूम व अत्याचार थांबविण्यासाठी प्रयत्न केले गेले नाही तर एका भावाचे हात दुसऱ्या भावाच्या रक्ताने माखले जातील, याकरिता इस्लामला वाटते की जुलूम व अत्याचाराचा अंत झालाच पाहिजे व कोणासही इतरांवर जुलूम व अत्याचार करण्याची संधी मिळता कामा नये. यासाठी इस्लामने एक परिपूर्ण व अर्थपूर्ण कायदा तयार केला आहे. इस्लामने अशी न्यायिक व्यवस्था कायम केली आहे की मानवाला त्याचे सर्व रास्त अधिकार प्राप्त होतील. अशा व्यवस्थेची गरज पूर्वी ही होती व आज ही आहे. ही व्यवस्था जगाच्या सभ्य भागात अनेक शतकापासून लागू आहे व त्याचे सुखद परिणाम जगाने पाहिले आहेत.

कुरआन व हदीस (पैगंबरांचे शब्द व कृती) मध्ये मानवाधिकाराचे वर्णन

कुरआनातील आदेश व कायद्याचा उल्लेख प्रचलित कायद्यासारखा नाही. कायद्याच्या पुस्तकासारखे त्यात विषय व नियमाच्या स्वरूपात दिले गेलेले नाहीत. उलट परिस्थितीनुरूप कायद्याचा वेळोवेळी उल्लेख करण्यात आला आहे. अशा प्रकारे हे कायदे इस्लामच्या महत्त्वाच्या शिकवणीत पसरलेले आहेत. तसेच कुरआनात कायद्यांचा उल्लेख एका ठराविक ठिकाणी मिळत नाही. उलट कायद्याची एक बाजू एका ठिकाणी तर दूसरी बाजू दुसऱ्या ठिकाणी आढळून येते. त्या सर्व बाजूंचा उल्लेख एकत्रित स्वरूपात पाहिल्यास कायद्याचे खरे स्वरूप डोळ्यासमोर येते. हीच शैली त्याने मानवाधिकारच्या वर्णनात स्वीकारली आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उपदेश संग्राहात याचे विस्तृत विवरण प्राप्त होते. त्या आधारे हे सिद्ध होते की कायद्याचा अंमल कशा प्रकारे झाला आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उपदेशात नव्या कायद्यांचे ज्ञान होते.

फुकहा (इस्लामी - विधानाच्या विद्वाना) च्या व्याख्या

यात्यतिरिक्त कायद्याच्या खऱ्या व्याख्यांचे विवरण प्रस्तुत करण्याकामी मुस्लिम विद्वानांनी असाधारण सेवा केली आहे. त्यांनी ज्या प्रकारे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण करून कायद्याचे विवरण केले आहे, त्यांने कायद्याच्या विविध छटा दृष्टिगोचर होतात व कायद्याच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर होतात.

इस्लामी कायद्याबाबत आक्षेप

हल्ली नि:पक्षता, उदारता व सहिष्णुता बाबत बरीच चर्चा होते मात्र इस्लामने मानवास जे अधिकार दिले आहेत, त्यांना हवे तसे सन्मान दिले जात नाही. आज मनुष्य ज्या वैचारिक व सांस्कृतिक स्तरावर पोहचला आहे त्याच्याशी शेकडो वर्षापूर्वीचे कायदे मेळ खात नाहीत असे म्हटले जाते. तसेच इस्लामी कायद्याद्वारा आधुनिक परिस्थितीतील समस्याचे निराकरण करणे शक्य होत नाही. परंतु हे आक्षेप वास्तविकता व सखोल विचारविमर्षाने निर्माण झालेले नाहीत. इस्लामची मौल्यवान शिकवण हया विचार व आचार त्यांच्या आक्षेपाचे खंडण करतात. इस्लामी कायद्याचे सखोल अध्ययन केल्यास लक्षात येते की आज ज्या अधिकारांची चर्चा केली जाते व ज्यांना प्राप्त करण्याकरिता आटोकाट प्रयत्न केले जातात, त्यांचे इस्लामने फार पूर्वीच निरसन केले आहे. एवढेच नव्हे तर त्याची पूर्तता करण्याची कायदेशीर खात्री दिली आहे. अशा कोणत्याही मानवी अधिकाराचा उल्लेख करता येणार नाही ज्याबाबत इस्लामने कायद्याचे संरक्षण दिलेले नाही. हे सर्व त्या काळात केले गेले ज्या काळात शक्तीशाली वर्गाला सर्व अधिकार प्राप्त होते व दीनदुबळे सर्वथ: वंचित होते. यासाठी वंचितांना कोणतेच आंदोलन करावे लागले नाही. उलट इस्लामने स्वत: हे अधिकार त्यांना प्रदान केले आहेत.

काही मार्गदर्शक तत्त्वे

इस्लामने जे अधिकार मानवास दिले आहे त्यांच्याबाबत चर्चा करण्यापूर्वी हे लक्षात घेतले पाहिजे की या ब्रह्मांडाच्या व मानवाच्या बाबतीत त्याचा एक विशेष दृष्टिकोन आहे, जो अत्यंत महत्त्वाचा आहे. इस्लामच्या काही सैद्धान्तिक शिकवणी आहेत ज्यापासून तो जरासुद्धा अंतर करीत नाही व कोणताच कायदा त्यांचा विरोध करीत नाही. अर्थात कोणत्याच प्रकारच्या विरोधाभासाची संभावना उरत नाही. जर तुम्ही एखादा कायदा निर्माण केला तर तुम्हाला लक्षात ठेवले पाहिजे की तो इस्लामच्या

मूळ तत्त्वाच्या विरोधात नसावा. जर तो कायदा मूळ तत्त्वांच्या विरोधात असेल तर निश्चितच इस्लामी कायदा मानला जाणार नाही. उदाहरणार्थ, इस्लाम म्हणतो की या जगाचा सृजनकर्ता अल्लाह आहे व सर्वकाही त्याची मिळकत आहे. हे इस्लामचे मूळ तत्त्व आहे. या तत्त्वाने सर्व जुलमी व अत्याचारी सत्तांचे उच्चाटन केले आहे व त्यांना पटवून दिले आहे की ते स्वत: मालक नाहीत, मूळ मालक तर सृजनकर्ता अल्लाह आहे. जर एखादी व्यक्ती अल्लाहचे वर्चस्व स्वीकार करत असेल तर तो स्वत:स सत्ताधारी मानणार नाही. तो त्या काळाचा सत्ताधीश आहे, एखाद्या मोठ्या मालमत्तेचा व मिळकतीचा मालक आहे, जमीनमालक आहे किंवा उद्योगपती आहे किंवा इतर कोणत्याही प्रकारचे अधिकार त्यास प्राप्त आहेत, म्हणून तो काहीही करू शकतो अशी धारणा तो बाळगू शकत नाही. ज्याअर्थी अल्लाह खरा मालक आहे त्याअर्थी उपलब्ध साधनांचा मनुष्य अल्लाहच्या मर्जीनुसारच उपयोग करू शकतो. तो त्याला प्राप्त शक्ती व साधनाचा अल्लाहच्या मर्जीविरुद्ध, मानवाविरुद्ध अन्याय व अत्याचारासाठी उपयोगात आणू शकत नाही.

दुसरे उदाहरण असे आहे की इस्लामी आस्थेनुसार जीवन व मृत्यु अल्लाहच्या अखत्यारीत आहे. त्याच्या मर्जीनुसार मनुष्य जगात राहतो व त्याच्याच मर्जीनुसार मनुष्यास मृत्यू प्राप्त होतो. काही बालक आईच्या पोटातच मृत्यू पावतात. काही जन्म घेतात व लगेच मृत्यू पावतात, काही मुलें तरूण होऊन मरतात, तर काही म्हतारपणी मृत्यू पावतात. कोणता मनुष्य जगात किती दिवस जिवंत राहील याचा निर्णय अल्लाहच्या ताब्यात आहे. मनुष्याचे जीवन नष्ट करणे माणसाच्या हातात नाही, जर तो तसे काही करतो तर तो अल्लाहच्या सत्तेत हस्तक्षेप करतो. अशा कृत्याची त्याला शिक्षा भोगायला हवी. अल्लाहनुसार मनुष्य केवळ ईश्वराचा गुलाम आहे व त्याने गुलाम म्हणूनच जगायला हवे. ही साधीसुधी बाब नव्हे. याचा अर्थ असा की मानवावर केवळ अल्लाहचे वर्चस्व राहिले पाहिजे. मनुष्याने मनुष्यावर वर्चस्व गाजविता कामा नये. सर्व प्रकारच्या सत्ता अल्लाहच्या अधीन राहिल्या पाहिजेत. या बंधनातून मुक्त होऊन मनुष्याचे मनुष्यावर धार्मिक राजनैतिक वर्चस्व वैध मानायला नको. कुरआनात मनुष्याला श्रेष्ठ मानण्यात आले आहे. या श्रेष्ठत्त्वाच्या अनेक बाजू आहेत. त्याला त्याच्या प्राकृतिक व नैसर्गिक अधिकारांपासून वंचित ठेवणे श्रेष्ठत्त्वाच्या विपरित आहे. माणसाला अपमानित वा बेआबरू करण्यात आल्यास तो श्रेष्ठ राहत नाही. याप्रमाणे इस्लामनुसार कायदे निर्माण करण्याचे अधिकार केवळ अल्लाहच आहेत व त्या

कायद्याच्या कक्षेत मानवाने बंदिस्त राहायला हवे. हो, मात्र अल्लाहच्या कायद्यांच्या चाकोरीत राहून बदलत्या परिस्थितीनुसार मनुष्य "इजतिहाद" करू शकतो. (अर्थात पोटनियम तयार करू शकतो.) याचा अर्थ असा की अशा बाबी ज्यांच्या बाबतीत स्पष्ट नियम उपलब्ध नाहीत. इस्लामी विद्वान इस्लामी मूलतत्त्वांच्या अधीन राहून नवे कायदे निर्माण करू शकतात. याचा अर्थ असा की कोणत्याही व्यक्तीस व समूहास स्वतंत्रपणे आपले कायदे लागू करण्याची मुभा नाही. शासक व जनता दोहोंनी ईशकायद्याच्या अधीत्त्व राहायला हवे.

या इस्लामच्या काही मूलगामी धारणा व तत्त्व आहेत. जगाच्या प्रत्येक संविधानात काही प्रस्तावना व मूळ सिद्धान्त असतात. इस्लामच्या मूलगामी तत्त्वांना मार्गदर्शक सिद्धान्त म्हणता येईल. याने मानवाधिकारच्या एका निर्धारित धारणेचा उगम होतो व त्याने विशेष दिशा प्राप्त होते.

इस्लामने केवळ कायदेच दिले नाहीत तर त्याने जागृकता निर्माण केली आहे, की जर या कायद्यानुसार वर्तन केले गेले नाही. तर अल्लाहकडून त्याची विचारणा केली जाईल. तो मरणोत्तर (परलोक) जीवनाचे भय निर्माण करतो यामुळे कायद्याचा सन्मान व बंधन पाळण्याची भावना माणसांत निर्माण होते. मरणोत्तर जीवनावर श्रद्धा असल्यास मनुष्य ईशकायद्याचे सहजपणे उल्लंघन करण्याचे धैर्य करीत नाही.

जगण्याचा अधिकार

माणसाला व्यक्तीगत, सामाजिक, आर्थिक, राजनैतिक इ. अनेक अधिकार आहेत जे त्याला मिळालेच पाहिजेत. त्यात सर्वात पहिला मूलगामी अधिकार आहे की त्यास जगू द्यावे. कुरआनच्या अध्ययनाने हे सहज लक्षात येते की त्यात या अधिकाराला किती महत्त्व दिले आहे. त्यात म्हटले आहे की जो माणूस पृथ्वीतलावर जन्म घेतो त्याला जगण्याचा अधिकार प्राप्त आहे. काही लोक हा हक्क हिरावून घेऊ इच्छित होते. कुरआनाने त्यांच्याविरुद्ध आवाज उठविला. जे लोक आर्थिक, सामाजिक, धार्मिक तसेच कोणत्याही कारणास्तव लोकांचे प्राण घेत होते, कुरआनने त्यांना आव्हान दिले. त्यांना सांगण्यात आले की कोणालाही कोणाचे प्राण घेण्याचा अधिकार प्राप्त नाही. कायद्याचे विशेषज्ञ म्हणतात की कोणताही अधिकार संपूर्ण नसतो. त्याच्याबरोबर काही अटी असतात व त्यात काही अपवाद (सूट) ही असतो. कुरआनने याची स्पष्ट शब्दांत व्याख्या केली आहे. तो म्हणतो की नि:संदेह मानवाच्या प्राणाचा आदर करायला हवा, परंतु

अधिकार व न्यायाचा आदर त्यापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. म्हणून अधिकार व न्यायाची गरज असेल तर प्राणही घेतले जाते. काही अपराध असे असतात की ते जर माणसाच्या हाताने घडले तर ती व्यक्ती जगण्याचा अधिकार घालवून बसते. कुरआन ईशदासांच्या चांगल्या वृत्तीचे असे वर्णन करतो,

"अल्लाहने निषिद्ध ठरविलेल्या कोणत्याही जीवाला हकनाक ठार करीत नाहीत." *(दिव्य कुरआन - २५ : ६८)*

स्पष्ट आहे की न्यायाची मागणी असेल तर अल्लाहची सदाचारी माणसे (न्याय प्रक्रियेनुसार) माणसाचे प्राण घेतात. परंतु न्याय व न्यायालय परवानगी देत नसेल तर कोणतीही व्यक्ती जरी ती तत्कालीन शासक अथवा राष्ट्राध्यक्ष असली तरी, प्राण घेण्याचा अधिकार तिला प्राप्त असू शकत नाही. ती कोणासही जगण्यापासून वंचित करू शकत नाही.

समानतेचा अधिकार

मानवाधिकारावर जी पुस्तके लिहिली गेली त्यात समानतेला सर्व अधिकाराचा पाया म्हटले गेले आहे. म्हटले जाते की याच धारणेतून सर्व अधिकारांचा उगम होतो. सारी माणसे समान आहेत. त्यांच्यातील पुरुष-स्त्रिया, लहान-मोठे, श्रीमंत-गरीब, मालक व मजूर सर्वांचा दर्जा एकसारखा आहे. त्यांच्यात रंग, वंश, लिंग, जात, प्रांत किंवा राष्ट्रीयतेमुळे कोणतेच अंतर येता कामा नये. इस्लामने या बाबतीत जितक्या जोरात आवाज उठविला आहे, तितक्या जोरात इतर कोणीही ठासून सांगू शकला नाही. कुरआनाच्या आयती या बाबतीत सार्वभौमत्त्वाचा दर्जा राखतात. 'हज्जतुलविदाअ' (अर्थात मुहम्मद (स.) चे अंतिम हज)च्या वेळी अल्लाहचे पैगंबर (स.) यांनी जे अतुलनीय प्रवचन दिले, त्यास मानवाधिकाराचे प्रथम घोषणापत्र मानल्यास अनुचित होणार नाही त्यात त्यांनी स्पष्ट केले आहे,

"अरबा (अर्थात अरबवासी)ला अजमी (म्हणजे गैर अरबवासी) वर श्रेष्ठत्त्व प्राप्त नाही. तसेच अजमी (गैर अरबवासी)ला अरबावर श्रेष्ठत्त्व प्राप्त नाही. तसेच गोऱ्याला काळ्यावर व काळ्याला गोऱ्यावर कोणतेच श्रेष्ठत्त्व प्राप्त नाही. केवळ तोच श्रेष्ठ आहे जो सर्वाधिक सदाचारी (अर्थात ईशपरायण व अल्लाहचे भय बाळगणारा) असेल."

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या प्रवचनात सर्वप्रथम अरबवासियांचे नाव घेतले. याचे कारण असे आहे की अरबवासियांद्वारे इस्लामी परिवर्तन झाले. त्याकाळी

सत्ता अरबांच्या हाती होती. म्हणून सर्वप्रथम त्यांचे नाव घेऊन सांगण्यात आले की लक्षात असू द्या की अरबवासियांना कोणत्याही गैर अरबवासींवर श्रेष्ठता प्राप्त नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही गोऱ्या व्यक्तीला काळ्या व्यक्तीवर श्रेष्ठता प्राप्त नाही व शेवटी असे सांगितले की जर कोणाला इतरांवर श्रेष्ठत्त्व प्राप्त होत असेल तर ते ईशपरायणता व ईशभयाच्या आधारावर निश्चित होईल. जर एखाद्याच्या चारित्र्यांत ईशपरायणता असेल तर तो सर्वात श्रेष्ठ आहे. त्याचा सन्मान केला गेला पाहिजे व समाजात तोच आदरणीय मानला गेला पाहिजे. याऐवजी कोण अरबवासी आहे, कोणाचा कोणत्या देशाशी संबंध आहे, कोण पुरुष आहे व कोण स्त्री आहे, याची चौकशी करणे अयोग्य व गैर इस्लामी नीती आहे. हे सर्व त्याकाळात घोषित करण्यात आले ज्या काळी जगात समानता या तत्त्वाची कल्पनाही अस्तित्वात नव्हती.

न्यायाचा अधिकार

मानवाला न्याय मिळावा हा एक मूलभूत अधिकार आहे. या बाबतीत इस्लामचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट आहे. तो मुस्लिमांना न्यायाचा ध्वजवाहक म्हणून पुढे करतो. त्यांना आज्ञा देण्यात आली आहे की प्रत्येक व्यक्तीला निष्पक्ष न्याय द्या. शत्रूशी सुद्धा न्यायाचा व्यवहार करा. कोणत्याही परिस्थितीत अन्याय करू नका. कारण असे करणे ईशभय व ईशभक्तीच्या विरुद्ध आहे. न्यायाविरुद्ध पाऊल उचलण्यापूर्वी मानवाने ईशकोपापासून सावध राहिले पाहिजे व त्याला हे लक्षात ठेवले पाहिजे की ईश्वर सर्वज्ञ आहे. त्याच्यापासून काहीच लपलेले नाही.

"हे श्रद्धावंतांनो, अल्लाहसाठी सत्यावर आढळ राहणारे व न्यायाची ग्वाही देणारे बना. एखाद्या गटाच्या शत्रुत्त्वाचे तुम्हाला इतके प्रक्षोभित करू नये की तुम्ही न्यायापासून विमुख व्हाल. न्याय करा, हे ईशपरायमतेशी अधिक निकटवर्ती आहे. अल्लाहचे भय बाळगून कार्य करीत राहा. जे काही तुम्ही करता, अल्लाह त्याची पुरेपूर खबर ठेवणारा आहे." *(दिव्य कुरआन - ५ : ८)*

कायद्याचे प्रभुत्त्व

समानता, न्याय व इन्साफ यांची अनिवार्य मागणी अशी आहे की समाजात कायद्याला प्रभुत्त्व प्राप्त व्हावे जेणेकरून प्रत्येक व्यक्ती अगदी निश्चिंत होऊन आपले कर्तव्य बजावीत राहील. त्याला कायद्याचे पाठबळ प्राप्त आहे अशा विश्वासाची जाणीव वाटायला हवी. त्याला न्यायाची वागणूक मिळेल व त्याचे अधिकार अबाधित राहतील.

अशी विश्वासाची पूर्वीच्या जगात कल्पनाही केली जात नव्हती. इस्लामने स्पष्टपणे खात्री करून दिली आहे की कायद्यासमक्ष सर्व लोक समान आहेत. कायद्यासमोर कोणाचीच गय केली जाणार नाही. इस्लामचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काळातील एक प्रसिद्ध घटना आहे की बनी मखजूम जमातीतील एका महिलेने चोरी केली. प्रकरण पैगंबर (स.) यांच्यासमोर मांडण्यात आले. सहकाऱ्यांनी सल्ला दिला की ती महिला एका सभ्य घराण्यातली आहे, तिचे हात कलम करण्यात येऊ नयेत. कुठलीतरी साधी सरळ शिक्षा ठोठावण्यात यावी. पैगंबरांना हा सल्ला चुकीचा वाटला. ते (स.) म्हणाले, अशाच मनोवृत्तीमुळे सभ्य व उच्चवर्गीय वंशाचा ऱ्हास झाला. उच्चवर्गीयांनी अपराध केल्यास त्यांना शिक्षा देण्यात आली नाही. मात्र दीनदुबळ्यांना शिक्षा देण्यात आली. यानंतर जे वाक्य पैगंबर (स.) यांनी म्हटले ते ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. ते (स.) म्हणाले, "जर माझ्या मुलीने चोरी केली असती तर तिचेही हात कापण्याची शिक्षा तिला दिली गेली असती." सारांश असा की कायद्यासमोर सर्व सारखे आहेत. तो मोठ्यासाठीही आहे व छोट्यासाठीही आहे, तो पुरुषासाठी सुद्धा आहे, महिलांसाठीही आहे. त्यापासून कोणीच वेगळा नाही. हा निर्णय इतका स्पष्ट आहे की कायद्याच्या प्रभुत्त्वापुढे कशालाच महत्त्व प्राप्त नाही हे सिद्ध होते.

अपराध न्यायालयामार्फत सिद्ध व्हावा

अपराध न्यायालयामार्फतच सिद्ध करण्यात यावा. ही न्यायाच्यादृष्टीने महत्त्वाची बाब आहे. इतर कोणत्याही मार्गाने शिक्षा देण्यात येऊ नये. ही कल्पनासुद्धा इस्लामकडून घेण्यात आली असावी. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

"शपथ अल्लाहची! कोणालाही कारागृहात डांबण्यात येणार नाही जोपर्यंत न्यायप्रिय लोक त्याला अपराधी असण्याची साक्ष देत नाहीत."

(हदीस : मुवत्ता इमाम मलिक)

इस्लामला अपेक्षा आहे की शासकांची जबाबदारी आहे की त्यांनी कायदा भंग होऊ देऊ नये. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

"जे अमीर (शासक) आहेत ते दक्षता घेत आहेत की नाही, याची प्रजेकडून विचारणा केली जाईल." (हदीस : बुखारी)

'रैयत' (प्रजा) शब्द राईपासून बनला आहे. राई गुराखी व देखभाल करणाऱ्यांना म्हणतात. याचा अर्थ असा की, ज्याप्रकारे एक गुराखी शेळ्याचा कळपाला जबाबदार

असतो, त्याचप्रकारे इमाम (अमीर / शासक / अधिकारी) सुद्धा आपल्या रैयते (प्रजे)ला जबाबदार असतो. त्याचे स्थान एखाद्या हुकुमशहा वा निरंकुश अत्याचारी शासकासारखे नाही. उलट त्याची दशा गुराख्यासारखी आहे, जो हे पाहतो की कोणावर अत्याचार तर होत नाही ना किंवा त्यांच्या कळपावर अन्याय तर होत नाही ना. शासकाचे कर्तव्य आहे की त्याने दक्ष राहून पाहत राहावे की कोणाच्या अधिकारांचे हनन तर होत नाही ना. कोणाचे विनाकारण नुकसान व छळ तर होत नाही ना.

धनार्जनाचे अधिकार

असे म्हटले जाते की माणसाला त्याचे मूलभूत अधिकार मिळायला हवेत. इस्लामचा दृष्टिकोन या बाबतीत केवळ स्पष्टच नाही तर खूप व्यापक आहे. इस्लामच्या तत्त्वानुसार संपूर्ण जगात माणसासाठी विपूल सामुग्री पसरली आहे व त्यांचा सर्व लोक फायदा घेऊ शकतात. कुरआनात म्हटले आहे,

"आम्ही तुम्ही भूतलावर अधिकारांनिशी वसविले आणि तुमच्यासाठी तेथे जीवनसामुग्री उपलब्ध केली, परंतु तुम्ही लोक कमीय कृतज्ञता व्यक्त करता."

(दिव्य कुरआन - ७ : १०)

याचा अर्थ असा की ईश्वराच्या या जमिनीतून जो आर्थिक लाभ प्राप्त होतो, त्याचा फायदा घेण्याचा अधिकार सर्वांना प्राप्त आहे. कुरआनात दुसऱ्या जागी म्हटले गेले आहे,

"तोचतर आहे ज्याने तुमच्यासाठी पृथ्वीला अधीनस्थ करून ठेवले आहे, तिच्यावर संचार करा आणि खा अल्लाहची उपजीविका, त्याच्याच पुढे तुम्हाला पुन्हा जिवंत होऊन जावयाचे आहे." *(दिव्य कुरआन - ६७ : १५)*

याचा अर्थ असा की जमिनीच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात तुम्ही पोहचाल तेथे अल्लाहने उपलब्ध केलेल्या वस्तूंचा तुम्ही लाभ घेऊ शकता. इस्लामनुसार उदरनिर्वाह प्राप्त करण्याच्या मार्गात कोणतीच अनुचित आडकाठी करणे कायद्याचे उल्लंघन आहे. इस्लाम माणसाला आर्थिक खटाटोप करण्याचे स्वातंत्र्य देऊन त्याला आश्वस्त करतो की त्याला चांगले खाद्य मिळावे, तो घाणेरडे भोजन व सडक्या वस्तू खाण्यास विवश होऊ नये. कुरआनात म्हटले आहे की मानवावर अल्लाहचे अनंत उपकार आहेत की त्याला खाण्यासाठी शुद्ध (पवित्र) वस्तू दिल्यात. याच्यातून असाही अर्थ निघतो की त्याला स्वच्छ व पवित्र भोजन मिळायला हवे, हा त्याचा मूलभूत हक्क आहे. इस्लाम

माणसाच्या वस्त्रालाही स्वभाविक गरज मानतो व त्यानुसार त्याची ही गरज पुरविली गेली पाहिजे. याचप्रमाणे त्याला राहण्याकरता निवासही मिळायला हवे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आदेश दिले होते की ज्या व्यक्तीला आम्ही शासकीय सेवेत घेऊ, जर त्याचा विवाह झालेला नसेल तर त्याने बैतुलमाला (इस्लामी राज्याच्या राजकोषा)तून लग्नाचा खर्च घ्यावा व स्वत:करिता कपड्यांची व्यवस्था करावी. त्याच रकमेतून तो घरही बांधू शकतो व वाहनही खरेदी करू शकतो. यापेक्षा जास्त तो लाभ घेऊ शकत नाही. इस्लामी विद्वानांनी म्हटले आहे की राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा सुद्धा विचार करणे आवश्यक आहे. सारांश, इस्लामी राज्य कर्मचाऱ्यांच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था करते व कर्मचाऱ्यामध्ये त्याच्या सुखदुखाचा कोणी विचार करणारा नाही, अशी भावना निर्माण होऊ देत नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे की जर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला असेल व त्याने जी काही संपत्ती सोडली असेल तर त्यावर वारसांचा हक्क राहील व जर मूलबाळ सोडून जातो, मात्र कोणतीच संपत्ती सोडून जात नाही तर त्यांचा वारस ते स्वत: (पैगंबर (स.)) राहतील व मुलाबाळांचे पालनपोषण ते (स.) स्वत: करतील. या बाबतीत इस्लामी विद्वानांनी म्हटले आहे की राज्याची जबाबदारी आहे की कोणत्याही बालकाला व व्यक्तीला त्याच्या गरजा भागविण्यापासून वंचित ठेवता कामा नये. कुटुंबात जर कोणीही त्याचे पालनपोषण करणारा नसेल तर राज्य त्याच्या गरजा भागवेल. मात्र मनुष्याने जगाला आपल्या जीवनाचा उद्देश समजता कामा नये.

सामाजिक अधिकार

सर्व मानवी अधिकारांत सामाजिक अधिकार अत्यंत महत्त्वाचे अधिकार आहेत व ते त्याला मिळायलाच हवे. सामाजिक अधिकाराच्या कल्पनेप्रमाणे प्रत्येक व्यक्तीस समाजात सक्रिय भूमिका बजावण्याची संधी मिळायला हवी. हा त्याचा अधिकार आहे की त्याला बेकार वा निष्क्रीय बनवून ठेवता कामा नव्हे. त्याच्यावर असे कोणतेच बंधन नसावे की त्याने काहीच करू नये. इस्लाममध्ये या अधिकाराची स्पष्ट कल्पना आहे. इस्लाम विचार व आचाराचे संपूर्ण स्वातंत्र्य बहाल करतो. जे लोक चिंतन व मनन न करता जगतात त्यांच्या बाबतीत इस्लाम म्हणतो की लोकांना काय झाले आहे की ते जनावरासारखे विचार न करता जीवन जगत आहेत. त्यांनी जगाच्या आरंभ व अंताबाबत गंभीरतेने विचार करायला हवा. इस्लाम मनुष्यास आचरणाबाबतही स्वातंत्र्य

देतो. मात्र त्याने वागताना दक्षता बाळगायला हवी. त्याच्या हातून असं काही घडायला नको ज्याने समाजात बिघाड निर्माण होईल व त्याचे अहित घडून येईल. पैगंबरांच्या उपदेशानुसार मानवाने एकेश्वरत्त्वात दृढ विश्वास ठेवायला हवा. त्याने केवळ सर्वशक्तीमान एकमेव ईश्वराची उपासना करायला हवी. पैगंबर म्हणत असत की "पृथ्वीतलावर सुधारणा घडवून आणा."

"हे जातीबांधवांनो! अल्लाहची भक्ती करा, त्याच्याशिवाय तुमचा कोणी ईश्वर नाही. तुमच्यापाशी तुमच्या पालनकर्त्याचे स्पष्ट मार्गदर्शन आले आहे, म्हणून वजन व मापे प्रामाणिकपणे करा, लोकांना त्यांच्या वस्तूत कमी देऊ नका आणि सुधारणा झालेल्या या भूतलावर हिंसाचार माजवू नका." *(दिव्य कुरआन - ७ : ८५)*

अर्थात अल्लाहने आपल्या कायद्याद्वारे सुधारणेची अपेक्षा केली आहे. त्याच्या सृजनात बिघाड निर्माण करू नये अशी अपेक्षा आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य

अभिव्यक्ती स्वातंत्र्य मनुष्याचा मूलभूत अधिकार आहे. इस्लामने मनुष्यास हा अधिकार देऊ केला आहे. म्हणून मानवाच्या या अधिकारावर अनुचित दडपण आणायला नको. परंतु त्याने स्वातंत्र्याच्या नावाने अश्लीलता पसरवू नये. कोणाच्याच मनाला दु:ख पोहचवू नये. कोणाचीच चेष्टा करू नये. कोणाचेच नावलौकिक डागळले जाऊ नये, तसेच देशात अवघड परिस्थिती निर्माण करू नये. कोणतेही षड्‌यंत्र रचू नये. अशा प्रकारच्या बंधनांसह त्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्राप्त असते. जगातील एकाही देशात असा कायदा नाही, ज्याच्यावर अशा प्रकारचे बंधन लागू नाहीत. मात्र हल्ली बऱ्याचशा गोष्टींना अश्लील मानले जात नाही.

कौटुंबिक जीवन जगण्याचा आधार

हा सुद्धा माणसाचा अधिकार आहे. या हक्काद्वारे मनुष्य कुटुंबासह एकत्र राहू शकतो. कुटुंब हा माणसाचा स्वाभाविक हक्क आहे. या बाबतीत इस्लामची शिकवणूक अगदी स्पष्ट आहे. म्हणून याबाबत विस्ताराने चर्चा करण्याची गरज नाही. कुटुंब ही अल्लाहकडून मिळालेली कृपा व बक्षीस आहे. माणसाला मुलेबाळे होणे त्याला कष्टमय वाटत नाही. उलट मुलाबाळांच्या जन्मामुळे कुटुंबात आनंद व प्रसन्नता निर्माण

होते. कुटुंबाच्या बाबतीत यापलीकडे अधिक काही बोलायचे राहत नाही. कुटुंब संचालनाबाबत अल्लाहने स्पष्ट आदेश दिलेत व ते कायम राखण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

व्यक्तीगत जीवनाचे अधिकार

एकांत हा माणसाचा एक अधिकार आहे. इस्लामने याबाबत केवळ अधिकारच मानला नसून त्यावर अधिक भर दिली आहे. अपेक्षा अशी केली जाते की कोणीही इतरांच्या व्यक्तीगत जीवनात ढवळाढवळ करू नये. एवढेच नव्हे तर एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तीगत जीवनात कोणत्याच प्रकारचे विघ्न वा अडीअडचणीही निर्माण करू नये. शासनाससुद्धा माणसाच्या व्यक्तीगत जीवनात हस्तेक्षप करता येत नाही.

देश व समाजसेवेचा अधिकार

हा सुद्धा माणसाचा एक मूलभूत अधिकार मानला जातो. इस्लाममध्ये पहिल्यापासून हा अधिकार दिला गेला आहे. माणसाला समाजसेवा व चुकीच्या गोष्टीविरुद्ध टीका करण्याबाबत व सुधारणा घडवून आणण्याचे अधिकार प्राप्त असले पाहिजे. इस्लामने दाखवून दिले आहे की जी व्यक्ती देशाची सेवा करते ती उच्चकोटीची व प्रशंसनीय मानायला हवी. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे,

“सशक्त मुस्लिम अशक्त मुस्लिमांपेक्षा श्रेष्ठतर आहे.”

सशक्त मुस्लिम मानवाची, समाजाची सेवा करील अशी अपेक्षा केली जाते. अशक्त व्यक्तीकडून समाजसेवेची अपेक्षा करता येत नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

“जो मुस्लिम कोणाशीच संबंध ठेवत नाही व त्यांच्यापासून होणारे कष्टही सहन करीत नाही. अशा मुस्लिमांपेक्षा जो लोकांना भेटतो व त्यांचे कष्ट सहन करतो असा मुस्लिम चांगला आहे.”

कुरआनात म्हटले की माणसाचा अधिकार आहे की त्याने समाजाच्या भल्या व कल्याणासाठी काम करावे. ढोंगींना सांगण्यात आले आहे की त्यांच्या बनवेगिरीच्या गोष्टी उपयुक्त नाहीत. हो, पण तुम्ही जर लोकांच्या सुधारणे व भल्यासाठी आदेश देत

असाल व हानीकारक गोष्टी टाळण्याचा प्रयत्न करीत असाल तर ते तुमच्यासाठी चांगले ठरेल व अल्लाह तुम्हाला पारितोषिक देईल.

“लोकांच्या गुप्त कानगोष्टींमध्ये बहुधा काहीही भले असत नाही. परंतु होय जर कोणी दानधर्मासाठी गुप्तरित्या प्रवृत्त केले. अथवा एखाद्या पुण्य कार्यासाठी अथवा लोकांच्या व्यवहारात सुधारणा घडवून आणण्यासाठी एखाद्याला काही सांगितले तर अर्थातच ही चांगली गोष्ट आहे, आणि जो कोणी अल्लाहची मर्जी संपादन करण्यासाठी असे करील त्याला आम्ही मोठा मोबदला प्रदान करु.” *(दिव्य कुरआन - ४ : ११४)*

आत्मरक्षणाचे अधिकार

आजकाल एका गोष्टीची फार चर्चा होते ती म्हणजे आत्मरक्षा! या गोष्टीला संपूर्ण जग स्वीकार करतो की प्रत्येकाला सुरक्षेचा अधिकार आहे. एखादा व्यक्ती कोणाचा जीव घेऊ इच्छित असेल, एखाद्याची आबरू घेऊ इच्छित असेल, कोणाची मिळकत हडप करू इच्छित असेल, कोणाच्या घराला आग लावू इच्छित असेल व एखाद्याच्या कुटुंबावर हल्ला करू इच्छित असेल तर उघड आहे की तो शांत बसणार नाही. त्याचा सामना करील, परंतु या कलहास दोन कारणे असतात. कधीकधी असे घडते की आत्मरक्षा करताना अशा मुद्याबाबत विचार करीत नाही, ज्यांच्याकडे लक्ष देणे आवश्यक असते. कधी असे घडते की दहशतवादाच्या व हिंसाचाराच्या निमित्ताने ती व्यक्ती विरोध वा आत्मरक्षेच्या अधिकारापासून वंचित होते. इस्लाममध्ये आत्मरक्षेचा खुलासा अगदी स्पष्ट केला गेला आहे. अर्थात आत्मरक्षा व मुकाबला कधी व्हायला हवा व कशा प्रकारे व्हायला हवा व त्याची सीमा काय आहे. याचा संपूर्ण खुलासा कुरआन व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उपदेशात आला आहे. आत्मरक्षा माणसाचा मूलभूत हक्क आहे. परंतु आत्मरक्षा व मुकाबल्याच्या नावावर जुलूम व अत्याचार होत असेल तर ते चुकीचे ठरेल. येथे व्यक्तीगत आत्मरक्षेची चर्चा होत आहे. दोन राष्ट्रांमध्ये मुकाबला होत असेल तर त्याबाबत येथे चर्चा अपेक्षित नाही.

दुर्बलाचे अधिकार

लोकतांत्रिक संविधानाची एक अनिवार्य विशेषता अशी आहे की त्यात अल्पसंख्याक व दुर्बल वर्गांना सुरक्षेची खात्री व त्यांना समान अधिकार द्यायला हवेत.

त्यांचे हक्क मारले जाऊ नयेत व त्यांना जुलूम व अत्याचारापासून सुरक्षित करण्याचे उपाय योजिले गेले पाहिजेत.

इस्लामचा प्रसार होण्यापूर्वी दुर्बलांचे अधिकार केवळ अरबस्तानातच नव्हे तर जगात कुठेही सुरक्षित नव्हते. त्यांचे फारच वाईटपणे शोषण होत होते त्यांच्यावर जुलूमाचा अतिरेक होत होता. इस्लामने अगदी सुरुवातीलाच आवाज उठविला व ईशकोपाची जाणीव करून दिली. जगात व परलोकांत जुलमी लोकांच्या होणाऱ्या दुष्परिणामापासून लोकांना जागरूक केले. इस्लामने महिला, दुर्बल, अनाथ, अपंग व प्रौढांच्या अधिकारांची केवळ चर्चा केली नाही तर त्याचबरोबर त्यांना प्रत्यक्षपणे ते उपलब्ध करून दिले. इस्लामने समाजास त्यांच्याशी चांगले वागण्यास प्रेरित केले व सहानुभूती व सहकाराच्या भावना विकसित केल्या.

धार्मिक स्वातंत्र्याचे अधिकार

मानवाधिकाराचे ध्वजवाहक धार्मिक स्वातंत्र्याला सुद्धा मानवाचा एक अधिकार मानतात. इस्लामने अगदी स्पष्ट शब्दांत जाहीर केले आहे. कुरआनात म्हटले आहे. जर अल्लाहची इच्छा असती तर त्याने सर्वच लोकांना आपल्या धर्मात (इस्लाम धर्मात) दाखल करून घेतले असले. मात्र अल्लाहने धर्माच्या बाबतीत मानवाला स्वातंत्र्य दिले आहे व त्याचे हे स्वातंत्र्य सदासर्वदा कायम राहिले पाहिजे. यातच त्याची परीक्षा आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हृदयात ही स्वाभाविक इच्छा होती की ज्यांना ज्यांना ते इस्लामकडे बोलावत त्या सर्वांनी सत्यमार्ग (अर्थात इस्लाम) स्वीकारावा. कुरआनात पैगंबर मुहम्मद (स.) यांना सांगितले आहे,

"हे नबी (स.) लोकांना सरळ मार्गावर आणण्याची जबाबदारी तुमच्यावर नाही अल्लाह ज्याला इच्छितो त्यालाच मार्गदर्शन प्रदान करतो."

(दिव्य कुरआन - २ : २७२)

कुरआनात हे तत्त्व दिले आहे,

"धर्माच्या बाबतीत कोणतीही जोरजबरदस्ती नाही. सत्य असत्यापासून वेगळे केले गेले आहे." *(दिव्य कुरआन - २ : २५६)*

अर्थात आता हे मानवाच्या इच्छेवर आहे की कोणत्या मार्गाचा अवलंब करावा.

कुरआनात म्हटले आहे,

"स्पष्ट सांगून टाका हे सत्य आहे तुमच्या पालनकर्त्याकडून, आता ज्याची इच्छा असेल मान्य करावे आणि ज्याची इच्छा असेल त्याने नाकारावे."

(दिव्य कुरआन - १८ : २९)

कुरआनात म्हटले आहे की धर्मावर चर्चा होऊ शकते, परंतु वार्तालाप शिष्टाचाराच्या चाकोरीत झाला पाहिजे. यात असे म्हटले आहे की जर धर्मावर चर्चा करावयाची असेल तर ती योग्यरित्या व शिष्टाचाराच्या नियमानुसार झाली पाहिजे. चर्चा चुकीच्या मार्गाने व अशोभनीय पद्धतीने होता कामा नये. विद्वानांनी म्हटले आहे की जर एखादी मुस्लिमेतर व्यक्ती, इस्लामी राज्यामध्ये उघड उघड सांगत असेल की तो कुरआन व पैगंबर मुहम्मद (स.) त्यांना मानत नाही, तरीही इस्लामी राज्य त्याच्याविरुद्ध कोणतीच कारवाई करणार नाही. होय, पण तो अश्लील शब्द वापरत असेल तर मात्र त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाईल. पैगंबर मुहम्मद (स.) किंवा माननीय मूसा (अ.), माननीय ईसा (अ.) वा इतर कोणत्याही पैगंबरांप्रति निरादर दाखविल्यास ती व्यक्ती शिक्षेस पात्र मानली जाईल. तसेच कोणत्याही धर्माच्या वरिष्ठ धर्मगुरूबद्दल अपमानजनक वर्तन केल्यास तो शिक्षेस पात्र मानला जाईल आणि त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल.

खरे म्हणजे जे अधिकार एखाद्या व्यक्तीस किंवा वर्गास मिळायला हवे ते इस्लाम सर्वांना प्रदान करतो व माणसाच्या स्वाभाविक अधिकारांची योग्य प्रकारे पूर्तता करतो. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे केवळ जगातच नव्हे तर परलोकांतही यश प्रदान करण्याची इस्लाम हमी देतो.

दुर्बलांच्या समस्या व इस्लाम

धर्म दुर्बलांचा शत्रू आहे काय?

दुष्प्रचारात जबरदस्त शक्ती असते. याने असे वातावरण निर्माण होते की त्यांच्याविरुद्ध काय करावे हे लक्षात येत नाही. एखाद्याच्या चुकीच्या प्रचारामुळे वास्तविकता बदलत नाही, मात्र एकाच गोष्टीचा पुन्हा पुन्हा उच्चार केल्यास कधीकधी समंजस व बुद्धिमानही बहकले जातात व त्या गोष्टीवर विश्वास करू लागतात. मात्र अशा प्रकारे एखादी खोटी बाब खरी होत नाही. चुकीची गोष्ट चुकीचीच राहते. सत्य बाब सत्यच राहते. धर्माविरुद्ध हा दुष्प्रचार पूर्वीपासून होत आला आहे व आजही होत आहे की तो श्रीमंत लोकांचा प्रतिनिधी आहे. प्रभावशाली लोकांचा मित्र व समर्थक आहे. दुर्बलांना गुलामीत ठेवणारा व त्यांचे शोषण करण्याचा एक सशक्त मार्ग आहे. धर्म अफूची गोळी व मार्फियाचे इंजक्शन आहे, जे याकरिता लावले जाते की दुर्बलाच्या शरीरातील उरलेले थोडे-फार रक्तहीचे शोषिले जावे व त्याला त्याची जाणीवही होऊ नये. जी व्यक्ती पूर्वीपासूनच सशक्त आहे ती अधिक धडधाकट व्हावी, जी समाजात रक्तपात करीत राहील.

जगात बरेच धर्म आहेत. इस्लामलाही त्यांच्यापैकी एक धर्म मानले जाते. विषयांतर करून एक गोष्ट सांगणे उचित होईल, ती म्हणजे इस्लाम सामान्य धर्म नसून तो एक दीन (जीवनव्यवस्था) आहे, ज्याची अपेक्षा अशी आहे की मानवाने संपूर्ण जीवन अल्लाहच्या आदेशानुसार व्यतीत करावे. अज्ञान व गैरसमजामुळे जेव्हा धर्मावर आक्षेप केला जातो तेव्हा इस्लामही त्यात गुरफटला जातो. दुर्दैवाने आता तर इस्लामाविरुद्ध सर्वात जास्त टीका केली जाते. दूसरे धर्म आंशिकरूपात दोषयुक्त मानले जातात. दुष्प्रचार करणाऱ्यांचे काहीच नुकसान होत नाही, उलट फायदाच होतो. इस्लामवर सर्वात जास्त टीका होण्याचे कारण आहे की जगातील धर्मांत इस्लाम सर्वात अधिक सशक्त व प्रभावशाली धर्म आहे. इस्लाम धर्मातील लोकांची त्यावर इतकी दृढ श्रद्धा असते की त्याच्या तुलनेत इतर कोणत्याच धर्माची पकड एवढी मजबूत नाही. इस्लामविरुद्ध दुष्प्रचार करण्याचे एक कारण आहे की इस्लाममध्ये परिवर्तनाची जितकी शक्ती व क्षमता आहे तितकी कोणत्याच धर्मात नाही. त्यामुळे इतर कोणत्याही धर्मात व

विचारधारेत इतकी शक्ती वा प्रभाव नाही की ते संद्यस्थितीत इस्लामच्या विरोधात उभे राहून इस्लामला भयभीत करू शकतील.

इस्लामचा एक क्षुल्लक विद्यार्थी असून मी सांगण्याचे धाडस करू इच्छितो की उपरोक्त अपप्रचार अगदी निराधार आहे. दोषारोप करण्याकरिता एखादा बिनबुडाचा दोष शोधला जातो व राईचे पर्वत उभारण्याचे प्रयत्न केले जातात. परंतु दांडगे प्रयत्न करूनही कोणताच आधार हाती लागत नाही. निराधार आरोपाचे त्याला एक उदाहरण मानले जाईल.

दुर्बलाची बाजू मांडणे

इस्लाम दुर्बलाचा प्रतिनिधी वा वकील आहे असे म्हटल्यास ते चुकीचे होणार नाही. इस्लामने दुर्बलाचा पक्ष घेऊन काही चूक केली आहे असे म्हणता येणार नाही, उलट असे म्हणता येईल की एका योग्य व वैध कार्याची बाजू हाती घेतली आहे. आजपर्यंत त्याच्या पक्षात म्हटले जाते व पुढेही म्हटले जाण्याची संभावना आहे, असे वाटते की त्यांच्यात काहीच नवे नाही उलट ते सर्वकाही इस्लाममधूनच घेतले जाते.

दुर्बलांच्या अधिकारांची रक्षा करणे

इस्लाम केवळ दुर्बलांचा कैवारीच नाही तर त्यांच्या अधिकारांचा रक्षक व त्यावर नजर ठेवणारा आहे. इस्लामच्या प्रसारापूर्वी दुर्बलांना कोणताच अधिकार नव्हता. तो अशा प्रकारे जीवन कंठत होता की मृत्यूनंतर त्याला निश्चिंतपणे झोपता येईल. त्याचे शरीर व प्राण नेहमीच संकटाने व कष्टाने घेरलेले असायचे. त्याच्यावर जे अन्याय व अत्याचार होत होते त्यांची सुनावणी कोणत्याच कोर्टात होत नव्हती. त्याचे अस्तित्त्व लोकांची सेवा व आरामाकरिता होती. ते मात्र स्वत:च्या आराम व सुखाकरिता कोणतेच साधन नव्हते. समाजात त्यांचा स्तर एवढा खालावला गेला होता की त्यांना स्वत:च्या अस्तित्त्वाची लाज वाटत होती. त्यांना स्वत:बद्दल घृणा व तिरस्कार वाटू लागला होता. त्यांची विद्यमान स्थितीही काही वेगळी नाही. होय, मात्र आता त्यांची, त्यांच्या स्थितीबाबत बरीच चर्चा होऊ लागली आहे. कधीकधी असे वाटते की त्यांच्या वाईट दिवसाचा अंत होईल आणि दु:ख व अत्याचारापासून त्याना मुक्ती मिळेल. परंतु हे केवळ एक दिवास्वप्न आहे. दुर्बलांबाबत सहानुभूती प्रकट करणे व त्यांच्या

समर्थनाचे ढोंग करणे, त्यांच्या अधिकारांसाठी घोषणा देणे, त्यांच्या कैवारासाठी भाषण करणे व पत्रके काढणे, उपदेश व कैवार दर्शविणे, या सर्व गोष्टी खूप सोप्या आहेत. यासाठी कोणत्याच कष्टाची, त्यागाची वा समजून उमजून निर्णय घेण्याची गरज नाही. हेच कारण आहे की स्वार्थी व संधीसाधू लोक याचे श्रेय घेण्यास मागे राहत नाही. या वाहत्या गंगेत दुर्बलांचे शत्रूही हात धुवून घेण्यात मोठेपणा समजतात. ते एवढी मोठी आश्वासने देतात की बिचारा दुर्बल गट आपल्या भोळेपणामुळे त्यांना आपला हितकर्ता समजू लागतो. उघड आहे की या खोट्या हितकर्त्याच्या आधाराने दुर्बलांच्या समस्या सुटणार नाहीत. त्यांचे कष्ट आजही जसेच्या तसे आहेत व उद्याही तसेच राहणार आहेत. ते त्याच्या आर्थिक राजनैतिक, सामाजिक, बौद्धिक व नैतिक स्थितीत भविष्यात विशेष परिवर्तनाची आशा धरू शकत नाही. त्याचे शोषण करणारे व त्यांना लुटणारे वेश बदलून वेगवेगळे नाव धारण करून खोटी सहानुभूती व आश्वासने देऊन फसवेगिरीने शोषण करीत राहतील.

इस्लामने दुर्बलांना त्यांच्याकडून हिसकावून घेतलेले अधिकार बहाल केलेत व त्यांच्यावर होणाऱ्या जुलूम व अत्याचारांचा अंत केला. त्यांच्यात हिम्मत व धैर्य निर्माण केले आणि त्यास सन्मानित जीवन प्रदान केले. इस्लाम त्यांच्याकरिता कृपेचे छत्र सिद्ध झाला आहे. याने त्यांच्या मृत शरीरात पुन्हा जिवंतपणा आला आहे. त्यांना अशी शांती व सांत्त्वण मिळाली आहे की ज्याची त्यांनी कधी कल्पना ही केली नव्हती.

समस्यांची परिपूर्ण कल्पना

दुर्बल व त्यांच्या समस्याची सर्वत्र चर्चा आहे व त्यांची सुधारणा करण्याचे उपाय व प्रयत्नही होत आहेत. परंतु हे सारे प्रयत्न त्यांच्या आर्थिक समस्येवर केंद्रित आहेत. असे समजले जाते की दुर्बलाची मूळ समस्या आर्थिक कमकुवतपणा आहे. जर या समस्येचे समाधान झाले तर इतर समस्यांचे आपोआप निराकरण होईल. ही दुर्बलांची समस्याच नव्हे, तर इतर मानवांच्याही समस्यांची सीमित कल्पना आहे. यात शंका नाही की आर्थिक समस्या ही महत्त्वाची समस्या आहे, परंतु हेही सत्य आहे की मानव हा आर्थिक पशु नाही की जितके अधिक व चांगल्या प्रकारचा चारा दिल्याने, तो धष्टपुष्ठ होईल. भोजन, वस्त्र, निवास, शिक्षण, चिकित्सा या मानवाच्या महत्त्वाच्या

गरजा आहेत. त्यांच्याकडे लक्ष पुरविणेही आवश्यक आहे. परंतु असा विचार बाळगणे की केवळ याच त्यांच्या समस्या आहेत. या समस्यांचे निराकरण झाल्यानंतर तो पूर्णतः संतुष्ट होईल ही फोल कल्पना आहे. त्यांची आर्थिक अडचण, राजनैतिक, सामाजिक, बौद्धिक, वैचारिक, शारीरिक, भौतिक, नैतिक व आध्यात्मिक अशा अनेक समस्या आहेत, जी व्यक्ती उपाशी, वस्त्रहीन आहे ती निश्चितच आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे. परंतु जी व्यक्ती धनाढ्य असून असाध्य रोगांनी त्रस्त आहे त्याची समस्या आर्थिक नाही, त्याची समस्या मनोवैज्ञानिक आहे. त्याला धनदौलत नाही, मानसिक उपचाराची गरज आहे. एखादी महिला जिच्याकडे भरपूर धनदौलत आहे व तिच्या तारूण्यातच तिच्या पतीचा मृत्यू झाला, तिला समाजसुरक्षा, आबरूरक्षण व सन्मान हवा असतो. जर एखाद्या व्यक्तीकडे भरपूर पैसा आहे पण तो वाईट गुणाच्या अधीन असेल तर त्याचे दौर्बल्य आर्थिक नसून नैतिक आहे. त्याला खाण्यापिण्याची चिंता नाही. नैतिक सुधारणेची व चांगल्या शिक्षणाची गरज आहे. इस्लामच्या दृष्टिकोनानुसार मानवाच्या सर्व प्रकारच्या कमकुवतपणाचे निराकरण होणे आवश्यक आहे. इस्लाम गरीबांचा व सर्व प्रकारे मागासलेल्या व परिस्थितीने नडलेल्या व्यक्तींची मदत करू इच्छितो. मजूर व बंधकांना सहाय्य करू इच्छितो, महिला व विधवांचे प्रश्न सोडवू पाहतो. अनाथांना आश्रय देऊन सन्मानाचे जीवन देऊ करण्याचे प्रयत्न करतो. आजारी, अपंग व वृद्धांना मदत करून त्यांचे कष्ट दूर करण्याचे व त्यांच्याशी सहानुभूतीचे व्यवहार करू पाहतो. त्या दृष्टिकोनातून प्रत्येक गरजू व त्रस्त माणसाची मदत होणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या अडीअडचणीत अडकलेल्या माणसाची मदत करणे इस्लामचे उद्दिष्ट आहे.

दुर्बलव्यक्ती व दुर्बल वर्ग दोहोंना मदत

हल्ली जग दुर्बल व सशक्त अशा दोन गटांत विभागला गेला आहे. ज्या वर्गाकडे सामर्थ्य व सत्ता आहे तो दुर्बल गटाचे भरपूर शोषण करीत आहे. त्यावर अशी अवस्था आहे की प्रत्येक वर्गात व देशात दोन्ही प्रकारचे अर्थात सशक्त व अशक्त गट आहेत. सशक्त लोक दुर्बल लोकांकडून नको तितका स्वतःचा फायदा करून घेत आहेत व दुर्बलांना त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवत आहेत. हे दोन्ही वर्ग एकमेकांचे प्रतिद्वंदी झाले आहेत. दोहोंमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओढाताण

सुरू आहे. आता त्यांच्या समस्यासुद्धा वर्गीय व जातीय झाल्या आहेत. याच स्वरूपात त्यांच्याबद्दल विचारही केला जातो. अशा प्रकारे हा विषय दुर्बल व्यक्तीचा राहिलेला नाही. तो दुर्बल वर्गाचा झाला आहे. परंतु येथे दोन विशेष व महत्त्वाच्या सत्य परिस्थिंतीकडे दुर्लक्ष केले जात आहे. ज्या वर्गास आपण संपन्न व संतुष्ट (अर्थात उच्चवर्ग) मानतो, त्याच्यात काही व्यक्ती अशा असू शकतात ज्यांना आमच्या सहानुभूतीची गरज असेल. अशाच प्रकारे ज्या वर्गास आपण दुर्बल (अर्थात निम्नवर्ग) समजतो, त्यांच्यातही काही खुशहाल व संतुष्ट व्यक्ती असू शकतात. ही वास्तविकता आहे हे आपण लक्षात घ्यायला हवी. जर आम्ही वर्गाचा विचार केला तर अधिक दुर्बल लोकांकडे आम्ही दुर्लक्ष करतो, त्यामुळे ते आमच्या सहानुभूती व सहायतेपासून वंचित राहतात. दुसरी गोष्ट अशी की आमच्या समोर केवळ आर्थिक मागासलेल्याचा विचार नसावा, आम्ही मानवाच्या मागासलेपणाचा व्यापक दृष्टिकोनातून विचार करायला हवा. तसे केल्यास आपल्या लक्षात येईल की जगातील प्रत्येक व्यक्तीला एका दुसऱ्याच्या मदतीची गरज आहे. मग तो कोणत्याही वर्गाचा असू द्या. आजारपण, अपंगत्त्व, म्हातारपण, शारीरिक दुर्बल्य व शारीरिक व वित्तीय नुकसान कोणाला भोगावा लागत नाही. अशा परिस्थितीत कोणीच नैतिक व कायद्याच्या दृष्टीने गरजवंत नसतो?

इस्लाम कोणत्याही वर्गाचे शोषण मान्य करीत नाही. मात्र तो दुर्बलास दुर्बलाच्या दृष्टिकोनातून पाहतो व ज्या ज्या वेळी त्याला ज्या ज्या प्रकारची मदत हवी असते ती त्याला देण्याचा प्रबंध करून देतो.

दुर्बल इस्लामच्या दृष्टिकोनातून

जगात राजे, धनवान व सधन लोकांचे वर्चस्व राहिले आहे. त्यांनाच नेतृत्व व मार्गदर्शनाचे अधिकार प्राप्त होते व त्यांचे स्वभाविक अधिकार मानले जात होते. समाजातील दुर्बलांना इच्छा असो व नसो त्यांच्या मागे चालावे लागत असे. त्यांच्याविरुद्ध चालण्याची कोणालाच अनुभूती नव्हती. कोणीही स्वत:च्या व दुसऱ्यांच्या भल्यासाठी काम करण्याचे प्रयत्न केल्यास ती बंडखोरी समजली जात होती व त्यांना पूर्ण शक्तीने दाबून टाकण्यात येत होते. इस्लामने या मानसिकतेला चुकीचे ठरवून नेतृत्वाचा संबंध सधनता व सामर्थ्यावर नसून वास्तविक नेतृत्व अल्लाहचे पैगंबर यांना प्राप्त आहे असे मानते. समाजातील दुर्बल घटक व व्यक्ती आपल्या समस्यांचे निराकण याच कल्पनेत मानतात, व पूर्ण निष्ठेने या कल्पनेचा स्वीकार करतात.

पैगंबर सुसंपन्न व सत्ताधारी लोकांतून नसतात

जगात अनेक पैगंबरांचे आगमण झाले. विविध काळांत व विविध भूभागांत त्यांना अल्लाहने जन्म दिला. त्यांचे चारित्र्य आरशासारखे स्वच्छ व उज्ज्वल होते. त्यांच्या आचरणावर कोणीही कोणताच कलंक पाहिला नाही. त्यांचे विरोधकही त्यांच्या चारित्र्याच्या महानतेची साक्ष देतात. त्यांचा संबंध चारित्र्यवान व सन्मनित जमातीशी असे व स्वत:ही सन्मानित मानले जात होते. मात्र ते आर्थिकदृष्ट्या फार सधन नव्हते. त्यांचासंबंध सुसंपन्न व सुखोपभोगी वर्गाशी नसे. ते मध्यम वा निम्न वर्गातील असत. त्यांचे जीवन भोग-विलासापासून अलिप्त असे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अल्लाहच्या दीनकडे लोकांना आमंत्रित केले तेव्हा अरब सरदाराने म्हटले,

"म्हणतात, हा कुरआन दोन्ही शहरांच्या मोठ्या माणसांपैकी कुणावर का अवतरला गेला नाही?" *(दिव्य कुरआन - ४३ : ३१)*

अल्लाहचे पैगंबर मूसा (अ.) यांना पाहून फिरऔन म्हटला होता,

"यांच्यावर सुवर्ण कंकण का उतरविले गेले नाहीत? अथवा ईशदूतांचे एक पथक त्याच्या दिमतीला का आले नाही." *(दिव्य कुरआन - ४३ : ५३)*

अशा शुद्ध भौतिक व जागतिक कल्पनांची कुरआनात बऱ्याच ठिकाणी भर्तर्सना केली आहे.

पैगंबर जनसामान्यांना संबोधित करतात

जगात जितके पैगंबर आले त्या सर्वांनी इस्लामचाच प्रचार केला. हा प्रचार अगदी जाहीर असायचा, अर्थात हा प्रचार सर्वांसाठी असे. ते ज्या लोकांत व ज्या विभागांत येत असत तेथील सर्व लोकांना अल्लाहच्या दीनकडे आमंत्रित करत. सधन, दीनदुर्बल, शासक, जनता, राजा, सर्वांना ईशसंदेश दिला जात असे. त्यांच्या हाकेस सर्व वर्गांतील लोकांचा प्रतिसाद मिळे. ते कोणाशीच पक्षपात करत नसत. ते सर्वांचे कल्याण इच्छित व सर्वांनी सरळ मार्ग अवलंबावा असे उपदेश देत.

दुर्बल समाजाप्रति अधिक आकर्षण

हे एक सत्य आहे की प्रत्येक काळात समाजातील दुर्बल व्यक्ती व जनसमूहाने पैगंबरांना साथ देण्यात व इस्लाम स्वीकारण्यात सहकार केला. जे लोक भोग-विलासात लोळत होते, आराम व सुखात जीवन व्यतीत करीत होते व ज्यांच्या हातात सत्ता होती त्यांनी इस्लाम व पैगंबरांच्या शिकवणींकडे लक्ष दिले नाही. उलट ते इस्लामच्या शिकवणीचे विरोधक होते. मात्र काही शासक या गोष्टीला अपवादही होते व जगातील कोणताही वर्ग अशा प्रकारच्या सद्‌वृत्तीच्या लोकांपासून रिक्त नसतो. निस्संदेह आराम, सुख व भोग-विलासाच्या जीवनाचा त्याग करून सर्व प्रकारच्या सामाजिक बंधनांची पर्वा न करता त्यांनी इस्लामच्या पैगंबरांची साथ दिली. कुरआनात म्हटले आहे,

"कधी असे घडले नाही की आम्ही एखाद्या वस्तीत एक सावध करणारा पाठविला आणि त्या वस्तीच्या सुखवस्तु लोकांनी हे म्हटले नाही की, "जो संदेश तुम्ही घेऊन आलात तो आम्ही मानत नाही." त्यांनी सदैव असेच म्हटले की, "आम्ही तुमच्यापेक्षा अधिक संपत्ती व संतती बाळगतो आणि आम्ही कदापि शिक्षा भोगणार नाही."

(दिव्य कुरआन - ३४ : ३४-३५)

शासक व सुसंपन्न वर्गाने धर्माच्या बाबतीत अशी बेपर्वाही दाखविण्याची अनेक कारणे होती. एक तर असे की त्यांना घमेंड होती की जगाचे भरपूर ज्ञान त्यांना प्राप्त आहे. ते सर्वात बुद्धिमान व इतरांना मूर्ख व नादान समजत असत. ते केवळ संपत्तीलाच नव्हे तर सत्य व प्रामाणिकपणासही आपल्या घराची मोलकरीन समजत. माननीय नूह (अ.) अल्लाहचे महान पैगंबर होते. जेव्हा सदाचारी लोकांनी त्यांना साथ दिली तेव्हा तत्कालीन सरदार म्हणत,

त्या जमातीचे सरदार ज्यांनी त्यांच्या शब्दांचा स्वीकार न करता, म्हटले की "आमच्या दृष्टीत तर तुम्ही यापेक्षा वेगळे काही नाही की तुम्ही केवळ एक मनुष्य आहात आमच्यासारखे आणि आम्ही पाहात आहोत की आमच्यापैकी केवळ त्या लोकांनी जे आमच्या येथे कनिष्ठ होते त्यांनी विचार न करता तुमचे अनुकरण स्वीकारले आहे आणि आम्हाला अशी कोणतीही गोष्ट आढळत नाही की ज्यांत तुम्ही लोक आमच्यापेक्षा काही पुढारलेले आहात, उलट आम्ही तर तुम्हाला खोटे समजतो."

(दिव्य कुरआन - ११ : २७)

त्यांची इच्छा होती माननीय नूह (अ.) यांनी त्या लोकांना आपल्या सोबत घेऊ नये. माननीय नूह (अ.) यांनी त्यांच्या बिनबुडाच्या गोष्टींचे उत्तर दिले.

"माझा मोबदला तर अल्लाहपाशी आहे, आणि मी त्या लोकांना पिटाळू शकत नाही. ज्यांनी माझे ऐकले आहे, ते स्वत: आपल्या पालनकर्त्याच्या पुढे हाजर घेणार आहे. परंतु मी पाहात आहे की तुम्ही अडाणीपणा करीत आहात. आणि हे देशबधुंनो, जर मी या लोकांना हाकलून लावले तर अल्लाहच्या तावडीतून मला वाचविण्यासाठी कोण येईल? तुम्हा लोकांना एवढी गोष्ट देखील कळत नाही का? आणि मी तुम्हाला सांगत नाही की माझ्या जवळ अल्लाहचे खजिने आहेत, हे देखील सांगत नाही की मला परोक्षाचे ज्ञान आहे, हा सुद्धा माझा दावा नाही की मी दूत आहे आणि हे देखील मी सांगू शकत नाही की ज्या लोकांना तुमचे डोळे तुच्छतेने पाहतात त्यांना अल्लाहने कोणताच भलेपणा दिला नाही, त्यांची मन:स्थिती अल्लाहच अधिक चांगली जागतो, जर मी असे म्हटले तर अत्याचारी ठरेन." *(दिव्य कुरआन - ११ : २९-३१)*

दुर्बलांनी अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांना साथ दिली

हे एक ऐतिहासिक सत्य आहे की पैगंबर मुहम्मद (स.) जेव्हा पैगंबर झाले तेव्हा सुरवातीच्या काळात अधिकांश दुर्बलांनी त्यांना साथ दिली. याबाबत माननीय अबू सुफियान (रजि.) यांनी शाम (सीरिया)चे शासक हिरक्कल ला सांगितले होते. (अबू सूफियान यांनी तोपर्यंत इस्लाम स्वीकारला नव्हता.) हिरक्कल ने विचारले,

"समाजातील प्रतिष्ठित लोक मुहम्मद (स.) यांचे अनुयायी झालेत की समाजातील निम्न स्तरातील लोक?"

माननीय अबू सूफियान (रजि.) यांनी उत्तर दिले,

"समाजातील दुर्बल त्यांची साथ देत आहेत."

एक प्राचीन इस्लामी इतिहासकार इब्ने इसहाक यांनी स्पष्टपणे अबू सूफियान (रजि.) यांचे कथन उद्‌धृत केले आहे.

"आमच्यातले जे दुर्बल व गरीब आहेत ते त्यांना साथ देत आहेत. समाजातील प्रतिष्ठित व सन्मानित लोक त्यांना साथ देत नाहीत." (फत्हुल-बारी ७/३६)

हे ऐकून हिरकलने उत्तर दिले.

"पैगंबरांचे अनुयायी हेच (दुर्बल लोक) असतात." (हदीस : बुखारी)

कुरआनचे व्याख्याकार व इतिहासकार अल्लामा इब्ने-कसीर अतिशय सुप्रसिद्ध व उच्च दर्जाचे व्यक्ती होते. ते म्हणतात -

"पैगंबर (स.) यांना सुरुवातीला ज्या लोकांनी साथ दिली त्यात बरेचसे दुर्बल पुरुष, महिला, गुलाम व दासी वगैरे लोक होते. उच्चवर्गातील फार थोडे लोक त्यांचे अनुयायी होते." (तफ्सीर इब्ने कसीर, २/१५४)

कुरैश सरदार तसेच धनीमानी लोकांत हा संभ्रम होता की जर मुहम्मद (स.) यांचा दीन (धर्म) सत्य आहे तर तो गरीब व दुर्बलांमध्ये का पसरत चाललाय व आम्ही आतापर्यंत त्या दीन पासून का दूर आहोत?

"ते समजत होते की दीन (धर्म) आणि जगातील उन्नती व ऐश्वर्य तर त्यांच्या नशिबी आहे. ज्ञान, विवेक व बुद्धिमत्तेवर तर त्यांना वारसाहक्काने अधिकार प्राप्त झाला आहे. जर या धर्मात काही भले व कल्याणकारी असते तर ते त्यापासून दूर राहिले नसते."

कुरआनच्या शब्दांत,

"जर या ग्रंथात मानणे काही चांगले काम असते तर हे लोक या बाबतीत आमच्यावर मात करू शकले नसते." *(दिव्य कुरआन - ४६:११)*

कुरैश सरदार टीका करीत असत की जर हे कल्याणकारी मार्गावर आहेत तर ते नग्न, उपाशी व दुरावस्थेत का आहेत? यांची परिस्थिती का सुधारत नाही. आमची वर्तमान प्रतिष्ठा व संपन्नता या गोष्टीची साक्ष नाही का, की अधिक बुद्धिमत्ता व ज्ञान आम्हाला प्राप्त आहे. आम्ही सत्यनिष्ट आहोत व या मूर्ख व नादान लोकांनी चुकीचा मार्ग निवडला आहे. कुरआन अशा विचारांच्या मानसिकतेला अशा प्रकारे स्पष्ट करतो,

"या लोकांना जेव्हा उघडउघड वचने ऐकविली जातात तेव्हा नकार देणारे

ईमानधारकांना म्हणतात, सांगा आम्हा उभय पक्षापैकी कोण उत्तम स्थितीत आहे.''

(दिव्य कुरआन - १९ : ७३)

कुरैश सरदारांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सेवेत जेव्हा माननीय खब्बाब, माननीय बिलाल (रजि.), माननीय अम्मार (रजि.) व माननीय जैद (रजि.) इत्यादी गुलामांना व इतर निम्न दर्जाच्या लोकांना पाहिले, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांना सांगितले की ''हे आहेत काय तुमचे साथीदार! संपूर्ण समाजात तुम्हाला हेच लोक मिळालेत? यांच्यावरच काय ईश्वराची कृपा झाली आहे? या प्रकारच्या जनसमूहाने तुम्ही खूश व संतुष्ट आहात? जर तुम्ही या लोकांना बाजूस सारून देत असाल तर आम्ही तुमचे म्हणणे ऐकायला व त्यावर विचार करायला तयार आहोत.''

कुरआन दुर्बल व निस्सहाय लोकांना कवटाळत आला आहे. पैगंबरांनी कुरैश सरदारांना विशेष सन्मान देण्यास नकार दिला. कारण त्याने त्यांचा गर्व अधिक वाढला असता. कुरआनाने आदेश दिला,

''जे लोक आपल्या पालनकर्त्या या अहोरात्र धाव करीत असतात, त्याची प्रसन्नता प्राप्त करण्यात लीन असतात त्यांना आपल्यापासून दूर करू नका. त्यांच्या हिशोबातील कोणत्याही गोष्टीचा भार तुमच्यावर नाहीत. तुमच्या हिशोबातील कोणत्याही गोष्टीचा भार त्यांच्यावर नाही. यावरही तुम्ही त्यांना दूर लोटले तर तुमची अत्याचारी लोकांत गणना होईल. खरे पाहता आम्ही अशा तऱ्हेने या लोकांपैकी काहींना काहींच्या द्वारे परीक्षेत टाकले आहे. जेणेकरून त्यांनी त्यांना पाहून म्हणा, हेच लोक आमच्यातील लोक आहेत ज्यांच्यावर अल्लाहची दया व कृपा झाली आहे. होय! काय अल्लाह आपल्या कृतज्ञ दासांना त्यांच्यापेक्षा अधिक जाणत नाही?'' *(दिव्य कुरआन - ६ : ५२-५३)*

कुरआनात दुसऱ्या ठिकाणी म्हटले आहे,

''आणि आपल्या मनाला त्या लोकांच्या सानिध्यात संतुष्ट करा जे आपल्या पालनकर्त्याच्या प्रसन्नतेचे इच्छुक असून सकाळ संध्याकाळी त्याला साद देत आहेत. त्यांच्याकडून कधी दृष्टि वळवू नका. काय तुम्ही भौतिक शोभा पसंत करता? कोणत्याही अशा व्यक्तीची आज्ञा पाळू नका ज्याच्या हृदयाला आम्ही आमच्या स्मरणापासून बेसावध केले आहे आणि ज्याने मानमानी अनुसरण अंगिकारले आहे आणि ज्याची कार्यपद्धती न्यूनधिक्क्यावर आधारलेली आहे.''

(दिव्य कुरआन - १८ : २८)

इस्लामी कायद्यानुसार दुर्बलांना सोयी

इस्लामने दुर्बलांच्या बाबतीत जी नीती स्वीकारली आहे. तिचा संबंध व्यक्तीगत, सामाजिक व राजनैतिक इत्यादी स्तरावर आहे. धर्माचे नाव येताच पूजापाठ, कठोर साधना, तपस्या, कर्मकांड, रिती-रिवाज, बंधने व कठीण जीवनाचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते व मनुष्य विचारांत पडतो की धर्म माणसाच्या सुधारणा व प्रशिक्षणासाठी तसेच त्याच्या दु:खांच्या उपचारासाठी आहे की त्यांच्या इच्छा-आकांक्षाचे दमन करून आत्मक्लेश निर्माण करण्यासाठी आहे? त्याचे नाजुक शरीर व प्राण भौतिक जबाबदाऱ्यांसह धार्मिक बंधनांचे पालन करू शकेल की नाही? नंतर तो निराश होऊन, त्यास आपले दुर्भाग्य समजून तर कधी सौभाग्य समजून धार्मिक बंधणाची पर्वा न करता मुक्त होऊन जागतिक भानगडींमध्ये गुंतला जातो.

इस्लामने धर्माच्या नावाने जी अनुचित बंधने होती त्यांना संपुष्टात आणले. कुरआनात पैगंबर मुहम्मद (स.) यांची एक विशेषता स्पष्ट केली आहे,

"आणि त्यांच्यावरून ते ओझे उतरवितो जे त्यांच्यावर लादलेले होते आणि त्यांना त्या बंधनातून ज्यामध्ये ते जखडलेले होते." *(दिव्य कुरआन - ७ : १५७)*

कुरआनचे अध्ययन करताना पुन्हा पुन्हा जाणीव होते की त्याचे अवतरण करणारा (अल्लाह) अत्यंत माहीतगार, तत्त्वज्ञानी आणि अत्यंत दयाळू व कृपाळू आहे. त्याला मानवाच्या सामर्थ्य व क्षमतेचे ज्ञान आहे आणि त्याला माणसाचा कमकुवतपणा, विवशता व त्याची सीमा माहीत आहे. सारांश, त्यास मानवाचे गुण व दोषांबद्दल पूर्ण कल्पना आहे. त्याचे आदेश पुरुष, स्त्रिया, तरूण, म्हातारे, विद्वान, अशिक्षित, शासक, जनता, धनवान, दरिद्री, मालक, मजूर, रोगी, निरोगी, प्रवासी, निवासी, सर्वांसाठी आहेत. त्याने सर्वांना आवश्यक सूट व सोयी दिल्या आहेत.

जबाबदारी व कर्तव्यांचे ओझे सामर्थ्यानुसार

इस्लाम धर्मात माणसाच्या सामर्थ्यानुसार जबाबदारी देण्यात आली आहे. ज्या व्यक्तीत जितकी शक्ती व क्षमता असेल तेवढीच जबाबदारी त्याला सोपविण्यात येते. जे कार्य त्याच्या शक्तीबाहेर असेल ते त्याच्या जबाबदारीच्या बाहेर मानले जाते. कुरआनात अत्यंत स्पष्ट शब्दांत म्हटले आहे,

"अल्लाह कोणाही व्यक्तीवर त्याच्या शक्तीपेक्षा जास्त जबाबदारी सोपवीत नाही."
(दिव्य कुरआन - २ : २८६)

कोणत्याही कामास पूर्णत्त्वास नेण्याची शक्ती व प्रत्यक्ष पूर्ण करण्याची शक्यता यात अंतर आहे. एखादी व्यक्ती अशी असते जी शंभर किलो वजन पाठीवर घेऊन पाच-सात किलोमीटर सहज चालू शकते. मात्र जोपर्यंत तो आपली संपूर्ण शक्ती त्या कामास लावत नाही तोपर्यंत तो शक्य नाही. कदाचित इतके वजन नेताना त्याची कंबर मोडली जाईल व नंतर तो ओझे पाठीवर घेण्यालायक राहणार नाही. याला काम करण्याची शक्ती मानता येणार नाही. शक्ती त्यास म्हटले जाते की मनुष्य दिलेले काम सहजपूर्ण करू शकतो व त्याला ते काम करताना कोणतेही कष्ट करावे लागत नाही.

कुरआनात म्हटले आहे,

"अल्लाह ने धर्मात कोणतीही अडचण ठेवली नाही."

(दिव्य कुरआन - २२ : ७८)

सांगण्याचे तात्पर्य असे की इस्लामी कायद्यात अशी अडचन व कष्ट निश्चित करण्यात आलेले नाही की ज्या तुम्ही पार पाडू शकणार नाही. जेव्हा एखाद्याला कोणतेही काम सोपविले जाते व ते अतिशय कष्टदायक ठरते तेव्हा त्यास थोडी सवलत देणे आवश्यक असते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे,

"मला दीने हनीफ (विशुद्ध धर्म) देऊन पाठविण्यात आले आहे, ज्याच्यात सवलती व सहजता आहे."
(हदीस : मुसनद अहमद)

कुरआनात ईशभय बाळगण्याचा आदेश देण्यात आला आहे. त्यासोबत हेही म्हटले आहे.

"अल्लाह तो आहे ज्याच्याशिवाय कोणीही ईश्वर नाही, म्हणून श्रद्धावंतानी अल्लाहवरच भिस्त ठेवली पाहिजे."
(दिव्य कुरआन - ६४ : १३)

मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

"जेव्हा मी तुम्हाला कोणतेही काम सोपवीन तेव्हा आपल्या शक्तीनुसार पार पाडा व जेव्हा एखादे काम न करण्याचे आदेश देईन तेव्हा त्यापासून अलिप्त राहा."

(हदीस : मुस्लिम)

पूर्ण इस्लामी कायद्या (शरीयत)चा पाया याच सामर्थ्य व कष्टहीनतेवर अवलंबून आहे. हाच नियम दुर्बलांच्या बाबतीत लागू आहे. इस्लामने आजारपण, शारीरिक कमकुवतपणा, अपंगत्त्व, प्रवासाचा त्रास व आर्थिक अडीअडचणी या सर्व गोष्टींबाबतच्या कायद्यात पुरेशा सवलती दिल्या आहेत व मनुष्य जितके काम करू शकतो तितकीच जबाबदारी त्याला सोपविण्यात आली आहे. जे आदेश त्याच्या शक्ती बाहेर आहेत, त्यातून त्याला सूट देण्यात आली आहे. शरीयत या नियमाबाबत अल्लामा इब्ने हजम यांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे,

"प्रत्येक फर्ज (अनिवार्य आदेश) ज्याचे बंधन माणसावर लागू करण्यात आले आहेत ते पूर्ण करण्याचे सामर्थ्य त्याच्यात असेल तर ते पूर्णपणे पार पाडावे. जर तो ते काम करण्यास असमर्थ असेल तर त्या अनिवार्य कार्यातून त्याला पूर्णतः सूट देण्यात आली आहे. परंतु जर तो त्याचा एक भाग पूर्ण करू शकत असेल व दुसरा भाग करण्याची शक्ती नसेल तर तो भाग त्याला माफ करण्यात आला आहे व जितके काम तो करू शकतो तितकेच त्यास अनिवार्य आहे. मग ते थोडा असो किंवा जास्त." (अल-मुहल्ला १: ६९)

ईश्वराच्या आराधनेत निर्बलांना सूट

शरीअतचे हेच नियम नमाज-रोजासारखेच आर्थिक, सामाजिक व राजनैतिक क्षेत्रातील आदेशांत दिले गेल्याचे निदर्शनास येतात. इस्लाममध्ये मूलभूत श्रद्धानंतर आरधनेचे स्थान आहे व त्यातही नमाजचे महत्त्व इतर आराधनांपेक्षा जास्त आहे. नमाजसाठी स्वच्छ व शुद्ध होणे अनिवार्य अट आहे. परंतु जर मनुष्य स्नान व वुजू (प्रक्षालन) करू शकत नसेल व पाणी उपलब्ध नसेल तर तो 'तयम्मूम' (मातीने शुद्ध व पवित्र होणे) करू शकतो व तयम्मूमचा विधीही अत्यंत सोपा आहे. नमाज अदा करताना मनुष्य थोड्या वेळेसाठी उभा राहतो व नंतर क्रमशः रुकू व सजदा करतो. शेवटी खाली बसून अल्लाहची स्तुती व महानतेचे पठण करतो. हे इतर धर्मांच्या उपासनांच्या तुलनेत बरेच सोपे आहे. असे असतानासुद्धा जर एखादी व्यक्ती उभे राहून नमाज अदा करू शकत नसेल तर त्याला बसून नमाज अदा करण्याची सवलत आहे, जर बसूनही अदा करण्यास असर्मथ असेल तर जमिनीवर पडल्या स्थितीत व हेही शक्य नसल्यास केवळ इशाऱ्याने हे कर्तव्य (नमाज) पार पडता येईल. नमाज पाच निर्धारित वेळी अदा करायला हवी. जर कोणी निर्धारित वेळी झोपला असेल तर जेव्हा

त्याला जाग येईल तेव्हा किंवा जेव्हा आठवण येईल तेव्हा नमाज पढू शकतो. होय, पण जाणूनबुजून टाळाटाळ करणे योग्य नाही. फर्ज नमाज (अनिवार्य नमाज) मशीदीत इमामच्या मागे उभे राहून अदा केली जाते. इमामना निर्देश देण्यात आला आहे की निर्बलांना सवलत देण्यात यावी. अल्लाहचे पैगंबर म्हणतात,

"जी व्यक्ती जेव्हा मुस्लिमांच्या समूहाची इमामत करते तेव्हा नमाज सोपी व संक्षिप्त असावी. कारण समूहात वृद्ध, आजारी व काम-धंदा करणारेही असतात."

(हदीस : मुस्लिम)

रोजे (उपवास) व व्रत पाळण्याचा आदेश प्रत्येक धर्माच्या शिकवणीत आहे. सतत कैक दिवसांपर्यंत सलग उपवास पाळण्याची प्रथा आहे. परंतु इस्लामानुसार रोजा सूर्योदय ते सूर्यास्तच्या दरम्यान असतो, यापेक्षा अधिक काळासाठी नव्हे. अशा प्रकारे एक महिन्याच्या मुदत रोजे पूर्ण करायचे असतात. जन्मभर उपवासाचा आदेश नाही. याशिवाय जी व्यक्ती आजारी असेल वा प्रवासात असेल वा ज्या स्त्रिया गर्भवती असतील व बालकांना स्तनपान देत असतील त्यांना इतर दिवसांत रोजे पूर्ण करण्याबाबत आदेश आहे. इतर व्यक्ती ज्या अशक्तपणामुळे वा म्हातारपणामुळे रोजे पाळू शकत नाही, त्यांना इतर कोणाही गरीबास भोजन देण्याची सूट देण्यात आली आहे. ही रोजाची क्षतिपूर्ती होय. रोजाच्या बाबतीत दिलेल्या सवलतीबाबत सांगण्यात आले आहे,

"अल्लाह तुमच्यासाठी सुविधा इच्छितो अडचणी इच्छित नाही."

(दिव्य कुरआन - २ : १८५)

जकात इस्लामी उपासनेचे म्हत्त्वपूर्ण अंग आहे. हा समाजाच्या आर्थिक सहायतेचे एक महत्त्वाचे अंग आहे. परंतु जकात देणे अशा लोकांवर लागू आहे. जे एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त संपत्ती बाळगतात. ज्यांच्याकडे तेवढी संपत्ती नसेल त्यांना मुक्त ठेवण्यात आले आहे. हा अशा प्रकारचा धार्मिक टैक्स नाही की जो प्रत्येक व्यक्तीस इच्छा असो व नसो, अदा करावाच लागेल.

हज हाही उपासनेचा महत्त्वाचा भाग आहे, ज्याने मनुष्य मानसिक प्रसन्नता प्राप्त करतो. यासाठीही सामर्थ्याची अट आहे. जर सामर्थ्य नसेल तर त्या व्यक्तीवर हज करण्याची अट लागू नसते. सामर्थ्याचा अर्थ ती व्यक्ती शारीरिक व आर्थिकदृष्ट्या सबळ असेल तर तो प्रवासाचे कष्ट सहन करू शकेल. कुरआनात म्हटले आहे,

"लोकांवर अल्लाहचा हा हक्क आहे की या काबागृहापर्यंत पोहोचण्याची ऐपत आहे त्याने त्याची हजयात्रा करावी." *(दिव्य कुरआन -३ : ९७)*

आर्थिक जबाबदारी सामर्थ्यानुसार

कौटुंबिक जीवनात आर्थिक जबाबदारी पुरुषावर टाकण्यात आली आहे. या बाबतीत इस्लामचा आदेश आहे,

"सुखवस्तू माणसाने आपल्या सुखद परिस्थितीनुसार मोबदला (नफका) घावा आणि ज्याला उपजीविका कमी दिली गेली असेल त्याने त्याच मालातून खर्च करावा जो अल्लाहने त्याला दिला आहे. अल्लाहने ज्याला जितके दिलेले आहे त्यापेक्षा अधिक त्याला तो जबाबदार धरत नाही. हे दूर नव्हे की अल्लाह अडचणींच्या स्थितीनंतर सुबत्तादेखील प्रदान करील." *(दिव्य कुरआन -६५ : ७)*

अपंगावर जिहाद लागू नाही

इस्लाम धर्मात जिहादची अशी कल्पना आहे की माणसाने धर्मासाठी (इस्लामसाठी) जीव व मालमत्ता अर्पन करावी. परंतु जी व्यक्ती अपंग (व अधू) आहे व ती दानही देऊ शकत नाही व संपत्तीही खर्च करू शकत नाही, त्याच्याकडून संपत्ती खर्च करण्याची अपेक्षा नाही. मात्र जे समर्थ असूनही खर्च करीत नाहीत ते पापी आहेत. या बाबतीत इस्लामी आदेश खालील पंक्तीद्वारा लक्षात येतो,

"अशक्त व आजारी लोक व ते ज्यांना धर्म युद्धात प्रवेशाकरिता सामग्री प्राप्त नाही, जर मागे राहिले तर काहीही हरकत नाही, जर ते स्वच्छ मनाने अल्लाह व पैगंबरांशी एकनिष्ठ असतील. अशा सत्कर्मीवर आक्षेप घेण्यास कोणतीही जागा नाही आणि अल्लाह क्षमा करणारा व दया दाखविणारा आहे. अशाच प्रकारे त्या लोकांवरदेखील आक्षेपास कोणतेही स्थान नाही ज्यांनी स्वत: येऊन तुम्हाला विनंती केली होती की आम्हाला स्वारी उपलब्ध करून दिली जावी आणि जेव्हा तुम्ही सांगितले की मी तुमच्यासाठी स्वारीची व्यवस्था करू शकत नाही तेव्हा ते निरूपाय होऊन परत गेले आणि स्थिती अशी होती की ते स्वखर्चाने युद्ध प्रवेशाची ऐपत बाळगत नव्हते. तथापि आक्षेप अशा लोकांवर आहे जे धनवान आहेत आणि तरीदेखील तुमच्यापाशी विनवणी करतात की त्याना युद्ध प्रवेशाची माफी देण्यात यावी, त्यांनी घरी बसून राहणाऱ्यांमध्ये सामील होणे पसंत केले व अल्लाहने त्यांची हृदये मुहर केली. म्हणून आता त्यांना समजत नाही (की अल्लाहजवळ त्यांच्या या वागणुकीचा काय परिणाम निघणार आहे.)"

(दिव्य कुरआन - ९ : ९१-९३)

संयमाचे उपदेश

अशक्तपणा मग तो शारीरिक असो वा आर्थिक, बौद्धिक असो वा राजनैतिक, इस्लाम प्रत्येक स्तरावर व स्थितीत संयम (धैर्य) बाळगण्याची शिकवण देतो. इस्लामी शब्द हल्ली महत्त्व घालवून बसलेत. लोक विवशतेचा अर्थ 'सब्र' (संयम) घेतात. म्हणून संयम शब्द ऐकताच निष्क्रियता व परिस्थितीने लाचार होणे असा अर्थ घेतला जातो. उलट त्यांचा अर्थ धैर्य व हिंमतीने उच्च विचार बाळगणे असा होतो. सब्रचा गर्भार्थ असा की मनुष्याने धैर्याने परिस्थितीचा सामना करावा व पराजित झाल्यावरही हतबल होऊ नये. उलट नव्या दमाने आपले लक्ष्य साधण्याचे प्रयत्न करावे. सब्र (धैर्य) जय-पराजया मधला दुवा आहे. सब्र (धैर्य) माणसाला नवे जीवन व शक्ती प्रदान करते. सब्र (संयम) केवळ एका क्षेत्रातच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अपेक्षित असते. सब्र (धैर्य व संयम) म्हणजे माणसाने उच्च विचार व आदर्शावर अवलंब करून त्यासाठी सतत त्याग करावा. तसेच आपल्या मनातल्या इच्छा व वंशाचे चुकीचे रीतिरिवाज, चुकीच्या सामाजिक परंपरा व नैतिक अध:पतनाचा सामना करून आपले चारित्र्य कलंकित होऊ देऊ नये. माणसाने कठीण समयी आपल्या उच्च तत्त्वांवर दृढतेने कायम राहाणे व असे कोणतेही कर्म करू नये की तो अपमानित होईल. त्याने आपत्तीजनक परिस्थितीत मानसिक संतुलन बिघडू देऊ नये व ईश्वराच्या निर्णयाचा आनंदाने स्वीकार करावा, जोपर्यंत 'सब्र'चे (संयमाचे) गुण माणसात निर्माण होत नाहीत. त्याचा वैचारिक, बौद्धिक, नैतिक, आर्थिक व सामाजिक स्तर उंचावला जात नाही. श्रेष्ठता व महानता जगात संयम बाळगणाऱ्याला प्राप्त होते.

कुरआनाने प्रत्येक संकट व परीक्षेच्या वेळी सब्र (संयम) बाळगण्याचा उपदेश दिला आहे. या सवयीस जगात व मृत्यूनंतर अर्थात परलोकातही यशाचा मार्ग मानले आहे. या संदर्भात कुरआनातील सब्रच्या उपदेशांचा उल्लेख करायची आवश्यकता नाही. केवळ एका श्लोकाचा उल्लेख करावासा वाटतो.

"आणि आम्ही खचितच तुम्हाला भय-भूख, जीवित व वित्त हानी आणि तुमच्या प्राप्तीमध्ये घट करून तुमची परिक्षा घेऊ. ह्या परिस्थितीत जे लोक संयमपूर्वक आचरण करतील आणि जेव्हा जेव्हा आपत्ती होईल तेव्हा म्हणतील की, आम्ही

अल्लाहचेच आहोत आणि अल्लाहकडेच आम्हाला परत जायचे आहे. त्यांना शुभसंदेश द्या. त्यांच्यावर त्यांच्या पालनकर्त्याकडून मोठी कृपा घेईल आणि त्यांच्यावर दयेचे छत्र असेल आणि असेच लोक सन्मार्गी असतील.''

(दिव्य कुरआन - २ : १५५-१५७)

ज्या लोकांना परलोकावर विश्वास नाही, ते तेथील यश व पुरस्कारावर श्रद्धा का ठेवतील? ते यास खोटे सांत्वण समजतील. ते खरोखर असे मानतात की हे सरळ व भोळ्या लोकांच्या समजुतीकरिता आहे. परलोकच्या वास्तविकतेबद्दल येथे चर्चा करावयाची नाही. केवळ एका मुद्याकडे लक्ष वेधाय आहे, ते म्हणजे असे की परलोकाचे यश व कल्याणाची कल्पना माणसाला वंचित होण्याच्या भावनेपासून दूर ठेवते. ज्या माणसाला परलोक (मरणोत्तर जीवना)वर विश्वास असतो तो कधी दुःखी निराश व उदास होत नाही. तो मोठमोठ्या नुकसानाला उत्तम बदला व पुण्याच्या आशेने मोठ्या आनंदाने सहन करू शकतो. नाहीतर या जगात हतोत्साहित करणाऱ्या परिस्थिती व बुद्धीला बधीर करणाऱ्या संकटांना सामना करावा लागतो. मनुष्य दृढ प्रतिज्ञ राहू शकत नाही. एखादी व्यक्ती जर आंधळी झाली असेल तर साऱ्या जगातील सौंदर्य तिच्यासाठी निरर्थक ठरते. पण तिने या विश्वासाने जगण्याचा निर्धार केला की आज ज्या सुखसमृद्धीपासून ती वंचित झाली आहे, उद्या हेच सुख नव्हे तर यापेक्षा अधिक सुखसमृद्धी त्यास प्राप्त होईल व त्यास पुण्य व मोबदला प्राप्त होईल व आजच्या सुखसमृद्धीपासून वंचित होण्यातही त्याला संतोष व शांती प्राप्त होईल व धैर्याने जीवन व्यतीत करून इतर कर्माचे योगदान देईल. एखाद्या व्यक्तीचा एकुलता एक तरूण मुलगा दुर्घटनाग्रस्त होऊन मृत्यू पावल्यास त्याला या जगातील जीवन निरर्थक वाटू लागले. पण त्याने जर हे जीवन अशा विचाराने व्यतीत केले की या दुःखद घटनेच्या मोबदल्यात त्याला स्वर्ग मिळेल व तेथे त्याचा मुलगा ही भेटेल, तर दुःखद घटनेतही त्याला संतोषाचा भास होईल. मरणोत्तर जीवनाची कल्पना व श्रद्धा माणसामध्ये हीच भावना निर्माण करते.

दुर्बलांवर होणाऱ्या जुलमापासून सुरक्षा

जुलुमास जगात कोणतेच स्थान नसावे. त्याची गरज ही नाही. जर एकाही व्यक्तीवर जुलूम होत असेल तर संपूर्ण समाजाला त्याची लाज वाटली पाहिजे. पण येथे व्यक्ती तर सोडाच मोठमोठ्या जाती-जमातीवर जुलूम व अत्याचार होत आहेत. भूतकाळातही हीच परिस्थिती होती जुलूम दुर्बल घटकांवरच केला जातो. जगाचा इतिहास आहे व अत्यंत गंभीर इतिहास आहे. व्यक्तीने व समूहाने दुर्बलांना आतोनात छळले आहे व त्यांचे प्राण घेतलेत व त्यांना बेअब्रू केले आहे. त्यांच्यावर इतके अत्याचार केलेत की केवळ अत्याचारांच्या कल्पनेने हृदयाला कापरे भरते. आजही परिस्थितीत जास्त फरक पडलेला नाही.

इस्लामपूर्व अरबस्तानात दुर्बलांची अवस्था

इस्लामचा ज्या समाजात प्रसार झाला त्या समाजात दुर्बलांवर आतोनात अत्याचार होत होते. गुलामांवर तसेच अधीनस्थावर त्यांच्या मालकांकडून भयंकर जुलूम होत होते. महिलांवर पुरुष अत्याचार करीत होता. अनाथ व असहाय्य बालकांना खुद्द त्यांचे पालक अधिकारांपासून वंचित करीत होते. प्रवाशाच्या वित्त व जीवाला नेहमी भीती लागून असे. निर्बल, अपंग व निराधारांना कोणाचीच सहानुभूती वा आश्रय प्राप्त नव्हता. जुलुमाची चाके चारी दिशांना दुर्बळ व कमकुवत लोकांना चिरडत होती. या परिस्थितीचे चित्रण कुरआनात असे केले आहे,

"कदापि नाही, किंबहुना तुम्ही अनाथांशी मानाचा व्यवहार करीत नाही आणि गरिबाला जेवू घालण्यासाठी दुसऱ्याला उत्तेजन देत नाही आणि वारसाची सर्व मालमत्ता गिळंकृत करता, आणि संपत्तीच्या प्रेमात वाईटरित्या गुरफटला आहात."

(दिव्य कुरआन - ८९ : १७-२०)

हब्शाच्या प्रवासानंतर माननीय जाफर तय्यार (रजि.) यांनी हब्शाचे सम्राट नज्जाशीच्या दरबारात जे अद्वितीय भाषण दिले होते त्यात समाजाचे उत्तम चित्रण केले आहे. त्यांनी म्हटले आहे,

"हे शासका! आम्ही अशा समाजात होतो जो अज्ञानाच्या चिखलात अडकला होता. मूर्तीपूजा करीत होतो, मेलेली जनावरे खात होतो, अश्लील कर्म करीत होतो. रक्ताच्या नात्यांचा सन्मान करीत नव्हतो. शेजाऱ्यांशी चांगले व्यवहार करीत नव्हतो. सारांश, संपूर्ण दुर्बल समाज शक्तीशाली लोकांकडून अत्याचाराने चिरडला जात होता."

इस्लामने दुर्बलांशी चांगले संबंध स्थापित केले

यानंतर माननीय जाफर (रजि.) यांनी मुहम्मद (स.) यांना प्रेषित्त्व मिळाल्याची माहिती देऊन त्यांच्या शिकवणीबाबत तपशील दिला.

“अशी आमची दशा होती. या परिस्थितीत अल्लाहने आमच्याकरिता एकाला प्रेषित्व दिले. आम्ही त्यांचा वंश, प्रामाणिकपणा, विश्वासपात्रता व शुद्धाचरणाबाबत पूर्णतः परिचित होतो. त्यांनी आम्हाला अल्लाहकडे बोलाविले व म्हटले की आम्ही एकेश्वरवादावर श्रद्धा करावी व त्याचीच उपासना करावी. आमचे पूर्वज मूर्तीपूजक होते. आम्हाला पैगंबर (स.) यांनी मूर्तीपूजेपासून दूर केले. त्यांनी आम्हाला उपदेश दिला की, सत्य बोला, अनामती परत करा, नातेवाईकांचे हक्क अदा करा, शेजाऱ्यांशी चांगले व्यवहार करा, वर्जित कर्मापासून अलिप्त राहा, रक्तपात करू नका, पैगंबर (स.) यांनी आम्हास अश्लीलता, असत्य, अनाथाची संपत्ती गिळंकृत करण्यापासून व शुद्धाचरण करणाऱ्या महिलांवर लांच्छण लावण्यापासून दूर केले. त्यांनी आम्हाला एकमेव सर्वशक्तीमान अल्लाहची उपासना करण्याचा उपदेश दिला व अल्लाहचा कोणीही भागीदार नाही हे निक्षूण सांगितले. पैगंबर (स.) यांनी नमाज अदा करण्याबाबत रोजे (पाळण्या बाबत) व दान देण्याबाबतचा आदेश दिला.” (हदीस : मुसनद अहमद)

हे आहे इस्लामचे चित्र जे सुरुवातीच्या काळात एका अनुयायी प्रचारकाने एका शासकासमोर सादर केले होते. यात ही वास्तविकता प्रगट करण्यात आली आहे की इस्लाम एकेश्वरत्वाचा पुरस्कर्ता आहे व अनेकेश्वरत्वाचा तसेच मूर्तीपूजेचा विरोधक आहे. तो दुर्बलांबद्दल सहानुभूती राखतो, त्याद्वारे दुर्बलांच्या अधिकारांबाबत मार्गदर्शन करतो. इस्लामने जुलूम व अत्याचाराचा मार्ग बंद करण्याचा प्रयत्न केला आहे.

अल्लाह कोणावरच अत्याचार करीत नाही

जुलूम व अत्याचाराचे उन्मूलन करण्यासाठी त्यांचे दुष्परिणाम स्पष्ट केले आहेत. त्यांच्याबद्दल उद्वेगांची भावना निर्माण केली व त्यांच्याविरुद्ध असे वातावरण निर्माण केले की जुलूम करणारा तो करण्यापूर्वी हजारदा विचार करील की समाज त्यास सहन करेल की नाही. इस्लामने सर्वात अगोदर ही जाणीव निर्माण केली व तिला जीवित ठेवले की मनुष्याने एकमेकांशी उच्च नैतिक संबंध स्वीकारायला हवा जो

विश्वनिर्मात्याला प्रिय वाटेल. तो जुलूम करीत नाही व जुलूम पसंतही करीत नाही. कुरआनात या गोष्टीचा पुन्हा पुन्हा उल्लेख करण्यात आला आहे की अल्लाह जुलमी नाही तो कधीही कोणावर जुलूम करीत नाही. एका ठिकाणी म्हटले गेले आहे,

"निस्संदेह, अल्लाह नाममात्रही जुलूम करीत नाही."

(दिव्य कुरआन - ४ : ४०)

कुरआनात दुसऱ्या ठिकाणी म्हटले आहे.

" वस्तुस्थिती अशी आहे की अल्लाह लोकांवर अत्याचार करीत नाही, लोक स्वत:च आपल्यावर अत्याचार करतात." *(दिव्य कुरआन - १० : ४४)*

अल्लाह जुलमाला पसंत करीत नाही

हेच गुण तो आपल्या दासां (लोकां)मध्ये पाहू इच्छितो. लोक एकमेकांवर जुलूम व अन्याय करतात हे ईश्वरास जरासुद्धा पसंत नाही. कुरआनातील दोन श्लोकांच्या अंतिम ओळी लक्षपूर्वक वाचा.

१) "आणि मर्यादांचे उल्लंघन करू नका. अल्लाहला अतिरेक करणारे अत्यंत अप्रिय आहेत." *(दिव्य कुरआन - ५ : ८७)*

२) "कारण अत्याचारी लोक अल्लाहला अप्रिय आहेत "

(दिव्य कुरआन - ३ : १४०)

एका हदीस (पैगंबराचे उपदेश) मध्ये हीच बाब अत्यंत प्रभावीरित्या म्हटली आहे,

अल्लाह म्हणतो, "हे लोकांनो! मी स्वत: जुलुमास निषिद्ध मानतो व तुम्हासाठीही निषिद्ध केले आहे. म्हणून तुम्ही एकमेकांवर जुलूम करु नका."

(हदीस : मुस्लिम)

एका दुसऱ्या हदीसमध्ये मुहम्मद (स.) म्हणतात,

"अल्लाहची मला वह्य (संदेश) आहे की लोकांनी इतके साधेपण व विनम्रता स्वीकारावी की कोणाशी घमेंडी करणार नाही व कोणावर अतिरेक करणार नाही."

(हदीस : मुस्लिम)

जुलूम करणाऱ्याची निंदा

कुरआनने ज्या मुद्यांवर यहूदींची (इस्त्राईलांची) टीका केली आहे. त्यातला एक मुद्दा असा आहे की ते जुलूम व अत्याचार करतात व ते निषिद्ध व वर्ज्य मार्गाने उदरनिर्वाह करतात. कुरआनात उल्लेख आहे,

"तुम्ही पाहता की त्यांच्यापैकी पुष्कळसे लोक पाप व जुलूम आणि अत्याचाराच्या कृत्यांत धावपळ करीत हिंडतात आणि निषिद्ध माल खातात. अत्यंत वाईट कृत्ये आहेत जी ते करीत आहेत." *(दिव्य कुरआन - ५ : ६२)*

सशक्ताने अशक्तावर जुलूम करू नये

संपत्ती व शक्ती प्राप्त झाल्यावर मानवात दुष्प्रवृत्ती बळावते, दुसऱ्यांना चिरडण्या व गुलाम बनविण्यासाठी आपल्या शक्तीचा उपयोग करतो. खरे तर जो सामर्थ्यवान आहे, त्याच्याकडून अपेक्षा केली जाते की त्याने लोकांवर दया करावी व लाचार व निस्सहाय्य लोकांना मदत करावी. ही बाब शिष्टाचार, नैतिकता व माणुसकीच्या विरुद्ध आहे जिथून चांगुलपणाची सुरुवात व्हायला हवी, तिथूनच वाईटपणा व दुष्टपणा निर्माण होतो व लोकांना लाभ होण्याऐवजी त्रासाला तोंड द्यावे लागते. एका हदीसमध्ये आहे (पैगंबर (स.) म्हणतात) की, "अल्लाह तीन प्रकारच्या लोकांना पसंद करीत नाही. एक जो वृद्धावस्थेत दुष्कर्म करतो, दुसरा जो गरीब व परावलंबी असून घमेंडीने वागतो, तीसरा जो संपत्ती प्राप्त करून लोकांवर जुलूम व अतिरेक करतो." (हदीस : तिर्मिजी)

अल्लाहचा कोणताही निर्णय विद्वत्तापूर्ण व हेतूपुरस्सर असतो. कधीकधी गरीबाला त्याच्याकडून चेतावणी असते. त्याची इच्छा असते की माणसाला त्याच्या चुकांची जाणीव व्हावी. त्याला पश्चात्ताप व्हावा व माणसाने गर्वाचा त्याग करून मनापासून त्याच्याकडे वळावे. ईश्वराला हे बिल्कुल आवडत नाही की मानवाला चेतावणी देऊनही तो गुर्मीत राहून आपल्या जगातच वावरत राहतो. तसेच धनदौलत एक परीक्षा आहे. याने माणसांच्या जबाबदाऱ्या वाढल्या जातात. जो मनुष्य या जबाबदाऱ्यांना समजून घेत नाही व संपत्तीच्या मस्तीत दुसऱ्यावर अत्याचार करीत राहतो, तो ईश्वराच्या क्रोधाला बळी पडतो.

या हदीसचा विशेष संदेश असा की यात गरीबाला जागृत केले गेले आहे की त्याने घमेंड वं अभिमानाने वागू नये व धनवानास सांगण्यात आले आहे की त्याने जुलूम व अत्याचाराचा मार्ग स्वीकारता कामा नये. अशा प्रकारे इस्लामद्वारा धनवान व दरिद्री दोघांमध्ये सुधार करण्याकरिता एक विशेष प्रशिक्षण दिले गेले आहे.

अत्याचारिताच्या शापापासून सावधान राहा

कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर अत्याचार करणे व त्याच्या वैध अधिकारांपासून त्याला वंचित ठेवणे अल्लाहच्या क्रोधाला आमंत्रण दिल्यासारखे होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे,

"अत्याचारिताचा शाप घेऊ नका. कारण जेव्हा तो याचना करतो तेव्हा त्याची प्रार्थना त्वरित ऐकली जाते व तिच्या स्वीकृतीच्या मार्गात कोणतीच अडचण येत नाही.

माननीय मआज बिन जबल (रजि.) यांची पैगंबर (स.) यांनी यमनचे गव्हर्नर म्हणून नियुक्ती केली तेव्हा त्यांना उपदेश दिला,

अत्याचारितांचा शाप घेऊ नका. कारण त्याच्या व अल्लाहच्या मध्ये कोणताच पडदा नसतो." (हदीस : बुखारी)

माननीय अली (रजि.) वर्णन करतात की पैगंबर (स.) यांनी म्हटले आहे,

"अत्याचारित व्यक्तीच्या तळतळाटीपासून सुरक्षित राहा, कारण तो अल्लाहकडे आपले अधिकार मागतोय व अल्लाह कोणाचेच अधिकार मारत नाही."

(हदीस : मिश्कात)

कितीही वाईट, अधर्मी वा काफिर माणसावर जुलूम करण्याचा कोणासही अधिकार नाही. अल्लाह त्याची याचना स्वीकारेल व जुलूम करणारा अल्लाहच्या हातातून निसटणार नाही. म्हणून हदीसमध्ये आले आहे,

"अत्याचारिताची याचना ऐकली जाते, जरी तो वाईट मनुष्य असला तरी त्याच्या दुष्कर्मांचा संबंध स्वत:शीच आहे, ज्याचा हिशोब वेगळा घेतला जाईल."

(हदीस : अहमद)

दुसरी हदीस आहे,

"अत्याचारित काफिर असला तरी त्याच्या याचनेपासून सावध राहा, कारण त्याच्या स्वीकृतीच्या मार्गात अडचण नाही." (हदीस : अहमद)

माननीय अबू हुरैरा (रजि.) अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या वतीने म्हणतात.

“तीन लोकांची प्रार्थना अल्लाहच्या दरबारात रद्द होत नाही. रोजादार (उपवास) पूर्ण केल्यानंतर तो सोडताना जी दुआ करतो, न्यायप्रिय इमाम (खलीफा/बादशाह) ची दुआ व अत्याचारिताची दुआ (प्रार्थना) अल्लाह ढगांवरून उचलून घेतो. त्यांच्याकरिता आकाशाची दारे सताड उघडण्यात येतात व अल्लाह म्हणतो की माझी प्रतिष्ठा व महानतेची शपथ! मी तुझी अवश्य मदत करीन, कदाचित थोडा वेळ लागेल.” (हदीस : तिर्मिजी)

जुलमीला असे वाटायला नको की अत्याचारिताचा कोणीच वाली नाही व तो निःस्सहाय व निराधार आहे. अत्याचरिताचा सहाय्यक अल्लाह असतो. त्याची दुआ (प्रार्थना) व हाक सरळ सर्वोच्च आकाशांत अल्लाहच्या दरबारात पोहचते व जुलमी कोणत्याही क्षणी, अल्लाहच्या क्रोधाला बळी पडतो.

जुलमाचा परिणाम जगातच

कुरआन व हदीसमध्ये पुन्हा पुन्हा समज देण्यात आली आहे व चेतावणी देण्यात आली आहे की या जगात जेव्हा अत्याचाराचा मार्ग अवलंबिला गेला व शक्तीच्या नशेत हे सत्य विसरण्यात आले की हे विश्व अल्लाहशिवाय नाही. उलट याचा एक मालक (स्वामी) व शासक आहे. जो जुलमाला पसंत करीत नाही व जुलमीचा पंजा तोडू शकतो, तेव्हा फार भयानक परिणाम पाहावे लागतात.

माननीय अबू मूसा अशअरी (रजि.) सांगतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे,

“अल्लाह जुलमीच्या दोरीस ढील देतो (सोडून देतो) व जेव्हा पकडतो तेव्हा जुलूमी त्यातून सुटका मिळवू शकत नाही.” (हदीस : बुखारी)

यानंतर पैगंबर (स.) यांनी कुरआनचा हा श्लोक वाचला.

“भूतलावर चालणारा कोणताही प्राणी असा नाही ज्याच्या उपजीविकेची जबाबदारी अल्लाहवर नाही आणि ज्याच्यासंबंधी तो जाणत नाही की त्याचे वास्तव्य कोठे आहे? सर्वकाही एका स्पष्ट दप्तरांत नोंदलेले आहे.”

(दिव्य कुरआन - ११ : ६)

एका दुसऱ्या हदीसमध्ये पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे,

"एखाद्यावर जुलूम करणे व रक्ताचे नाते संपुष्टात आणणे हे असे दोन पाप आहेत की यांच्याव्यतिरिक्त असे दूसरे पाप नाही की ज्याच्यावर याच जगात शिक्षा दिली जाईल, त्या पापाव्यतिरिक्त ज्यांना परलोकात (मरणोत्तर) त्यांच्याकरिता राखून ठेवले आहे." (हदीस : अबू दाऊद)

जर मनुष्य ईश्वराच्या कायद्यांना समजून घेत नसेल व भूतकालीन घटनांपासून धडा घेत नसेल तर तो दुसऱ्यांच्या शिक्षणाचे उदाहरण होतात. जी व्यक्ती जुलमी लोकांच्या रांगेत उभी राहू इच्छिते तिला दुष्परिणामांपासून कोणतीही वस्तू वाचवू शकत नाही जे जुलमीच्या नशिबी असते.

जुलमाचा परिणाम परलोकात (मरणोत्तर)

हा तर आहे जुलमाचा जगात होणारा परिणाम. परलोकात जुलमी लोकांची जी भयंकर दुर्दशा होणार आहे त्याचे कुरआन व हदीसमध्ये भयंकर वर्णन दिले आहे. अल्लाहचे फर्मान आहे,

"आता हे अत्याचारी लोक जे काही करीत आहेत अल्लाहला त्यापासून तुम्ही बेसावध समजू नका. अल्लाह तर त्यांना टाळीत आहे, त्या दिवसासाठी जेव्हा अवस्था अशी असेल की डोळे विस्फारले ते विस्फारलेलेच राहतील. डोळे वर लावून पळत सुटले असतील. हे पैगंबर (स.) त्या दिवसाचे यांना भय दाखवा जेव्हा प्रकोप यांना येऊन गाठील त्यावेळी हे अत्याचारी सांगतील, "हे आमच्या पालनकर्ता! आम्हाला आणखी थोडी सवलत दे, आम्ही तुझ्या आवाहनास होकार देऊ आणि पैगंबरांचे अनुकरण करू." (पण यांना स्पष्ट उत्तर दिले जाईल की) तुम्ही तेच लोक नाहीत काय जे यापूर्वी शपथा घेऊन घेऊन सांगत होते की आमचा तर कधी ऱ्हास होणार नाही? वास्तविकत: तुम्ही त्या लोकांच्या वस्तीत वास्तव्य करून चुकला होता ज्यांनी स्वत:च आपल्यावर अत्याचार केला होता आणि पाहिले होते की आम्ही त्यांच्याशी कसा व्यवहार केला आणि त्यांची उदाहरणे देऊन तुम्हाला आम्ही समजविले देखील होते." *(दिव्य कुरआन - १४ : ४२-४५)*

जुल्म शब्दात 'जुलमात' अर्थात अंधकार असा अर्थ आहे. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जुलमास अंधाराच्या अर्थात व्यक्त केले आहे.

माननीय अब्दुल्लाह बिन अब्बास यांनी सांगितले की पैगंबर (स.) यांनी

म्हटले आहे,

"जुलूम जगाच्या अंतात तिमीर (अंधकार) असेल." (हदीस : बुखारी)

अर्थ असा की कयामतच्या दिवशी (अर्थात जगाच्या अंताच्या दिवशी) जुलमीच्या चारी बाजूस अंधकारच अंधकार असेल व ते प्रकाशापासून वंचित असतील जो स्वर्गा (जन्नत) पर्यंत नेतो.

याच भावार्थाची एक दूसरी हदीस माननीय जाबिर बिन अब्दुल्लाह (रजि.) कडून कळते की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

"जुलमापासून सुरक्षित राहा, यासाठी की जुलूम कयामतच्या दिवशी 'जुलमत' (अंधकार) होऊन येईल. कंजूसी करू नका, याकरिता की कंजूसी (कृपणता)ने तुमच्या अगोदरच्या लोकांना नष्ट केले आहे. याने लोकांचे जीव घेण्यास प्रेरित केले आहे व अल्लाहने निश्चित केलेले बंधनाचे उल्लघंण करावे." (हदीस : मुस्लिम)

या हदीस (पैगंबर उद्‌गारामध्ये) जुलूम करण्यापासून मनाई केली आहे त्याचबरोबर कंजूषी व कृपणतेपासून अलिप्त राहण्याचा उपदेश दिला आहे. दोहोंत जवळचा संबंध आहे. जुलमाची एक बाजू अशी आहे की मनुष्य मालमत्तेवर साप बनून बसतो व ज्यांचा अधिकार आहे त्यांना त्यापासून वंचित ठेवतो. याचे फार भयानक परिणाम होतात. जेव्हा लोकांचे अधिकार हिसकावले जातात व त्यांचे वैध अधिकार दिले जात नाही. तेव्हा समाजात तणाव निर्माण होतो व लोकांमध्ये असंतोष पसरतो. याप्रकारे साऱ्या समाजात दंगे, हत्या व लुटालूट सुरु होते. अशा परिस्थितीतून बाहेर पडणे कठीण होते. उपरोक्त हदीसचा उद्देश असा आहे की ज्याला अल्लाहने संपत्ती दिली आहे, त्याने अत्याचाराचा मार्ग अवलंबू नये व लोकांचे हक्क त्यांना देऊ करावे. नाहीतर ते स्वत: बर्बाद होतील व समाजसुद्धा विनाशच्या काठी पोहचेल. ही किती महत्त्वाची बाब आहे जी या हदीसमध्ये व्यक्त केली गेली आहे.

मरणोत्तर जीवनात जुलूम माफ होणार नाहीत

हदीसमध्ये आले आहे की मानवावर केलेले जुलूम व अत्याचार असे अपराध आहे जे परलोकात (कयामतच्या दिवशी) माफ केले जाणार नाहीत. अल्लाह जुलमीकडून बदला घेईल व अत्याचारितला त्याचा अधिकार मिळवून देईल. म्हणून जुलमीने धरतीवरील जीवनातच प्रायश्चित व क्षतिपूर्ती करून घ्यायला हवी.

माननीय आएशा (रजि.) यांच्याकडून कळते की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी

सांगितले,

"जुलमाचे रजिस्टर तीन प्रकारचे असतील. अल्लाह एका रजिस्टरमधील अपराध्यांना मुळीच माफ करणार नाहीत. दुसऱ्या रजिस्टरमधील लोकांचे अल्लाहकडे विशेष स्थान नसेल तो त्यांना वाटेल तर माफ करेल. तिसऱ्या रजिस्टरमधील लोकांकडून अल्लाह अवश्य बदला घेईल. ज्या अपराधास अल्लाह माफ करणार नाही तो आहे अनेकेश्वरत्वाचा अवलंब म्हणून अल्लाहने कुरआनात सांगितले आहे की जी व्यक्ती अल्लाहसह दुसऱ्या कोणास समकक्ष ठरवील त्या व्यक्तीला स्वर्ग (जन्नत) मध्ये मज्जाव असेल. अल्लाह अशा लोकांना क्षमा करील जे अल्लाहच्या प्रति अपराध करतील. उदाहरणार्थ, ज्यांनी रोजा (उपवास) सोडून दिला वा एखाद्या वेळची नमाज अदा केली नाही. अल्लाह असल्या अपराधांना दुर्लक्षित करेल. ज्या जुलमांचा अल्लाह बदला घेईल व त्यांचा न्याय करील, ते असे लोक आहेत जे इतरांवर जुलूम करतात. यांची क्षतिपूर्ती घेतल्याशिवाय त्यांना सोडणार नाही. जुलमीकडून बदला घेईल व अत्याचारीनाला त्याचा अधिकार मिळवून देईल." (हदीस : मुसनद अहमद)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एका सहकाऱ्यास विचारले, "तुम्हाला माहीत आहे काय की गरीब, दारिद्र्यात का आहे?" सहकाऱ्याने उत्तर दिले, "गरीब तर तो आहे ज्याच्याजवळ दिरहम, दिनार (अर्थात पैसे) व संपत्ती नाही." पैगंबर (स.) यांनी म्हटले, 'असे नाही.'

"माझ्या अनुयायांमध्ये (खरी) गरीब व कंगाल ती व्यक्ती आहे जी कयामतच्या दिवशी (जगाच्या अंतिम दिवशी) नमाज, रोजा, जकात (सर्व काही) घेऊन जाईल, पण तिने कोणासही बरे वाईट बोलले असेल, कोणाचा माल खाल्ला असेल, कोणासही जीवे मारले असेल, कोणास मारले असेल. (अशा प्रकारे त्यांचे अधिकार बळकावले असतील) अल्लाह तिचे पुण्य दुसऱ्यास देऊन टाकेल. जर तिचे पुण्य संपुष्टात आले असतील तर तिच्यावर गुन्हे लादले जातील व तिला नरकात फेकून दिले जाईल." (हदीस : मुस्लिम)

जुलमीने याच जगात आपल्या जुलमांचे प्रायश्चित्त करावे

माननीय अबू हुरैरा (रजि.) द्वारा माहीत झाले आहे की मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे,

"जर एखाद्याने आपल्या भावाला बदनाम व अपमानित केले असेल, त्याची संपत्ती व कुठलीही वस्तु हडप केली असेल, सांगायचे तात्पर्य असे त्याने

कोणाबरोबरही कोणत्याही प्रकारचे जुलूम केले असतील तर त्याने आपल्या हयातीतच ते दुष्कर्म माफ करून घ्यावे व त्याची क्षतिपूर्ती करून टाकावी. नाहीतर कयामतच्या दिवशी दीनार-दिरहम (धन-दौलत) ने कोणालाही खूश करता येणार नाही. जुलूमी माणसाचे जे काही पुण्यकर्म असतील ते अत्याचारिताच्या नावी करून टाकले जातील. याउलट जेव्हा जुलमी माणसाच्या कर्मपत्रात काही शिल्लक नसेल तेव्हा अत्याचारिताच्या कर्मपत्रातील दुष्कर्म (त्याचे अधिकार फेडले गेले नसल्यास) जुलमीच्या कर्मपत्रात नोंदले जातील.''

(हदीस : बुखारी)

हदीस व कुरआनने स्पष्ट केले आहे की जी व्यक्ती अल्लाहच्या आदेशाच्या विरोधात वागते त्याने अल्लाहकडे क्षमायाचना करून पश्चात्ताप दर्शविला पाहिजे. अल्लाहच्या आदेशाविरुद्ध अवज्ञा केली असेल व कोणाच्या अधिकारांचे हनन केले असेल तर क्षमायाचनेबरोबर क्षतिपूर्तीही आवश्यक आहे. (म्हणजे संबंधित व्यक्तीकडे क्षमायाचना करावी व त्याला नुकसानभरपाई देऊन पुन्हा तसे न वागण्याचा दृढनिश्चय करावा.) कोणालाही कष्ट देणे, त्याच्या अधिकारापासून त्याला वंचित करणे, त्याची मालमत्ता हडप करणे व कोणत्याही प्रकारचे अतिरेकी कृत्य करणे व नंतर अल्लाहकडून क्षमा मागणे पुरेसे नाही. संबंधित व्यक्तीची नुकसानभरपाई करून त्याची क्षमा मिळविणेही आवश्यक आहे. इमाम नववी लिहितात,

''इस्लामी विद्वान सांगतात की प्रत्येक दुष्कर्माबाबत प्रायश्चित करणे अनिवार्य आहे. जर दुष्कर्माचा संबंध अल्लाह व व्यक्तीशी आहे मात्र कोणाही व्यक्तीचे नुकसान झालेले नसेल तर तौबा (क्षमायाचने) च्या तीन अटी आहेत. पहिली अट ही की मनुष्याने त्या प्रकारच्या दुष्कर्मापासून कायमस्वरूपी अलिप्त व्हावे. दुसरी अट अशी की केलेल्या दुष्कर्माबाबत पश्चात्ताप करावा. तिसरी अट अशी की त्याने अनिष्ट कर्माची पुन्हा पुनरावृत्ती होणार नाही. असा दृढनिश्चय करावा. या तिन्ही अटींपैकी एकाही अटीचे पालन झाले नाही तर क्षमा होणार नाही. जर दुष्कर्माचा संबंध एखाद्या व्यक्तीशी या मानवाधिकाराच्या हननसंबंधी आहे, तर तीन अटींव्यतिरिक्त आणखी एक अट लागू होते. ती अशी की ज्याचा जो अधिकार मारला गेला असेल त्याची पूर्तता करण्यात यावी, जर एखाद्यावर खोटा आरोप करण्यात आला असेल तर त्याला योग्य मोबदला देण्यात यावा किंवा त्याच्याकडून क्षमा मिळवून घ्यावी. जर त्याची पाठीमागे बदनामी केली असेल तरीसुद्धा क्षमायाचना करणे आवश्यक आहे.''

(हदीस : रियाजुस्सालिहीन)

इमाम इब्ने-तैमिया यांनी म्हटले आहे,

"खरे तर असे आहे की केवळ क्षमायाचनेने अत्याचारितांच्या अधिकाराची क्षतिपूर्ती होत नाही. या बाबतीत खुनी व इतर जुलमी माणसामध्ये अंतर नाही. क्षमा तेव्हाच पूर्ण होईल जेव्हा जुलमाचा बदला दिला जाईल. जर जीवनात दिला गेला नाही तर मरणोत्तर जीवनात तर अवश्य अदा करावा लागेल." (फतावा इब्ने-तैमिया)

जुलमीला कोणी साथ देऊ नये

जुलूम जेव्हा एका व्यक्तीवर वा एखाद्या समूहावर होत असेल तर या बाबतीत समाजातील लोकांचीदेखील काही जबाबदारी असते. समाजात या गोष्टीची जाणीव होत नसेल व ते आपली जबाबदारी पूर्ण करत नसतील, तर अधिकार मागणारा व अधिकारांचे हनन करणारा यांच्यामध्ये संघर्ष होत राहील. कधी जुलमी तर कधी अत्याचारित एकमेकांवर वरचढ होत राहतील व संघर्ष कधीच मिटणार नाही. अनिष्टाचा अंत समाजाच्या जागृकतेनेच होतो. समाजाने अनिष्ट प्रकारांना वाव देऊ नये. ते निर्माण होताच समाजाने ते चिरडले पाहिजे. इस्लाम जुलमाविरुद्ध असेच वातावरण निर्माण करतो. या बाबतीत समाजाचे सर्वप्रथम कर्तव्य आहे की कोणत्याही व्यक्तीने जुलूम व अतिरेक करणाऱ्याची साथ देऊ नये. औस बिन गिरजील (रजि.) म्हणतात की अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले,

"जी व्यक्ती जुलमीला जुलमी आहे असे माहीत असून त्याचे मनोबल वाढविण्याचे काम करते तो इस्लामच्या बाहेर समजली जाते." (हदीस : मिश्कात)

माननीय अब्दुल्लाह बिन अम्र (रजि.) कडून समजते की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

"ज्या व्यक्तीने भांडणात जुलमाची साथ दिला आहे ती अल्लाहच्या क्रोधास पात्र होते." (हदीस : अबू दाऊद)

अत्याचारिताला सहकार द्यावा

अत्याचारिताशी सहानुभूती दर्शविण्यासाठी जुलमीविरुद्ध असहकार करायला हवा. कधीकधी जुलमीशी एखाद्याचे हितसंबंध गुंतलेले असतात. आपल्या हितांची चिंता न करता अत्याचारिताची मदत करणे खरोखर कमालीची गोष्ट आहे. इस्लाम

माणसाच्या चारित्र्यात अशीच विशेषता घडवून आणतो. इस्लाम अशीच शिकवण देतो की जर कोणावर जुलूम होत असेल तर त्याला एकटा सोडू नये. त्याची मदत करण्यात यावी व त्याला जुलमीच्या पंज्यातून मोकळे करण्यात यावे. नैतिकतेच्या दृष्टिकोनातून हे महत्त्वपूर्ण आहे की मनुष्याने इतर कोणावरही अत्याचार करू देऊ नये. मानवता, नैतिकता व शिष्टाचाराची अपेक्षा आहे की एखादा पाशवीवृत्तीचा मनुष्य जर एखाद्या निस्सहाय व दुबळ्या माणसावर अत्याचार करीत असेल तर त्याची रक्षा करणे आवश्यक आहे. इस्लाम मनुष्याला अशाच प्रकारचे उच्च विचार देतो.

माननीय बरा बिन आसिम (रजि.) म्हणतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आम्हाला सात गोष्टी करण्याचे व सात गोष्टी न करण्याचे आदेश दिले आहेत त्याच्यात एक महत्त्वाचा उपदेश असा आहे की आम्ही अत्याचारिताची मदत करायला हवी. (हदीस : बुखारी, मुस्लिम)

या आदेशाच्या कायदेशीरपणाबाबत इमाम नववी लिहितात की,

"अत्याचारित माणसाची मदत करतो अशा आदेशांमध्ये आहे जो फर्जे कफाया (अर्थात एका किंवा अधिक लोकांनी हे कर्तव्य बजावले तर सर्वांच्या वतीने ते एक कर्तव्य पूर्णत: बजावण्यासारखे होते) आहे. हे "अम्र बिल मरुफ व नहीं अनिल मुनकर" (कल्याणकारी कर्मांचा आदेश देणे व दुष्कर्मांना होऊ न देणे) या तत्त्वाच्या अंतर्गत येते. याचा इशारा समाजच्या त्या व्यक्तींकडे आहे ज्या सशक्त आहेत व त्यांचे या प्रकारच्या कर्मांमुळे कोणतेच नुकसान होण्याची शक्यता नाही." (हदीस : मुस्लिम)

याचा अर्थ असा आहे की जर एखाद्यावर अत्याचार होत असेल तर जी व्यक्ती जुलूम थांबवू शकते तिची जबाबदारी आहे की तिने पुढे यावे व जुलूम होऊ देऊ नये. ही समाजाच्या वतीने तिची जबाबदारी आहे. जर कोणीही जुलूम थांबविण्याचे कार्य केले नाही तर संपूर्ण समाज गुन्हेगार होईल व त्यास अल्लाहपुढे याचे उत्तर द्यावे लागेल. समाजाकडून हे कर्तव्य तेव्हाच बजावले जाईल जेव्हा लक्षात येईल की समाजात एकही माणूस असा नाही, जो जुलमाविरुद्ध आवाज उठवू शकेल व अत्याचारिताचे समर्पण करण्याचे त्यात सामर्थ्य नसेल व होणाऱ्या भयंकर नुकसानीच्या शक्यतेबाबत तो सजग होता. मात्र विरोध करू शकत नव्हता.

जुलमीला जुलूम करू देऊ नये.

एखादा जुलमी माणूस जर सर्वत्र विनाश पसरवीत असेल व लोकांचे जीव घेत असेल व त्यांच्या अधिकारांचे हनन करीत असेल व लोकांशी जनावरांसारखा व्यवहार करीत असेल तर धार्मिक स्वभावाच्या सदाचारी लोकांवर दोन प्रकारच्या प्रतिक्रिया होतात. एक तट शांत बसतो. (म्हणजे लोक केवळ तमाशा पाहणारे असतात व काही लोकांवर अत्याचार होत राहतात.) दुसरी प्रतिक्रिया त्या वेळी घडते जेव्हा सदाचारी लोकांवरसुद्धा अत्याचार होऊ लागतात. ही प्रतिक्रिया आरडाओरड, किंकाळ्या व आक्रोशाच्या स्वरूपात प्रकट होते. इस्लाम केवळ मुक्या, बहिऱ्या धार्मिकतेला योग्य समजत नाही आणि किंकाळ्या व रडण्या-गाण्याचा कैवारी नाही. मनुष्य असा विचार करून शांत बसून राहील की आपला कोणत्याही जुलूम व अतिरेकी भानगडीत आपला हात नाही. व थोडे रडून-ओरडून शांत बसून घेऊ. याने जुलूम-जबरदस्तीचा अंत होणार नाही.

तसेच न्याय व शांती अस्तित्त्वात येणार नाही. जुलमाची एक शक्ती असते. खरेतर असे आहे की शक्तीवानच जुलूम करू शकतो. ज्याचा सामना करण्यासाठी त्याच्याविरुद्ध झेंडा उचलायला हवा, त्याच्यासमोर छाती ताणून उभे राहायला हवे, त्याच्याविरोधात वित व जीव देण्याची तयारी दर्शविली पाहिजे, मोठा संघर्ष उभारावा लागतो, तेव्हा कुठे वंचितांना अधिकार प्राप्त होतात व अत्याचारितांना सांत्वन प्राप्त होते. मग आपले कर्तव्य बजावण्याची भावना निर्माण होते. खरा मुस्लिम जुलमीच्या डोळ्यांशी डोळे भिडवून निर्धास्तपणे बोलतो व त्याला जुलूम करण्यापासून रोखण्याचे प्रयत्न करतो. मुस्लिमांमध्ये ही शान बाकी नसेल तर त्यांचे जीवन अर्थहीन होईल व जिवंत असून मेल्यागत होईल. माननीय अब्दुल्लाह बिन अम्र बिन आस (रजि.) सांगतात की त्यांना मुहम्मद (स.) यांच्याकडून ऐकले आहे,

"जेव्हा तुम्ही पाहाल की मुस्लिम जुलमींना सांगायला भीतात की तुम्ही जुलमी आहात, तर समजावे की त्याला दुर्दशेत सोडून देण्यात आले आहे."

(हदीस : मुसनद अहमद)

स्पष्ट आहे की या कामासाठी मोठ्या हिंमत व सामर्थ्याची गरज आहे. याकरिताच म्हटले आहे की जुलमी बादशाहसमोर सत्य बोलतो. सर्वात मोठे धर्मयुद्ध (जिहाद) आहे व त्या मार्गात प्राण अपर्ण करणे सर्वात मोठे हौतात्म्य आहे. हे सत्य

आहे की जुलमीविरुद्ध या प्रकारच्या धैर्यवान लोकांनी उठाव केला नाही तर जुलूम वाढेल व त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील. अल्लाह जुलमास अजिबात पसंत करीत नाही. जेव्हा ते सीमेपलीकडे होऊ लागतो तेव्हा त्याचा क्रोध भयंकर दुर्घटनेच्या स्वरूपात प्रकट होतो व त्यात चांगले व वाईट सारेच गुरफटले जातात. याकरिताच हदीसमध्ये ठळकपणे म्हटले आहे की जुलमास वाढू देऊ नये, नाहीतर संपूर्ण समाज नष्ट होईल. माननीय अबू बकर सिद्दीक (रजि.) सांगतात की त्यांनी अल्लाहच्या पैगंबरांना असे बोलताना ऐकले होते,

"जेव्हा लोक जुलमीला पाहतील मात्र त्याचा हात धरून त्याला जुलूम करण्यापासून थांबवू शकणार नाहीत, असे होऊ लागल्यास लवकरच अल्लाह स्वत: त्या सर्वांवर भयंकर विनाशाची आज्ञा देईल." (हदीस : तिर्मिजी)

कोणत्याही समूहास जुलूम करू देऊ नये

अशा प्रकारे इस्लाम इच्छितो की कोणावरही जुलूम झाल्यास संपूर्ण समाजाने त्याला मदतीचा हात द्यायला हवा व जुलूम आटोक्यात आणायला हवे. एक समूह दुसऱ्या समूहावर अत्याचार करत असतो. अशा घटना जगभर होत आहेत. जर इस्लामी समाजात अशी स्थिती निर्माण होत असेल तर कुरआन आदेश देतो,

"आणि जर श्रद्धावंतांपैकी दोन गट परस्परांशी लढलेच तर त्यांच्या दरम्यान समेट घडवून आणा, मग जर त्यांच्यापैकी एका गटाने दुसऱ्या गटाची आगळिकी केली तर आगळिकी करणाऱ्याशी लढा येथपावेतो की तो अल्लाहच्या आदेशाकडे परत येईल, मग जर तो परत आला तर त्यांच्या दरम्यान न्यायाने समेट करा आणि न्याय करा, अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो. श्रद्धावंत तर एक दुसऱ्याचे भाऊ आहेत, म्हणून आपल्या भावांच्या दरम्यान संबंध सुरळीत करा आणि अल्लाहच्या प्रकोपाचे भय बाळगा, आशा आहे की तुमच्यावर दया केली जाईल."

(दिव्य कुरआन - ४९ : ९-१०)

कुरआनच्या उपरोक्त श्लोकात स्पष्ट केले आहे की मुस्लिमांच्या दोन गटांत भांडण होता कामा नये. ते आपसात भांडू लागतात हा केवळ एक संयोग आहे. कुरआनातील शब्दांवरून लक्षात येते की वस्तूस्थिती स्पष्ट आहे की दोन्ही गटांत मांडवली घडवून आणल्यानंतर एखाद्या गटाने ऐक्याच्या अटी मान्य न करता

त्याच्याविरुद्ध बंड पुकारावे असे सहसा होत नाही. असे नेहमी घडत नाही.

(राजी, तफसीर कबीर)

१) मुस्लिमांचे दोन गट जर आपसात भांडू लागले तर सांगण्यात आले आहे की त्यांच्यात सहमती घडवून आणा, याकरिता त्यांना समज देण्यात यावी, गैरसमज दूर करण्यात यावे व आपसात मतभेद व विवादाचे दुष्परिणाम नजरेस आणून देण्यात यावे. आपल्या प्रभावाचा उपयोग करण्यात यावा अर्थात त्यांच्या लक्षात आणून देण्यात यावे की इस्लाम याला पसंत करतो, अल्लाह याला पुण्यकर्म मानतो.

माननीय अबू दरदा (रजि.) कडून समजते की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आम्हाला प्रश्न विचारला, "तुम्हाला असे कर्म दाखवू का, ज्याला नफील (ऐच्छिक) रोजे, सदका (दान) व नमाजहूनही जास्त श्रेष्ठत्त्व प्राप्त आहे." आम्ही सांगितले, "अवश्य सांगा." पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले, "ते आहे लोकांचे आपसातले संबंध सुधारणे व त्यांच्यातले मतभेद दूर करणे. लोकांचे आपापसातले संबंध बिघडणे म्हणजे लोकांतील सभ्यता (सुसंस्कार) संपुष्टात आणणारे कर्म आहे."(हदीस : तिर्मिजी)

२) हे आपासतले ऐक्य व न्याय अल्लाहच्या ग्रंथा (कुरआना)नुसार होतील. असे करताना कोणत्या पक्षाला फायदा व कोणत्या पक्षाला नुकसान होते याची चिंता बाळगू नये. अल्लामा नववी म्हणतात,

"त्यांच्यात एकोपा घडवून आणा. असे सांगा की अल्लाहच्या ग्रंथात जे आदेश आहेत ते मान्य करा व त्याचा निर्णय नि:संकोचपणे स्वीकार करा, मग ते तुमच्या बाजूने असो वा तुमच्या विरुद्ध."

३) भांडण मिटवणेच पुरेसे नाही. उलट न्याय अल्लाहच्या मर्जीनुसार व्हायला हवा. जेणेकरून अत्याचारिताला त्याचे अधिकार प्राप्त व्हायला हवे व भांडणाचा समूळ अंत व्हायला हवा. जर विवादाचे मूळ शिल्लक राहिले तर पुन्हा विवाद निर्माण होऊ शकतो. अल्लामा अबू सऊद म्हणतात,

"त्यांच्या दरम्यान न्याय करा व भांडण मिटवा. न्याय अशा प्रकारचा की जो अल्लाहच्या आदेशानुसार होतो. मात्र त्यांच्यात परकेपणा कायम राहिल्यास संतुष्ट राहू नका, नाहीतर त्यांच्यात पुन्हा भांडण होऊ लागेल."

(तफसीर : अबू सऊद हामिश अल-राजी)

४) विवाद व मतभेदानंतर न्यायापासून दूर होण्याची शक्यता असते म्हणून

त्याच्यावर विशेष लक्ष दिले गेले पाहिजे, जेणेकरून कोणत्याही स्तरावर न्यायापासून दूर होण्याची शक्यता निर्माण होऊ नये. अल्लामा अबू सऊद म्हणतात,

"दुसऱ्यांदा सुधारणेच्या आदेशासह न्याय करण्याची अट याकरिता लावण्यात आली आहे की युद्धानंतर जे करार होतील त्यात अन्याय होण्याची शक्यता आहे. यावर आणखी तीव्रता आणून सांगण्यात आले आहे की तुम्ही जे काही कराल किंवा करणार नाही ते सारे काही न्यायाच्या चाकोरीत राहून करा." (तफसीर - अबू सऊद)

५) दोहोंपैकी एक पक्ष जुलूम व अतिरेक करत असेल व सत्य व न्यायापुढे नमत नसेल तर अत्याचारित पक्षाची साथ देणे आवश्यक आहे, जेणेकरून बलपूर्वक त्याचा हक्क जुलमीकडून मिळवता यावा. अल्लामा अबू सऊद म्हणतात,

"सद्भावना व सलोख्याच्या प्रयत्नाला त्या व्यक्तीचा सहयोग आवश्यक आहे ज्याच्यावर अत्याचार झाला आहे." (तफसीर अबू सऊद)

६) जो समूह जुलूम व अतिरेक करील त्याच्याविरुद्ध बलप्रयोग तेव्हाच होईल जेव्हा संबंध सुधारण्याचे प्रयत्न असफल होतील. तत्पूर्वी बलप्रयोग योग्य नाही. अल्लामा अबू बकर जस्सास हनफी म्हणतात,

"अल्लाहने युद्धापूर्वी सत्य व न्यायकडे बोलाविण्याचा आदेश दिला आहे. जर तो सत्य व न्यायाकडे वळायला तयार नसेल तर त्याच्याविरुद्ध युद्ध केले जाईल."

(अहकामुल कुरआन तिलजस्सास)

अल्लामा इब्ने अरबी मालिकी म्हणतात,

"अल्लाहने युद्धापूर्वी आपसात वाद मिटविण्याचा आदेश दिला व युद्धाला त्या स्थितीकरिता विशेषकरून टाकले आहे जेव्हा विद्रोह व शत्रुत्त्व होत असेल."

७) जुलमी व विद्रोही समूहाच्या विरुद्ध बळाचा उपयोग कोणी करावा व कोणत्या सीमेपर्यंत करावा हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. याचे सविस्तर उत्तर अबू बकर जस्सास हनफी यांनी दिले आहे. त्याचा संक्षिप्त भाग असा आहे,

जर विद्रोही गट अल्लाहच्या आदेशानुसार मांडवली करण्यास तयार नसेल तर त्याच्याशी युद्ध करण्यात यावे. या परिस्थितीत युद्धाची पूर्ण सूट आहे. यासाठी थोड्या थोडक्या बळाच्या उपयोगाने प्रश्न सुटत असेल तर तसे करावे अर्थात लाठी (काठी)चा उपयोग करणे. अशा परिस्थितीत मोठ्या बलाचा उपयोग करू नये. जर विद्रोही या

उपायाला दाद देत नसेल तर तलवारीचा उपयोग करायला हरकत नाही. या स्थितीतही तलवारीचा उपयोग करणे योग्य नाही, हे म्हणणे रास्त नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा उपदेश आहे की तुमच्यापैकी जी व्यक्ती दुष्कर्म पाहील ती बळाच्या उपयोगाने त्यास नष्ट करू शकते. तो तेवढा सशक्त नसेल तर शब्दाचा उपयोग करील (अर्थात आवाजाचा उपयोग करील) व जर हेही करू शकत नसेल तर ते दुष्कर्म आहे असे म्हणून नापसंती व्यक्त करेल. हा श्रद्धेचा (इमानचा) सर्वात खालचा दर्जा आहे. या हदीसमध्ये पैगंबर (स.) यांनी दुष्कर्मास बळाच्या आधारे नष्ट करण्याचा आदेश दिला आहे. तात्पर्य असे की दुष्कर्मास कोणत्याही प्रकारे नष्ट करणे अनिवार्य आहे.

(अहकामुल कुरआन लिल जस्सास)

सांगण्याचे तात्पर्य असे की अशा परिस्थितीत शासक व समाज यांच्यात अंतर ठेवायला हवे. जुलूम व अतिरेकी कारवाया नष्ट करणे खरे पाहता प्रशासनाची जबाबदारी आहे. जर प्रशासनाला आपल्या जबाबदारीची जाणीव नसेल तर समाजाचे कर्तव्य आहे की त्याने प्रशासनाला जागृत करावे व जुलूम नष्ट करण्याकामी त्यास सहकार्य करावे. उदाहरणार्थ, अत्याचरिताच्या बाजूने साक्ष द्यावी, त्याला नैतिक व आर्थिक मदत करावी, जुलमी व अत्याचारी पक्षास कोणत्याही प्रकारे मदत करू नये, उलट त्याचा सामाजिक बहिष्कार करावा व त्याला उचित शिक्षा होईल, याकरिता प्रयत्न करावे. अशा प्रकारे समाज बरेच प्रयत्न करू शकतो. गरज भासल्यास अत्याचारिताच्या प्राण व वित्त तसेच अब्रूच्या संरक्षणार्थ आपल्या शक्तीचा उपयोग करू शकता, परंतु या बाबतीत त्याला एका मर्यादेचे बंधन पाळावे लागते. कायदा आपल्या हातात घेण्याचे त्याने टाळायला हवे.

कदाचित शासन व्यवस्था स्वत: जुलूम व अत्याचाराचा मार्ग अवलंबेल. त्यासही थोपवून धरण्याची गरज निर्माण होते. परंतु हे फार कठीण काम आहे. जुलमीला थोपवून धरताना विशेष काळजी बाळगणे आवश्यक आहे. लक्षात ठेवायला हवे की एक अत्याचार थांबविताना दुसऱ्या जुलमाची सुरूवात होता कामा नये. तफसीर कबीर मध्ये हीच बाब सविस्तर सांगण्यात आली आहे.

"तुम्ही युद्ध करा त्यांच्याशी जे मर्यादेचे उल्लंघन करतात. अर्थात ते तुमच्यावर जुलूम करतात. अत्याचारिताची जुलमीपासून सुरक्षा करणे तुमचे कर्तव्य आहे. जर प्रजेवर जुलूम होत असेल तर शासकाचे कर्तव्य आहे की त्यांनी अत्याचार आटोक्यात आणावा. जर शासक स्वत:च अत्याचारी असेल तर मुस्लिमांचे कर्तव्य आहे की ते

शासकास समजावून सांगावे. समज देऊनही जुलूम जर थांबत नसेल तर योग्य तो उपाय योजावा. पण लक्षात ठेवावे की असे करताना त्याच प्रकारचा दुसरा उपद्रव निर्माण होता कामा नये की ज्यात दोन गटांमध्ये दंगल निर्माण होते.''

अशा प्रकारे इस्लाम शासक व समाज दोहोंना अत्याचाराविरुद्ध उभा करतो व दोहोंच्या सहकाराने जुलूम नष्ट होतो. इस्लाम शासन व्यवस्थेस आदेश देतो की अत्याचार नष्ट करण्याच्या कामात शासनास सहकार्य करावे व याकडे कटाक्षाने पाहत राहावे की शासन व्यवस्था स्वत: न्यायाच्या मार्गापासून दूर तर होत नाही ना!

जुलमी व अत्याचारित दोहोंना मदत करावी

इस्लाम समाजास अत्याचारमुक्त करू इच्छितो. याकरिता तो जुलमाविरुद्ध कडक व्यवस्था करतो, मात्र जुलमीविरुद्ध घृणा व शत्रुत्त्वाची भावना भडकवीत नाही, उलट त्याच्याप्रति सहानुभूती व हितकर्ताच्या स्वरूपाने समज देतो. खरे तर जुलमी आपल्या अनुचित व्यवहाराने, त्याला त्याची जाणीव असो व नसो, स्वत:चाच सर्वनाश करीत असतो. त्याचे ऐहिक व पारलौकिक जीवन दोन्हीही बर्बाद होतात. इस्लाम अत्याचारिताचे तसेच जुलमीचे वाईट चिंतित नाही. त्यास दोहोबद्दल सहानुभूती आहे व तो दोहोंना वाचवू इच्छितो. परंतु या सहानुभूतीचे स्वरूप वेगळे आहे. हदीसमध्ये म्हटले आहे की जुलमी व अत्याचारित दोहोंना तुमच्या सहानुभूतीची गरज आहे. अत्याचारिताची गरज आहे की त्याला जुलमीपासून वाचविण्यात यावे व जुलमीला जुलूम करण्यापासून दूर ठेवावे. माननीय अनस (रजि.) सांगतात की अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचा उपदेश आहे,

''आपल्या भावाची मदत करा, मग तो जुलमी असो वा अत्याचारित.'' पैगंबरांच्या सहकाऱ्याने विचारले, ''जर तो अत्याचारित असेल तर निस्संदेह आम्ही त्याची मदत करू, परंतु जुलमी असेल तर त्याची आम्ही कशी मदत करणार?'' पैगंबर (स.) यांनी उत्तर दिले, ''तुम्ही त्याचे हात पकडा (आणि त्यास जुलूम करू देऊ नका, हीच त्याची मदत आहे.)' (हदीस : बुखारी)

इस्लामच्या प्रसारापूर्वी अरबस्तानात प्रत्येक बाबतीत आपले नातेवाईक, वंश, जमाती, जाती व सोयऱ्यांची योग्य अयोग्य बाबतीत विचार न करता मदत केली जात होती. याच कारणास्तव त्यांचे आपसांत रक्तपात व छळ होत असत. इस्लामने या अज्ञानपूर्ण पक्षपातास समूळ नष्ट केले. त्याने म्हटले की आपल्या आप्तजनांबद्दल

सहानुभूती अवश्य बाळगा. यात काही शंका नाही. परंतु या सहानुभूतीचा अर्थ असा की जुलूम व अतिरेक होत असेल तर त्यास थांबविण्याचा प्रयत्न करायला हवा. असा अर्थ मुळीच नाही की आपला मनुष्य आहे म्हणून तो जरी विनाशाच्या खड्ड्यात पडत असेल तर आपणही त्याला सोबती व्हावे.

माननीय जाबिर (रजि.) सांगतात की दोन तरूण ज्यात एकतर मुहाजिद (बाहेरून मदीना शहरात आलेला) व दुसरा अन्सारी (मदीना निवासी), दोहोंत भांडण झाले. अन्सारी युवकाने मदीना निवासींना मदतीसाठी हाक दिली. मुहाजिद युवकानेसुद्धा मुहाजिदांना हाक मारली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हे ऐकले व बाहेर आले. लोकांनी सांगितले, "दोन युवकांमध्ये भांडण झाले आहे. विशेष काही नाही!" यावर पैगंबर (स.) निश्चिंत झाले की कोणतीच विशेष घटना घडली नाही. म्हणतात की युवकांची हांक ऐकूण पैगंबर (स.) यांनी म्हटले, "ही आरडाओरड बंद करा, या फार गलिच्छ हाका आहेत!"

यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

"मनुष्याला आपल्या भावाची मदत करायला हवी, मग तो जुलमी असो व अत्याचारित. जर तो जुलमी असेल तर त्याला जुलूम करू देऊ नये. हीच त्याची मदत आहे व अत्याचारित असेल तर अत्याचाराबरोबर जुलमीशी सामना करताना त्याच्या समर्थनात लढावे." (हदीस : मुस्लिम)

कोणत्याही व्यक्ती वा समूहावर होत असलेल्या अत्याचारावर एका मुस्लिमाला ज्या यातना होतात (किंवा व्हायला हव्यात) व ज्या निष्ठे व सहानुभूतीने अत्याचार संपुष्टात आणू इच्छितो, तितकीच सहानुभूती जुलमीवरही व्हायला हवी. त्यालाही विनाशापासून वाचविण्याची त्याच्या हृदयात तळमळ, वेदना व सहानुभूती व्हायला हवी. खरे तर अत्याचारिताचे तर ऐहिक नुकसान होते, पण जुलमीचे ऐहिकच नव्हे तर पारलौकिकही नुकसान होते. हा फार मोठा विनाश आहे. खरे तर अत्याचारितापेक्षा जुलमीवर अधिक सहानुभूती व्हायला हवी.

अत्याचारिताचे अधिकार

एखाद्या व्यक्तीवर जुलूम वा अतिरेक होत असेल तर त्याला त्याविरुद्ध आवाज उठविण्याचा अधिकार प्राप्त असला पाहिजे व त्याला नुकसानभरपाई मिळायली हवी. अशी व्यवस्था नसल्यास समाजात दुर्बलांचे अधिकार सुरक्षित राहणार नाहीत. ज्याच्या हातात शक्ती असेल तो दुर्बलांच्या अधिकारांचे हनन करीत राहील व त्याला कोणीच जाब विचारणार नाही. इस्लामने अत्याचारितास ते सर्व अधिकार दिले आहेत. ज्यांच्याद्वारे तो अत्याचाराविरुद्ध सामना करू शकतो. जुलमीचे दुष्कर्म उघडकीस आणू शकतो व त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करू शकतो. येथे काही अधिकारांचा उल्लेख केला जात आहे.

अत्याचारित, जुलमीविरुद्ध तक्रार करू शकतो

जर एखाद्यावर जुलूम व अतिरेक होत असेल तर जुलमीविरुद्ध कारवाई करण्याचा स्वाभाविक अधिकार आहे, परंतु समाजातील दुर्बल व इतर सामाजिक गटांना अशा प्रकारच्या अधिकारांपासून वंचित ठेवले गेले आहे व त्यांना इतके दाबून व दडपून ठेवले जाते की त्यांच्यावर कितीही मोठा अत्याचार होत असेल तरी ते त्यांच्याविरुद्ध कोणतीच कारवाई करू शकत नाहीत. ते आपल्या अधिकारांचे स्वामी नाहीत व त्यांच्या अधिकारांवर दमन करणाऱ्या जुलमी लोकांना प्रेम, आपुलकी व सहानुभूतीची भाषा येतच नाही. इस्लामने अत्याचारितांना जुलमीविरुद्ध आवाज उठविण्याचे अधिकार दिले आहेत व जाहीर केले आहे.

“अल्लाह हे पसंत करीत नाही की माणसाने अपशब्दाकरिता तोंड उघडावे परंतु या व्यतिरिक्त की एखाद्यावर अत्याचार केला गेला असेल, आणि अल्लाह सर्वकाही ऐकणारा व जाणणारा आहे.” *(दिव्य कुरआन - ४ : १४८)*

एखादी चुकीची व घाणेरडी बाब व्यक्त करणे व त्यावर चर्चा करणे अत्यंत आवांच्छनीय सवय आहे. त्यामुळे ती बाब वाढत जाते. एका ठिकाणी असलेली घाण दहा ठिकाणी पसरले. एखाद्यावर जुलूम झाला असल्यास त्याबाबत तो बोलू शकतो, तो त्याचा अधिकार आहे. त्याच्या बोलण्यामुळे एका जुलमीचा लोकांना परिचय होतो व समाज त्याच्यापासून जागृत होतो व बोलणाऱ्या अत्याचारिताशी लोकांमध्ये सहानुभूति जागृत होते व त्याच्यावर होणाऱ्या अत्याचाराची नुकसानभरपाई होते.

जुलूम व दुव्यवहाराचे बरेच प्रकार असतात. माणसाशी ज्या ज्या प्रकारे जुलूम होतो तो त्याने व्यक्त करायला हवा व त्याकरिता त्याला पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त असायला हवे. उपरोक्त श्लोकांमध्ये अत्याचारिताने त्याच्याविरुद्ध होणारे केवळ जुलूमच त्याने प्रकट करावे, इतकेच नसून त्याने बदलाही घ्यावा, असे म्हटले आहे. म्हणून सद्दी म्हणतात,

"निश्चितच अल्लाहला ही बाब नापसंत आहे की कोणाही व्यक्तीने वाईट गोष्ट व्यक्त करावी. परंतु अल्लाहचा आदेश आहे की ज्यावर जुलूम झाला आहे वा तो जर बदला घेऊ इच्छित असेल तर तो गुन्हेगार नाही."

अल्लामा इब्ने जरीर तबरी यांनी सर्व बाबींचा विचार करून म्हटले आहे,

"कोणाची उघड उघड बदनामी करणे अल्लाहला पसंत नाही. मात्र एखाद्या व्यक्तीवर जुलूम झाला असल्यास तो जर त्या जुलूमाबाबत चर्चा करीत असेल तर त्यात कोणताच दोष नाही. एखाद्याने एखाद्या पाहुण्याचा योग्यरित्या पाहुणचार केला नसेल किंवा एखाद्याचा जीव वा वित्तहानी केली असेल तर त्याबाबत चर्चा करण्यात कोणताच दोष नाही. अत्याचारित अल्लाहकडून मदतीसाठी प्रार्थनाही करू शकतो. तो जर उंच आवाजात प्रार्थना करीत असेल तर तेही वैध मानले जाईल." (तफ्सीर इब्ने जरीर)

खजीन लिहितात,

"विद्वानांनी म्हटले आहे की लोकांच्या गुप्त गोष्टी दुसऱ्यांना सांगणे योग्य नाही. कारण असे केल्याने लोक दुसऱ्याची निंदा करण्यात सहभागी होतात व गुप्त गोष्टी सांगणाऱ्याबद्दल लोक संशय घेऊ लागतात. मात्र ज्याच्यावर अत्याचार झाला असेल तो अत्याचाराबाबत दूसऱ्याशी बोलू शकतो. त्याची कोणती वस्तु कोणत्या व्यक्तीने चोरली वा हिसकावून घेतली वा त्याला कोणी दुरुत्तर दिले तर त्यांना सडेतोड उत्तर देण्याची अनुमती आहे." (तफसीरुल खजीन)

ज्याच्यावर जुलूम झाला आहे त्याला बोलण्याची संधी न दिल्यास त्याच्यावर आणखी जुलूम होतील. अत्याचारितांचे तोंड बंद केल्याने जुलमीला नेमकी संधी मिळते व तो बिनधास्त होतो व त्यास कोणीही आटोक्यात आणू शकत नाही. इस्लामने अत्याचारितास त्यावर होणाऱ्या अत्याचाराची अभिव्यक्ती स्वातंत्र्य देऊन समाजाची सहानुभूती मिळविण्यास मदत केली आहे. इस्लाम जुलूम व अत्याचार संपुष्टात आणू इच्छितो.

प्रत्येक व्यक्ती आपले अधिकार मागू शकते

हदीसमध्ये अगदी स्पष्ट शब्दांत म्हटले गेले आहे की जो तो आपले वैध अधिकार मागू शकतो. त्याला या अधिकारापासून वंचित केले जाऊ शकत नाही. एखाद्याच्या दुर्बलतेचा फायदा घेणे व त्याच्या रास्त अधिकारापासून त्याला वंचित ठेवणे. गैरइस्लामी कृत्य आहे. वैध अधिकाराची मागणी करताना जर जोरजबरदस्ती केली गेली असेल तरी ती सहन करायला हवी. माननीय अबू हुरैरा (रजि.) यांचे वर्णन आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी एका व्यक्ती (संभवता गैरमुस्लिम) कडून उंट कर्जाऊ घेतले. त्यांने कर्ज परत करण्याची घाई केली व कठोरता दर्शविली. तेव्हा सहकाऱ्याने त्याला कडक उत्तर देण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पैगंबर (स.) यांनी सांगितले,

''याला सोडून द्या. तो हक्कदार आहे व त्याला बोलण्याचा अधिकार आहे.'' नंतर आदेश दिला, ''एक उंट खरेदी करून त्याला देऊन टाका.'' सहकाऱ्यांनी सांगितले, ''ज्या वयाचा उंट त्याच्याकडून घेतला गेला होता त्या वयाचा उंट उपलब्ध नाही. त्याच्यापेक्षा चांगला उंट उपलब्ध आहे. पैगंबर (स.) यांनी आदेश दिला, ''तोच उंट त्याला देऊन टाका. तुमच्यात ती व्यक्ती चांगली आहे जी कर्ज चांगल्या मार्गाने फेडण्याचा प्रयत्न करते.''

(हदीस : बुखारी)

या हदीसची व्याख्या करून हाफीज इब्ने हजर सांगतात,

''तो जोरात बोलू शकतो व तर्कशुद्ध भाषेत बोलू शकतो, परंतु शरीअत (इस्लामिक कायद्या)ने जे शिष्टाचार सांगितले आहेत त्यांचा आदर करायला हवा.''

(फत्हुल बारी)

तात्पर्य असे की स्थापित कायद्यानुसार मर्यादेत राहून ज्याचा अधिकार आहे तो पूर्ण शक्तीनिशी आपला अधिकार मागू शकतो. याच हदीसच्या संदर्भात इब्नुल मलिक म्हणतात, ''ज्याचा हक्क आहे तो आपला अधिकार जर मिळत नसेल. तर केवळ तक्रारच व दमदाटीच नव्हे तर तो कायदेशीर कारवाईही करू शकतो.'' ते म्हणतात,

''येथे हक्क म्हणजे कर्ज आहे ज्याचा आपल्या कर्जदारावर अधिकार आहे व कर्जदार जर दिरंगाई करीत असेल तर कर्ज देणारा त्याची तक्रार करू शकतो, तो त्याला कोर्टात नेऊ शकतो व त्याला दमदाटीही देऊ शकतो. हदीसमध्ये शब्द 'मकाल' वापरला गेला आहे त्याचा हाच अर्थ होतो.

हक्क देण्यात टाळाटाळ करणे जुलूम आहे

एक मनुष्य दुसऱ्या माणसाचा हक्क अदा करण्यात टाळाटाळ व दिरंगाई करीत असेल किंवा हक्कदार आपल्या रास्त अधिकारापेक्षा जास्तची मागणी करीत असेल तर दोन्ही गोष्टीचा समावेश जुलमात होतो. अशा वर्तनावर बंदी न आणल्यास जुलमाची व्यापकता वाढत जाईल. इस्लाम अशा वागणुकीला चुकीचे व अवैध मानतो व ते थांबविण्यासाठी कडक उपाय योजतो. माननीय अबू हुरैरा (रजि.) सांगतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

"धनवानाच्या (कर्ज परतफेडीच्या बाबतीत) टाळाटाळ करणे जुलूम आहे. (मुस्लिमांकडून अशा प्रकारच्या व्यवहाराची अपेक्षा केली जात नाही.) तुमच्यापैकी जर एखाद्याला श्रीमंताकडे आपल्या कर्जवसुलीसाठी पाठविण्यात आले तर त्याने त्याच्याकडे जावे व त्याच्याकडून कर्जवसूली करावी. या प्रक्रियेस शरीयतच्या भाषेत "हवाला" म्हणतात.' (हदीस : बुखारी)

हदीसमध्ये 'मतल' शब्द आला आहे. याचा अर्थ आहे उत्तरदायित्व पार पाडण्यात विलंब करणे वा बनवाबनवी करणे. इमाम नववी, काजी अयाज आदि यासंदर्भात म्हणतात -

"उत्तरदायित्व स्वीकारण्यास नकार देणे म्हणजे 'मतल' होय."

(हदीस : मुस्लिम)

हाफीज इब्ने हजर याची (मतलची) परिभाषा अशा प्रकारे करतात,

"ज्या वस्तूंची परतफेड करणे आवश्यक होते त्याच्या परतफेडीत विनाकारण विलंब करणे." (फतहुल बारी)

हदीसचा अर्थ असा आहे की जी व्यक्ती सामर्थ्यवान आहे तिने उत्तरदायित्व पार पाडण्यात विलंब करणे रास्त नाही, कारण विलंब करण्याची काही गरज नाही. उत्तरदायित्व न स्वीकारणे जुलूम तर आहे ते पार पाडण्यात विलंब करणे हाही गुन्हा आहे. इमाम नववी म्हणतात,

"या हदीसनुसार कोणत्याही सधन व्यक्तीला त्याचे उत्तरदायित्व पार न पाडणे जुलूम व वर्ज्य आहे." (हदीस : मुस्लिम)

हक्क अदा करण्यात टाळाटाळ (विलंब) करणारा गुन्हेगार आहे

जी व्यक्ती कोणतेही उचित कारण नसताना कर्ज व कोणत्याही प्रकारचा हक्क जाणूनबुजून अदा करण्यात विलंब लावत असेल तर त्याला विद्वानांनी (उलेमानी) गुन्हेगार मानले आहे.

हक्क अदा न केल्यास शिक्षा दिली जाऊ शकते

एखाद्याचे रास्त हक्क मुद्दाम अदा न करणे व काहीतरी खोटी कारणे सांगणे स्पष्टपणे जुलूम आहे. अशा व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करता येते. हाफीज इब्ने हजर उपरोक्त हदीसच्या संदर्भात लिहितात,

"अशा प्रकारे खोट्या सबबी सांगून कर्ज फेडण्याकामी टाळाटाळ करणाऱ्याला वेठीस धरायला हवे व कर्ज फेडण्यास त्याला जबाबदार ठरविणे व त्याच्याकडून कर्ज वसूल करण्याच्या वेगळा प्रयत्न करणे व बलपूर्वक त्याच्याकडून कर्ज वसूल करण्याचे पुरावे मिळतात."

एका हदीसमध्ये ही बाब अधिक स्पष्टपणे सांगितली गेली आहे. माननीय अमर बिन शुरैह यांनी आपल्या पित्याकडून माहिती मिळविली आहे. ते म्हणतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आदेश दिला आहे,

"ज्याच्याजवळ पैसे शिल्लक आहेत व तो कर्ज फेडत नसेल तर त्याच्या प्रतिष्ठेची पर्वा न करता त्याच्याकडून कर्जदार समजून त्याला शिक्षा देण्यात यावी."

(हदीस : अबू दाऊद)

याचा अर्थ असा की जी व्यक्ती कर्ज अदा करण्याचे सामर्थ्य असूनही हक्कदाराचा हक्क अदा करीत नसेल. उलट तो हक्क हडप करण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याच्या जुलूम-जबरदस्तीला जगजाहीर करणे योग्य होईल. असे केल्याने त्याच्या सन्मानाला कलंक फासला जात असेल व त्या खोट्या गौरवास बदनामीचा काळीमा फासला जात असेल तर दुसऱ्या कोणासही दोष देता कामा नये. इतकेच नव्हे, शासनाने त्याच्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याच्या अधिकाराचा वापर केला पाहिजे. शासन त्यास उचित दंड देऊ शकते. यासाठी माननीय अब्दुल्लाह बिन मुबारक या हदीसचा खुलासा करतात,

"तो आपल्या इभ्रतीला वैध मानतो. (अर्थात तो आपल्या कृत्याने स्वतः सिद्ध करतो की कोणीही त्याच्या इभ्रतीचा सन्मान न केल्यास हरकत नाही) याचा अर्थ की त्याला दमदाटी दिली जाईल व तुरुंगवास दिला जाईल." (हदीस : अबू दाऊद)

अल्लामा शौकानी म्हणतात,

"या हदीसने लक्षात येते की जी व्यक्ती कर्ज अदा करू शकते. पण कर्ज मुद्दाम अदा करीत नसेल तर त्याच्याविरुद्ध कारवाई व कडक उपाय म्हणून तुरुंगवास दिला जाऊ शकतो, जोपर्यंत तो कर्ज फेडत नाही." (तैलुल : अवतार)

निर्धन कर्जदार

उपरोक्त हदीसमध्ये म्हटले गेले आहे की एखाद्या गरीब व्यक्तीने कर्ज अदा केले नसेल तर त्याने जुलूम केल्याचे म्हटले जाणार नाही. माननीय अबू हुरैरा (रजि.) यांच्यामार्फत कळते की जो धनी असून कर्ज फेडत नाही तो जुलूमी आहे, असे मानले जाते. या संदर्भात इमाम नववी लिहितात,

"ही बाब स्वयंसिद्ध आहे की एखादा गरीब-निर्धन व्यक्ती जर कोणाचे कर्ज फेडू शकत नसेल तर तो जुलूम करतो आहे असे म्हणता येणार नाही, कारण तो विवश आहे. याच प्रकारे एखाद्या माणसाकडे कर्जफेडीसाठी पुरेशी रक्कम नाही किंवा इतर कोणत्या तरी उचित कारणामुळे तो विलंब करीत आहे तर ते वैध आहे."

(हदीस : मुस्लिम)

ही गोष्ट उपरोक्त हदीसच्या विपरीत भावार्थामध्ये व्यक्त करण्यात आली आहे. काही लोक याचे समर्थन करीत नाहीत. हाफीज इब्ने हजर म्हणतात.

"जी व्यक्ती कर्ज अदा करू शकत नाही तिला टाळाटाळ करणारी मानता येणार नाही. एखादा मनुष्य त्याच्याकडे पुरेसे पैसे उपलब्ध नसल्यामुळे कर्ज अदा करीत नसेल तर तो जुलूम करतोय असे मानता येणार नाही. याचा उपाय असा की अशा व्यक्तीस जकातीच्या रकमेतून (जी गरीबांसाठी राखीव आहे) देता येईल. जर तो आत्मनिर्भर आहे तर त्याला जकात दिली जाऊ शकत नाही." (फतहुल - बारी)

सांगण्याचे तात्पर्य असे की हदीसचा "विपरीत भावार्थ" काढण्याची गरज नाही. हदीसमध्ये जी चेतावणी दिली गेली आहे ती आत्मनिर्भर व्यक्तीसाठी आहे. जो

आत्म निर्भर नाही त्याच्याकरिता ही चेतावणी नाही. कदाचित याच कारणास्तव इमाम नववी म्हणतात,

"आत्मनिर्भर ती व्यक्ती आहे जी रास्त हक्क त्वरित अदा करू शकते. जो या स्थितीत नाही, त्याला आत्मनिर्भर मानता येणार नाही." (हदीस : मुस्लिम)

या हदीसवरून लक्षात येते की जी व्यक्ती निर्धन आहे तिला कर्ज अदा न केल्यावर अटक करता येत नाही.

कोणतेही हक्क अदा करताना टाळाटाळ करणे योग्य नाही

ज्या प्रकारे कर्ज अदा करण्यात बनवाबनवी व टाळाटाळ करणे जुलूम आहे त्याच प्रकारे इतर अधिकार जे एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीवर असतात त्यांनाही पूर्ण करण्यात टाळाटाळ व विनाकारण विलंब करणेही जुलूम समजले जाईल. इब्ने हाफीज इब्ने हजर म्हणतात,

'मतल' (टाळाटाळ करणे) मध्ये ते सर्व व्यक्ती सामील आहेत ज्यांच्यावर कोणता न कोणता हक्क अनिवार्य असतो. जसे पतीवर-पत्नीचा, मालकावर-गुलामाचा, शासकावर-जनतेचा हक्क असतो. याच्या विपरित हेच आदेश आहेत." (फतहुल बारी)

कर्जदाताने हवाला (हस्तांतरण) स्वीकार करावे

जी व्यक्ती धनवान आहे व कर्जाची परतफेड करू शकते, हदीसमध्ये तिला कर्जाची परतफेड करण्यात विलंब न करण्याचा आदेश दिला गेला आहे. तसेच कर्ज देणाऱ्याला आदेश देण्यात आले आहे की जर कर्ज घेणाऱ्याने आपल्यावरील कर्ज इतर व्यक्तीकडून वसूल करण्याची विनंती केली तर कर्ज देणाऱ्याने अशा हस्तांतरा (हवाला पद्धतीला) चा स्वीकार करावा.

"जर कर्जदार विनंती करीत असेल की इतर कोणत्याही व्यक्तीकडून कर्ज वसूल करून घ्या, तर अशा हवाल्याचा (हस्तांतराचा) कर्जदात्याने स्वीकार करावा."

इमाम नववी म्हणतात,

"जर कर्जदार हवाला देत असेल व अमुक व्यक्तीकडून कर्ज वसूल करून घ्या, (हदीस : मुस्लिम)

तर सर्व विद्वानांनी अशा हवाल्यास स्वीकार करण्यास सहमती दर्शविली आहे. काही लोकांनी यास वैध मानले आहे. दाऊद जाहिरी वगैरेनी याला अनिवार्य म्हटले आहे.''

हाफिज इब्ने हजर म्हणतात,

''सर्व विद्वानांनी या प्रकारच्या व्यवहारास पसंत केले आहे. एक मत असेही आहे की हा वैध व्यवहार आहे, हंबली पंथियाच्या विद्वानांत बऱ्याचदा तसेच अबू सोर, इब्ने जरीर व अहले जाहिर यांनी यास अनिवार्य मानले आहे.'' (फतहुल - बारी)

सांगण्याचे तात्पर्य असे की कर्जदाराकडून कर्जदात्यास जर आपले कर्ज वसूल करण्याचा एखादा प्रस्ताव दिला जात असेल तर तो स्वीकारायला हरकत नाही. एखाद्या धनवान व्यक्तीचा हवालासुद्धा अशाच प्रकारचा उचित प्रस्ताव आहे. अशा कोणत्याही प्रस्तावाचा हट्ट करू नये की जो कर्जदारास अवघड वाटत असेल. वास्तविकत: कर्ज अदा करण्याची व कर्जदाऱ्याच्या मनात त्याला त्रस्त करण्याची भावना नसेल तर कधीकधी असल्या व्यवहारामुळे आपसातल्या संबंधात गुंता निर्माण होण्याची शक्यता असते. ती हळूहळू संपुष्टात येते व कर्जाच्या व्यवहारात वाईटपणा उरत नाही.

बदला घेण्याचा अधिकार आहे, पण क्षमा करणे बेहेत्तर

मानवी वृत्ती व बदला घेण्याची भावना

जर एखाद्यावर जुलूम व अत्याचार होत असेल व त्याच्या अधिकाराचे हनन होत असेल तर त्याच्या मनात दु:ख, क्रोध व बदल्याची भावना स्वाभाविकपणे निर्माण होते. त्याच्यावर जो अत्याचार झाला आहे. त्याचा बदला घेण्याची व ज्याने त्याचे नुकसान केले त्याचेही नुकसान करण्याची इच्छा निर्माण होते. काही लोक समजतात की ही एक पाशवी भावना आहे. ही भावना दडपली गेली पाहिजे. तसे न झाल्यास मानवाच्या मानवतेला धक्का पोहचेल व मानव पशुतुल्य होईल. पण या तीव्र भावनेला पाशवी भावना उद्देशून तिला दाबले जाऊ शकत नाही. कारण ही माणसाची स्वाभाविक भावना आहे. जर काही कारणांमुळे विवश होऊन त्याचा बदला त्याला घेता न आल्यास त्याचे तीव्र पडसाद उमटतात. त्याच्या मनात शत्रुत्त्व, द्वेष, चीड व ईर्षा वगेरे भावना निर्माण होतात व या भावनांमुळे त्याचे मानसिक संतुलन डगमगू लागले व संधी मिळताच तो प्रतिशोधाच्या ज्वलंत भावनेने काहीही करायला तयार होतो. त्याचे ते कृत्य माणुसकीच्या सीमेबाहेरचे असते.

यात शंका नाही की जनावरांमध्ये सुद्धा बदल्याची भावना असते. परंतु ज्या भावना माणसांत व जनावरांत समान असतात, त्या अयोग्य व चुकीच्या आहेत असे गृहीत धरता येणार नाही. भूक, तहान व यौनइच्छा मानवांप्रमाणे जनवरांतही असतात. दोहोंना आपला व्यक्तीगत व अनुवंशिक विकास घडवायचा असतो. मानवाच्या त्याच इच्छा पाशवी आहेत असे म्हणून त्यांचा धिक्कार करणे योग्य नाही. मात्र जनावर व मानव यांच्या इच्छापूर्तीमध्ये फरक आहे. जनावर आपल्या नैसर्गिक गरजेनुसार वागत असतात, मात्र मानव हा नैतिकता व कायद्याच्या बंधनाचा आदर करून आपल्या इच्छा व शारीरिक गरजांची पूर्तता करीत असतो. क्रोध व प्रतिशोधाची भावना मानवी विकासाच्या दृष्टीने तसेच सुरक्षेसाठी आवश्यक आहेत. याचकरिता तो त्याच्यावर होणाऱ्या अत्याचाराना संपविण्याचा व अधिकारांचा रक्षण करण्याचा प्रयत्न करीत असतो. ही भावना जर कमी झाली तर मनुष्य संवेदनहीन व स्वाभिमानहीन होऊ लागतो व जुलमापुढे शरणागती पत्करतो. प्रतिशोधाची भावना त्याच्या स्वभावातून पूर्णत: संपुष्टात आल्यास कोणीही त्याच्यावर अत्याचार व जुलूम करू लागेल व त्याचे अधिकार हिसकावून घेतले जातील.

हे एक सत्य आहे की जुलूम व अत्याचारांचा बदला घेऊन मनुष्य मानसिक समाधान प्राप्त करतो व असे समाधान प्राप्त करण्याचा त्याला प्राकृतिक अधिकार आहे. कायद्याच्या अस्तित्त्वाचा कोणीही इन्कार करत नाही. कारण कायदाही निर्धारित, नियमानुसार अत्याचाऱ्यास शिक्षा देऊन अत्याचारितास मानसिक समाधान देण्याचा प्रयत्न करत असतो. कायदा समाजाला सतुष्ट करतो व अत्याचारितासही त्याच्या प्रतिशोधाच्या भावनेस समाधान देतो. उघड आहे की कायद्याच्या शासनाला चुकीचे मानता येणार नाही व अराजकतेची परवानगी देता येत नाही. कारण या पद्धतीने प्रतिशोधाची भावना शांत होते.

बदला घेण्याची भावना इस्लामच्या नजरेत

इस्लाम बदल्याच्या भावनेस एका नैसर्गिक भावनेच्या दृष्टीने स्वीकार करतो व अत्याचारितास जुलमीविरुद्ध बदला घेण्याची परवानगी देतो. त्याने अल्लाहच्या सदाचारी व्यक्तींची एक विशेषता स्पष्ट केली आहे.

"आणि जेव्हा त्यांच्यावर अत्याचार केला जातो तेव्हा त्याचा मुकाबला करतात," *(दिव्य कुरआन -४२ : ३९)*

प्रश्न असा निर्माण होतो की बदला घेण्याची भावना प्रशंसनीय बाब आहे काय? अल्लाहच्या सदाचारी लोकांच्या विशेषता व गुणांच्या संदर्भात चर्चा करायला हवी. अल्लामा इब्ने जरीर तबरी म्हणतात,

"जुलमी माणसाला सरळ मार्गावर आणणे व त्यावर कायम ठेवणे व तो ज्या शिक्षेस पात्र ठरतो ती शिक्षा देणे, वास्तविक पाहता हे त्याला दुरूस्त करणे आहे, याची स्तुती व प्रसंसा केली जाईल." (हाफीज तफसीर इब्ने जरीर)

इब्ने कसीर या श्लोकाचा अर्थ अशा प्रकारे स्पष्ट करतात,

"जो मनुष्य जुलूम व अतिरेक करतो, अल्लाहचे सदाचारी लोकांमध्ये त्याच्याशी बदला घेण्याची शक्ती आहे ते बदला घेण्यास लाचार व असमर्थ नाहीत, उलट ते बदला घेण्यास समर्थ व सशक्त आहेत." (तफसीर इब्ने कसीर)

अल्लामा अबू सऊद म्हणतात,

"अल्लाहने त्याच्यात आत्मसन्मानाची एवढी तीव्रता ठेवली आहे की ते दुसऱ्यासमोर नमणे व अपमानित होण्यास घृणास्पद समजतात. म्हणून त्यांच्याशी कोणी जुलूम व अतिरेक केल्यास ते त्याचा बदला घेतात. हे त्यांच्या पराक्रमाच्या इतर बाबींतील एक वैशिष्ट्य आहे." (तफसीर अबू सऊद)

याच कारणास्तव माननीय इब्राहीम नखई म्हणतात,

"आमच्या पूर्वजांना हे मान्य नव्हते की मुस्लिमांनी अशा प्रकारे निम्नदर्जाचे जीवन व्यतीत करावे की अल्लाहचे विद्रोही व अवज्ञाकारींचे धैर्य वाढेल व ते त्यांच्यावर (मुस्लिमांवर) अत्याचार करू लागतील. मात्र त्यांना जेव्हा शक्ती प्राप्त होते तेव्हा ते त्यांना क्षमा करतात." (हदीस : बुखारी)

बदला घेताना अतिरेक होता कामा नये

कधीकधी जुलूम व अतिरेकाविरुद्ध भावना इतकी तीव्र होते की बदल्याची आग विझविण्यासाठी मनुष्य साऱ्या नैतिक व कायद्याच्या सीमा ओलांडतो. याचे भयंकर परिणाम होऊ शकतात. भूतकाळात जेव्हा यावर अंकुश लावला गेला नाही, अत्याचारितांनी जुलमीचे रूप धारण केले व स्वत: जुलूम करू लागले. क्रोध, घृणा व प्रतिशोधाची एक लाट आली व अत्याचारिताने जुलमी बनून ते सर्वकाही अंमलात आणले ज्याच्याविरुद्ध तो स्वत: लढत होता. इस्लाम अत्याचरिताचे हे अधिकार तर स्वीकार करतो की ती जुलमीविरुद्ध बदला घेऊ शकतो परंतु असा आदेश देतो की जितका अत्याचार झाला आहे तितकाच अत्याचार करावा. त्यापेक्षा जरासुद्धा जास्त जुलूम करण्याची त्याला मुभा नाही. जुलूम व अतिरेकांचे अनेक प्रकार आहेत, परंतु त्या सर्वांना दोन शीर्षकांतर्गत विभागता येईल. एक तो अतिरेक ज्याने लोकांच्या शरीर व मालमत्तेवर करून शारीरिक व वित्तीय नुकसान केले जाते. दुसरा तो की जो जिभेने (वाणीने) केला जातो. उदा. घाणेरडी भाषा वापरणे, चहाडी करणे वा पाठीमागे निंदा करणे. कुरआन व हदीसमध्ये म्हटले आहे की माणसाशी ज्या सीमेपर्यंत त्याच्यावर अत्याचार केला गेला आहे, त्याच सीमेपर्यंत त्याने बदला घ्यावा, त्याच्या पुढे जाऊ नये. कुठे आर्थिक व शारीरिक अतिरेकाची चर्चा आहे कुठे शाब्दिक अत्याचाराचा उल्लेख या दोन्ही प्रकारच्या अतिरेकांसंबंधी पुढे चर्चा करू.

आर्थिक व शारीरिक बदला घेण्यात अतिरेक होऊ नये

कुरआनने एका ठिकाणी प्रतिशोधाची परवानगी देताना म्हटले आहे,

"जो कोणी तुमच्यावर अत्याचार करील त्याच्यावर त्याच प्रकारे अत्याचार करा ज्या प्रकारे त्याने तुमच्यावर अत्याचार केला आहे. अल्लाहची भीती बाळगा व लक्षात असू द्या की अल्लाह त्या धर्मपरायण लोकांसोबत आहे.*(दिव्य कुरआन - २ : १९४)*

हा श्लोक जिहाद (धर्मयुद्धा)च्या संदर्भात आला आहे की जो पवित्र महिन्या (युद्धाकरिता अवैध) संबंधात आहे. त्यांच्या बाबतीत अनादर करून शत्रू जर तुमच्याशी युद्ध करीत असेल तर तुम्हीही त्याच प्रमाणात त्यांच्याशी युद्ध करा.

एका दुसऱ्या ठिकाणी कुरआनात म्हटले आहे,

"आणि जर तुम्हा लोकांना बदला घ्यायचा असेल तर तितकाच घ्या जितके तुमच्यावर जुलूम झाले आहे. परंतु तुम्ही जर संयम बाळगले तर ते उत्तम आहे."

(दिव्य कुरआन - १६ : १२६)

हा श्लोक इस्लामच्या प्रचार व प्रसारच्या सिद्धान्त व आचारा संदर्भात आला आहे. इमाम राजी सांगतात,

"दीन (धर्मा)चा प्रचार करणाऱ्यांचे विरोधी त्यांचा वध करण्याचा प्रयत्न करतील, मारामारी व शिवीगाळही करतील, त्यावेळी धर्मप्रसारकाच्या मनात उत्तर देण्याची व मुकाबला (सामना) करण्याची भावना निर्माण होऊ शकते. म्हणून सूचना देण्यात आली आहे की त्याने अशा स्थितीत न्याय व सत्यावर दृढ राहावे व स्वतः अन्याय व अत्याचाराचा मार्ग अवलंबू नये." (तफसीर अल कबीर)

जिभेने बदला घेताना अतिरेक करू नये

आता जिभेने होणारा जुलूम व अतिरेकाबाबत बोलू या. एखादी व्यक्ती जर आपल्या जिभेने काही वाईट शब्द उच्चारून कष्ट देत असेल तर त्याच प्रमाणात बदला घेण्याची परवानगी आहे ज्या प्रमाणात त्याने त्रास दिला असेल. कुरआनातील हा श्लोक वर देण्यात आहे,

"अल्लाहला कोणाबद्दल वाईट भावना बाळगणे आवडत नाही. मात्र ज्या व्यक्तीवर जुलूम झाला असेल तर तो व्यक्त करू शकतो आणि अल्लाह ऐकणारा व जाणणारा आहे." *(दिव्य कुरआन - ४ : १४८)*

याच्यात अत्याचारिताला त्याच्यावर झालेल्या जुलमाबाबत उघडपणे व्यक्त

करण्याचा अधिकार दिला आहे. हेही सत्य आहे की अल्लाह ऐकणारा व जाणणारा आहे. हे स्पष्ट करून या अधिकाराचा चुकीचा उपयोग थांबविण्यात आला आहे. अर्थ असा की अल्लाहपासून कोणतीच बाब लपलेली नाही. तो तुमच्या जिभेने निघणारे शब्द ऐकत आहे व तो तुमच्या हृदयात लपलेल्या भावना व संवेदनांशी परिचित आहे. म्हणून तुम्ही वैध मर्यादेपेक्षा बाहेर जात असाल तर तुम्हीसुद्धा आरोपी व्हाल अशा पद्धतीने "ऐकणारा व जाणणारा" या गुणाचा उल्लेख करून बदल्याच्या अधिकारास आटोक्यात आणले आहे व जुलमीपणाला खीळ बसविण्यात आली आहे. इमाम राजी येथे अल्लाहच्या या गुणाचा भावार्थ लिहितात,

या श्लोकात अत्याचारिताला ज्या जुलमाच्या अभिव्यक्तीचा अधिकार देण्यात आला आहे. या विशेषत व गुणांचा उल्लेख करून त्यात हदबंदी करण्यात आली आहे, अर्थात माणसाने अल्लाहचे भय बाळगावे व केवळ सत्य बोलावे व कोणावरही मिथ्या आरोप लावू नये, नाहीतर तो गुन्हेगार होईल. तो जे काही सांगत आहे ते अल्लाह ऐकत आहे व जे काही मनात लपवून ठेवले आहे. त्याची अल्लाहला जाणीव आहे. (तफसीर : अल कबीर)

हदीसमध्ये ही गोष्ट अधिक स्पष्टपणे सांगण्यात आली आहे. माननीय अबू हुरैर (रजि.) सांगतात की अल्लाहचे पैगंबरांनी सांगितले आहे,

"एक दुसऱ्याला शिवीगाळ करणाऱ्यांनी जे काही म्हटले त्याचे पाप सुखात करणाऱ्यावर आहे, जोपर्यंत जुलूम झालेली व्यक्ती प्रत्युत्तर देत नाही."

(हदीस : मुस्लिम)

इमाम नववी म्हणतात,

"या हदीसचा निष्कर्ष असा निघतो की बदला घेणे वैध आहे याबाबत कोणताही मतभेद नाही, याबाबत कुरआन व हदीसमध्ये बरीच उदाहरणे (पुरावे) आहेत."

इमाम गजाली म्हणतात,

"या हदीसमध्ये पैगंबर (स.) यांनी अत्याचारिताला बदला घेण्यास अनुमती दिली आहे, मात्र जोवर तो स्वतः अतिरेक करणार नाही." (अहयाए - उलूमुद्दीन)

बदला घेताना शरियतच्या अटींचे बंधन

इस्लामने बदला घेण्याच्या बाबतीत एक अट लावली आहे तो बदला त्याच सीमेपर्यंत असेल ज्या सीमेपर्यंत अत्याचार झाला आहे. एखाद्याने जर थोबाडीत मारले असेल तर त्याचा प्राण घेता येत नाही. दुसरी अट अशी आहे की बदला घेताना नैतिकता व शरीअतच्या बंधनाचे पालन करायला हवे. त्यांचे उल्लंघन व अतिक्रमण होता कामा नये. इमाम नववी म्हणतात,

"एखाद्या मुस्लिमांविरुद्ध वेडेवाकडे बोलणे व शिवीगाळ करण्याबाबत मनाई आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा उपदेश आहे, मुस्लिमाला शिवीगाळ देणे पाप आहे."

इमाम गजाली म्हणतात,

"प्रत्येक जुलमाचा प्रतिकार त्याच प्रकारच्या कारवाईने केला जाऊ शकत नाही. पाठीमागे निंदेचे उत्तर निंदा करणे, एखाद्याने आपली गुप्त (वैयक्तिक) माहिती मिळविल्यास त्याची गुप्त माहिती मिळविणे, कोणी शिवीगाळ केली असल्यास शिवीगाळ करणे योग्य नाही. हेच नियम इतर अपराधांच्या बाबतीत लागू होतात म्हणजे जे दुसऱ्याने केले ते आपण करू नये. वधाच्या व आर्थिक नुकसानीच्या बाबतीतसुद्धा सीमेचे पालन करायला हवे. शरियतने दिलेल्या मर्यादेपर्यंतच बदला घेण्याची परवानगी आहे." (अहयाए - उलेमुद्दिन)

या संदर्भात क्षमा करणे अधिक बेहत्तर आहे असे म्हटले आहे.

ज्या लोकांनी बदला घेण्यास योग्य मानले आहे, त्यांनी अशी अट लागू केली आहे की माणसाने खोटे बोलू नये व चुकीचा अर्थ लावू नये. अतिरेक करणाऱ्याविरुद्ध मनुष्य अशा शब्दांचा उपयोग करू शकतो जसे अमूकची अवलाद, मूर्ख, दुराचारी, लोकांच्या इज्जत आबरूशी खेळणारा, जर लाज असेल तर बोलणार नाही, अल्लाह तुम्हाला अपमानित करेल, तुम्ही आपल्या वर्तनामुळे माझ्या मते तुच्छ आहात, वगैरे. चहाडी, पाठीमागे वाईट-साईट बोलणे, खोटे आरोप लावणे, त्याच्या आईवडिलांना बरेवाईट बोलणे अशा गोष्टी सर्वानुमते वर्ज्य आहेत.

याकरिता म्हटले जाते की अत्याचारिताला बदला घेण्याचा अधिकार आहे. परंतु हे अधिकार अटीसह आहेत, अटीशिवाय नाहीत, उलट काही बंधने आहेत. त्यांचे

पालन आवश्यक आहे. जर त्या बंधनांचे पालन न करता अत्याचारित बदला घेऊ लागला तर तो स्वत: जुलमीच्या पंक्तीत उभा असल्याचे मानले जाईल व त्याच्याशीही तेच व्यवहार केले जातील जे एका जुलमी व्यक्तीच्या बाबतीत केले जातात.

क्षमा करण्याचा अधिकार

ज्या व्यक्तीवर जुलूम व अत्याचार होत असेल त्यास ती माफ करू शकते व दुर्लक्ष करू शकते. याबाबत तिला अधिकार आहे. याविषयाची व्याख्या अशीही असू शकते की अत्याचारिताला प्रतिशोध घेण्याचा कायदेशीर अधिकार आहे व माफ करणे व दुर्लक्ष करणे त्या अधिकारापासून मुक्त होणे होय.

इमाम गजाली क्षमेची परिभाषा अशा प्रकारे करतात,

''माफ करणे एका माणसाचा अधिकार आहे व तो स्वत: आपला अधिकार सोडून देतो व अपराध्यास मुक्त करून देतो.'' (अहयाए - उलूमुद्दिन)

माफ करणे स्तुत्य आहे

कुरआनने माफ करणे व दुर्लक्ष करणे यास आवडते कृत्य मानले आहे. यामुळे बदला घेण्यात अतिरेक होण्याची शक्यता आपोआप टाळली जाते. कुरआन बदला घेण्यास परवानगी देतो मात्र तो मनुष्याला नैतिकतेच्या शिखरावर पाहू इच्छितो जिथे पोहचून तो मोठमोठ्या जुलमांना विसरून सदाचाराकडे वळतो. याला तो बदला घेण्यापेक्षा अधिक लाभदायक व चांगले मानतो. ही आयत वर देण्यात आली आहे. पुन्हा एकदा त्यावर विचार करू या,

''आणि जर तुम्हा लोकांना बदला घ्यायचा असेल तर तितकाच घ्या जितके तुमच्यावर जुलूम झाले आहे. परंतु तुम्ही जर संयम बाळगले तर ते उत्तम आहे.''

(दिव्य कुरआन - १६ : १२६)

हाफीज इब्ने कसीर म्हणतात,

या आयतीत वधाचा बदला घेण्यात न्याय आहे आणि बरोबराचा अधिकार देण्यात आला आहे व हे सांगण्यात आले आहे की एखाद्याची एखादी वस्तू हिसकाऊन घेतली गेली असेल तर ती परत घेण्यात साम्य असले पाहिजे. पुढे म्हटले आहे, या व याच प्रकारच्या दुसऱ्या आयतींमध्ये न्यायाला कायदा व शरीयतच्या दर्जासह मेहरबानी

व उपकाराची प्रेरणा दिली गेली आहे. (तफसीर इब्ने कसीर)

जस्सा म्हणतात,

"आयत (श्लोक) दर्शविते की मारेकरी व अत्याचार करणाऱ्याशी बदला घेण्यापेक्षा माफ करणे बेहत्तर आहे." (अहकामुल कुरआन)

माफ करणे अल्लाहच्या सदाचारी लोकांची विशेषता

अल्लाहच्या सदाचारी व्यक्तीमध्ये बरेचसे गुण असतात. त्यांच्या एका मोठ्या गुणाचा कुरआनात असा उल्लेख आहे,

"जे राग गिळून टाकतात व दुसऱ्याचे अपराध माफ करतात."

(दिव्य कुरआन - ३ : १३४)

माफ करणाऱ्याला अल्लाह माफ करतो

या जगात माणसाकडून मोठमोठ्या चुका घडतात व अल्लाह त्या चुकांना माफ करतो. अल्लाह जर प्रत्येक चुकीची शिक्षा देऊ लागला तर माणसाचे जीवन कठीण जाईल. अल्लाह माणसामध्ये सुद्धा अशाच प्रकारचे माफ करण्याचे व दुर्लक्ष करण्याचे सद्‌गुण पाहू इच्छितो. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी जशा प्रकारचा व्यवहार करते. तशाच प्रकारचे व्यवहार अल्लाह तिच्याशी करतो. म्हणून तो मनुष्य जर लोकांच्या चुका माफ करत असेल तर तोही अल्लाहच्या दयेची माफीची अपेक्षा करू शकतो व अल्लाह त्याच्या उणिवा व चुकांना दुर्लक्षित करतो. अत्याचारिताला जुलमीकडून बदला घेण्याची मुभा दिली आहे, त्याचबरोबर हेही म्हटले आहे.

"परंतु जर तुम्ही अंतर्बाह्य चांगुलपणाच दाखवाल अथवा कमीत कमी वाईटाकडे दुर्लक्ष कराल, तर अल्लाह (चा देखील हाच गुण आहे की तो) मोठा क्षमा करणारा आहे (यद्यपि तो शिक्षा देण्याचे) पूर्ण सामर्थ्य बाळगतो."

(दिव्य कुरआन - ४ : १४९)

एका ठिकाणी सामाजिक निर्देशांच्या संदर्भात म्हटले आहे,

"जर तुम्ही क्षमा आणि दुर्लक्ष करण्याच्या व्यवहाराने त्यांना माफ केले तर अल्लाह क्षमाशील व परमकृपाळू आहे" *(दिव्य कुरआन - ६४ : १४)*

क्रोध व प्रतिशोधाच्या आवेशात मनुष्य कधी कधी फारच कठोर कृत्य करतो जे

वैध आहे. मात्र नावडते आहे. कुरआनची आयत, २४ सूरह नूरमध्ये त्याच्यापासून दूर राहण्याची प्रेरणा दिली आहे व म्हटले गेले आहे की जर तुम्हाला वाटत असेल की त्याने तुम्हाला आपल्या दया व क्षमेने पुरस्कृत करावे तर लोकांना (त्याच्या दासांना) त्यांच्या अतिरेकी कारवायांना माफ करा. हेच आदेश पुढील पंक्तीत किती उत्तम प्रकारे व्यक्त केले आहे.

"तुमच्यापैकी जे लोक कृपाविभूषित व ऐपत बाळगणारे आहेत त्यांनी अशी शपथ घेऊ नये की आपल्या नातेवाईक, गोरगरीब व अल्लाहच्या मार्गात हिजरत (देशत्याग) करणाऱ्या लोकांना मदत करणार नाही. त्यांना माफ केले पाहिजे आणि त्याकडे कानाडोळा केला पाहिजे, काय तुम्हाला आवडत नाही की अल्लाहने तुम्हाला माफ करावे? आणि अल्लाहचा गुण असा आहे की तो क्षमाशील व दयाळू आहे."

(दिव्य कुरआन - २४ : २२)

या आयतींच्या अवतरणाबाबत एका हदीसमध्ये एक घटना सांगितली गेली आहे. माननीय मिस्ताह (रजि.) एक निर्धन व्यक्ती होते. लहानपणीच त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला होता. मक्का येथे त्यांच्या आईने इस्लाम स्वीकारला. मक्क्याहून ते मदीना येथे गेले. बद्रच्या युद्धात ते सामील होते. सदाचारी व निष्ठावान सहकारी होते. माननीय अबू बकर (रजि.) त्यांचे नातेवाईक होते. त्यांच्याशी नाते असल्यामुळे माननीय अबू बकर (रजि.) त्यांना आर्थिक मदत देत होते. पक्के मुस्लिम असूनही इफ्कच्या घटनेत त्यांच्या हातून चूक घडली. माननीय आएशा (रजि.) एका छोट्या युद्धात परतीच्या प्रवासात मागे राहिल्या. एका सहकाऱ्यासोबत परतल्या. यावर काही कपटी लोकांनी शंकाकुशंका व्यक्त करण्यास सुरुवात केली. काहींनी दोषारोपणही केले. हे (माननीय मिस्ताह) सुद्धा आपल्या सरळ स्वभावामुळे अफवा नी प्रभावित झाले. माननीय अबू बकर (रजि.) या घटनेने फार दुःखी झाले. त्यांनी म्हटले,

"ईश्वराची शपथ, आता यापुढे या व्यक्तीकरिता एक पैसा ही खर्च करणार नाही."

असे म्हटले जाते की यानंतर सूरह नूरची उपरोक्त आयती अवतरित झाली. माननीय अबू बकर (रजि.) यांनी ती आयत ऐकली व म्हटले,

"अल्लाह शपथ, मी तर इच्छितो की अल्लाहने मला माफ करावे."

यानंतर माननीय मिस्तह (रजि.)ला ते खर्च देऊ लागले. काही लोक म्हणतात की खर्चाची रक्कम दुप्पट करून टाकली व म्हटले की यापुढे ह्याचा खर्च कधी बंद करणार नाही.

हदीसमध्ये दुर्लक्षाची प्रेरणा

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उपदेशात माफ करण्यावर व दुर्लक्ष करण्यावर फार जोर देण्यात आला आहे. आणि त्याचे फार श्रेष्ठत्त्व वर्णिले गेले आहे. या प्रकारच्या वृत्ती व कृतीचे अनेक प्रकारे कौतुक करण्यात आले आहे. अबू हुरैरा (रजि.) यांनी माहिती दिली आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उपदेश दिला आहे,

"दान पुण्याने आपल्या संपत्तीत कधीच घट होत नाही. क्षमा व दुर्लक्ष केल्याने अल्लाह आपल्या सेवका (माणसा)च्या प्रतिष्ठेत अधिक वाढ करतो व जो अल्लाहसाठी विनम्रता व साधेपण आचरणात आणतो त्याला उच्च दर्जा व प्रतिष्ठा प्रदान करतो."

(हदीस : मुस्लिम)

याच भावार्थाची माहिती अबू कब्शा अन्सारी (रजि.) देतात. त्यानुसार कळते की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शपथ घेऊन सांगितले होते की,

"आपल्या ओवाळलेल्या पैशाचे दान व इतर प्रकारच्या दानाने संपत्तीत घट होत नाही. एखाद्यावर जुलूम व्हावा व त्याने संयम बाळगावा. तर अल्लाह त्याच्या प्रतिष्ठेत वाढ करतो व जी व्यक्ती भीक मागते, अल्लाह तिला निर्धन व परावलंबी करतो.

उकबा बिन आमिर (रजि.) सांगतात की अल्लाहच्या पैगंबरांनी उपदेश दिला आहे, "जो तुमच्याशी संबंध तोडून टाकतो त्याच्याशी संबंध जोडा, जो तुम्हाला तुमच्या अधिकारापासून वंचित करतो त्याला त्याचे हक्क प्रदान करा व जो तुमच्यावर जुलूम करेल त्याला माफ करा." (हदीस : मुसनद अहमद)

रागावर काबू प्राप्त करण्याची महत्ता

प्रतिशोधाची भावना क्रोधाने भडकते. जेव्हा एखाद्याविरुद्ध मनात क्रोध निर्माण होतो तेव्हा मनुष्य क्रोधाने भडकून प्रतिशोध घेण्यासाठी उचल घेतो. अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी माणसाने रागावर काबू ठेवला पाहिजे आणि राग गिळून टाकावा व अल्लाहची प्रशंसा प्राप्त करावी. माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) म्हणतात की

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उपदेश दिला आहे,

"राग गिळून टाकण्यासारखे दुसरे कोणतेच चांगले कर्म नाही ज्याने अल्लाह प्रसन्न होतो." (हदीस : इब्ने माजा)

प्रतिशोधाची शक्ती प्राप्त असूनही जर मनुष्य दुर्लक्ष करील तर त्याचा बदला व पुण्यही तेवढेच महान असते. माननीय मुआज बिन अनस जूहनी (रजि.) यांच्याकडून कळते की पैगंबर मुहम्मद (स.) म्हणतात,

"जी व्यक्ती बदला घेण्याचे सामर्थ्य असूनही राग काबूत ठेवते, अल्लाह त्याला संपूर्ण सृष्टीसमोर बोलावेल व त्याला अधिकार देईल की जी हूर (अप्सरा) त्याला हवी असेल तिचा स्वीकार करावा." (हदीस : अबू दाऊद)

क्रोध कोणत्यातरी अनिष्ट कारणामुळे निर्माण होतो. अल्लाहला प्रसन्न करण्याकरिता तो क्रोध व्यक्त करीत नाही.

क्षमा व प्रतिशोध परिस्थितींवर अवलंबून असतो

कुरआन व हदीस अनुसार नैतिकता व श्रेष्ठता माणसाने क्रोधावर काबू करून सिद्ध करावी व जुलूम करणाऱ्यास क्षमा करावी. मग प्रतिशोधाचा मुस्लिमांच्या एका चांगल्या गुणाच्या स्वरूपात का उल्लेख करण्यात आला आहे. दोन्ही गोष्टीत विरोधाभास दिसत नाही का? याचे उत्तर असे की माणसाच्या जीवनात प्रतिशोध व क्षमा दोहोंची गरज असते. कधी प्रतिशोधाची गरज भासते, तर कधी माफी व दुर्लक्ष करण्याची गरज भासते वेगवेगळ्या परिस्थिती अनुसार प्रत्येक गोष्टीचे महत्त्व असते. ज्या ठिकाणी प्रतिशोध घ्यायला हवा तेथे क्षमा करणे योग्य मानले जात नाही व जेथे क्षमा करायची असते तेथे प्रतिशोधाची प्रशंसा केली जात नाही.

अल्लामा अबू बकर जस्सास म्हणतात,

"क्षमा व दुर्लक्ष करणे त्या वेळी योग्य आहे ज्या वेळी अपराध्याला त्याने केलेल्या दुष्कृत्याबद्दल पश्चात्ताप होत असेल व तसे दुष्कृत्य पुन्हा न करण्याचा तो आश्वासन देत असेल. बाकी जी व्यक्ती जुलूम व अत्याचारचा मार्ग सोडायला तयारच होत नसेल तर तिच्याविरुद्ध बदला घेणेच बेहेत्तर मानले जाईल."

इमाम राजी म्हणतात की,

"क्षमा व दुर्लक्षाचे परिणाम दोन प्रकारे जाहिर होतात. एक तर विवाद संपुष्टात

आले पाहिजे व अपराध्याने आपला गुन्हा मान्य करायला हवा. हे ही शक्य आहे की क्षमा केल्याने अपराध्याची हिम्मत वाढेल व तो अधिक जोरात चुका (अपराध) करू लागेल. अल्लामा अबू सऊद म्हणतात.'' (तफसीर कसीर)

''मुस्लिमांची ही एक विशेषता आहे की ते त्या लोकांशी बदला घेतात जे त्यांच्यावर जुलूम करतात. असेही म्हटले जाते की ते क्षमाही करतात. या दोन्ही गोष्टीत विरोधाभास नाही, कारण की त्यांची आपापली वेगळी वैशिष्ट्य आहेत. परंतू जर घेतलेले निर्णय परिस्थिती अनुरूप नसतील तर ते निंदेचे कारण होतात. व ते पसंत केले जात नाहीत.'' (तफसीर अबू सऊद)

अपराधाकडे दुर्लक्ष करणे अत्याचारिताचा ऐच्छिक अधिकार आहे

जुलमीला माफ करण्याचा अधिकार केवळ अत्याचारितास आहे की शासनही त्यास माफ करू शकते. जगाने नेहमीच शासनाला व राज्याला मोठमोठ्या जुलमींना माफ करण्याचे अधिकार दिले आहेत. म्हणूनच एखाद्या व्यक्तीने कोणावर जुलूम केल्यास शासन त्यास माफ करते, त्यामुळे अपराध्यावर अत्याचाऱ्यास बदला घेण्याची व न्याय मिळविण्याची संधीच शेष राहत नाही. पण येथे दोन गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. एक हे की ज्या तीव्रतेने अत्याचारिताला आपल्या नफ्या-तोट्याची जाणीव असते त्या प्रकारे इतर कोणालाही जाणीव होऊ शकणार नाही. म्हणून स्वाभाविकरित्या क्षमा व दुर्लक्ष करण्याचा अधिकार अत्याचारितास मिळायला हवा.

दुसरे असे की जर शासनाने क्षमा व दुर्लक्षित करण्याच्या अधिकाराचा चुकीच्या पद्धतीने वापर केला तर ज्या लोकांनी शासनाला समर्थन दिले आहे त्यांनी अत्याचारितांवर जुलूम केल्यासारखे होते. इस्लाममध्ये क्षमा व दुर्लक्षित करण्याचा संबंध त्या व्यक्तीशी आहे ज्याच्यावर अत्याचार झाला आहे. तोच त्याला माफ करू शकतो. जर एखाद्याने कोणावर जुलूम केला आहे तर अत्याचारितास बदला घेण्याचा अधिकार आहे व माफ करण्याचाही त्याच्या ह्या अधिकाराचा दुसरी कोणीही व्यक्ती व संस्था (अर्थात शासन) वापर करू शकत नाही.

सारांश

इस्लाममध्ये अत्याचारिताला जुलमीविरुद्ध प्रतिशोध घेण्याचा व क्षमा करण्याचा अधिकार आहे. जर तो बदला घेत असेल तर तो एका कायद्याच्या आधिकाराचा वापर आहे. कायदा फक्त बघेल की तो शरीयत (इस्लामी कायद्या)च्या सीमेबाहेर तर जात नाही ना व जर क्षमा करत असेल तर हा त्याचा उपकार होय. परंतु उपकारासाठी कुणालाही विवश करता येत नाही. कोणाच्या कायदेशीर अधिकाराला स्वीकार करून क्षमा-याचना करणे व त्याला अधिकारापासून पूर्णता वंचित करणे यात जमीन आसमानाचे अंतर आहे. पहिल्या स्थितीत माणसात आत्मविश्वास व उच्च संस्कार निर्माण होतात व दुसऱ्या स्थितीत त्याचा आत्मविश्वास दाबला जातो व त्याला अपमानित झाल्याचा अनुभव होतो. या संदर्भात कुरआनने सर्व नैतिक व कायदेशीर बाबींना खालील आयतींमध्ये बंदिस्त केले आहे.

"आणि जेव्हा त्यांच्यावर अत्याचार केला जातो तेव्हा त्याचा मुकाबला करतात, वाईट कृत्यांचा बदला तेवढ्याच प्रमाणात आहे मग जो कोणी माफ करील आणि सुधारणा करील त्याचा मोबदला अल्लाहकडे आहे. अल्लाह अत्याचाऱ्यांना पसंत करीत नाही. आणि जे लोक अत्याचार झाल्यानंतर बदला घेतील त्यांची निर्भर्त्सना केली जाऊ शकत नाही, निर्भर्त्सनेलायक तर ते आहेत जे दुसऱ्यावर अत्याचार करतात आणि पृथ्वीवर हकनाक आगळीक करतात. अशा लोकांसाठी यातनादायक प्रकोप आहे. तथापि जो मनुष्य संयमाने वागेल आणि क्षमा करील तर हे मोठ्या साहसी कर्मांपैकी होय." *(दिव्य कुरआन - ४२ : ३९-४३)*

इस्लामने अत्याचारितांना कायद्याच्या दृष्टीने इतके भक्कम आधार दिले आहे की तो कोणाच्याही दबावाची चिंता न करता स्वतंत्रपणे आपल्या इच्छेनुसार जुलमाविरुद्ध कारवाई करू शकतो. तो जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात विवश व लाचार होत नाही. त्याला शंका वाटत नाही की त्याचे अधिकार असुरक्षित आहेत व तो कोणाच्याही अत्याचाराला व दडपणाला बळी पडेल. याचबरोबर इस्लाम प्रतिशोधाच्या नावाखाली मनुष्यांना निर्धारित हद्दीबाहेर जाऊ देत नाही व तो मनुष्याला नैतिकतेच्या इतक्या उंचीवर पोहचवतो की तो देवदूतांच्या पंक्तीमध्ये उभा राहण्यायोग्य होतो.

- समाप्त -